नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक २०६ * * नागपूर * मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बूट फेकणाऱ्यावर अवमान कारवाई नाही

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २७ :
सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर बूट फेकणाऱ्या वकिलाविरुद्ध सर्वोच्च न्यायालय अवमानाची कारवाई सुरू करणार नाही.

सोमवारी न्यायालयाने सांगितले की, सरन्यायाधीशांनी स्वतः आरोपी वकील राकेश किशोर यांच्याविरुद्ध कारवाई करण्यास नकार दिला आहे आणि त्यामुळे खटला पुढे जाणार नाही. तथापि, भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे स्थापित करण्याचा विचार केला जाईल, असे न्यायालयाने म्हटले आहे. या संदर्भात, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना देशभरातील न्यायालयांमध्ये घडलेल्या अशा घटनांचा तपशील गोळा करण्यास सांगण्यात आले आहे.

अग्रग्रलेख

## खरीखरी..

### संत्रा शेतकरी दुःखी- जग सुखी

यावर्षी पाऊस अगदी धो-धो बरसलेला आहे. त्या पाण्याचे अयोग्य नियोजन वषार्नुवर्षे सुरू आहे. शेतातून वाहून जाणारे पाणी अनेक आपत्ती उत्पन्न करणारे आहे. नदीफोड / झाडेतोड वगैरे वगैरे सारख्या मानव निर्मित कमार्ने अशा प्रकारची परिस्थिती आणि अतिवृष्टी आल्याचे दिसत आहे. याबाबतीत ऑरेंज डिस्ट्रिक्ट म्हणजेच संत्र्याचा जिल्हा म्हणून नावाजलेल्या नागपुरी संत्र्याची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. यंदा मान्सून आज जाईल, उद्या जाईल अशी वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांची न परतलेल्या पावसामुळे त्रेधा तिरपिट उडालेली आहे. संत्रा बागायतीचे भयंकर नुकसान झालेले आहे. वारंवार 'पावसाच्या सरीवर सरीं त्यामुळे बिचारा शेतकरी मरी' अशी भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. या पावसाच्या प्रचंड माऱ्यामुळे यंदा संत्र्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात कमी झालेले आहे. पावसामुळे झालेली फळांची गळ आणि माशी रोगाचा प्रादुर्भाव यामुळे यंदा ५०% संत्रा उत्पादन कमी होणार आहे. संत्र्याचा हंगाम दरवर्षी जवळजवळ दोन ते तीन महिन्यांपेक्षा जास्त चालतो. मात्र यावर्षी हा हंगाम ५० टक्के कमी वेळात म्हणजेच दीड महिन्यात संपणार आहे. जो काही संत्रा शेतकऱ्यांच्या हाती आला आहे त्याचा दर्जा चांगला नाही. तो जास्त दिवस टिकणारही नाही दोन दिवसातच संत्र्याचे पाणी सुटायला लागलेले आहे आणि शेतकरी आणि पाणी करून बेजार झालेले आहेत. पूर्वी डझनाने खरेदी करणारे लोक संत्रा टिकण्याची हमी नसल्यामुळे कमीत कमी खरेदी करीत आहेत. कारण 'पाणी पाऊस चोहिकडे संत्र्याचे, निघत आहे मढे' अशी परिस्थिती असूनही, अजूनही पावसाने उसंत घेतलेली नाही. सध्या शेतकऱ्यांना पसंत नसतानाही पावसाचा वसंत ऋतू सुरू आहे. यामुळेच झाडावरची किंवा तोडलेली फळे उन्हाची मेहेरबान झाल्यामुळे संत्र्यांचा रंगाचा बेरंग होत आहे. नागपुरी संत्र्याचा किंचित आंबट मधुरपणा ही खऱ्या अर्थाने चवीची निशाणी आहे. सध्याच्या पावसामुळे त्यातील मधुरपणा जाऊन आता संत्र्याचा आंबटपणाच वाढलेला आहे. संत्र्याच्या या अशा परिस्थितीमुळे संत्र्याला ग्राहक कमी झालेले आहेत, ग्राहक कमी झाल्यामुळे भावही कमी झालेला आहे आणि संत्रा बागायतदारांच्या नशिबी वणवण भटकण्याचे दिवस आलेले आहेत. नागपूर आणि त्या लगतच्या अमरावती जिल्ह्यातील ब?याच मोठ्या भागात संत्र्याच्या बागा आहेत. संत्र्याची बाग म्हणजे हुकमी उत्पन्न असा आजवरचा अनुभव होता पण, यंदा हे उत्पन्न सर्व बाजूने फसलेले आहे. आता संत्री उत्पादक बागायतदारांनी सरकारी मदतीची अपेक्षाही ठेवलेली नाही. कारण संत्र्यांची अशी परवड यावर्षी सुरू झालेली आहे त्यामुळेच संत्रे परवडेनासे झालेले आहेत. शेतकरी नेहमी प्रमाणे अतिशय घनघोर संकटामध्ये आहे हे सर्व ऐकून घेण्यापेक्षा सत्तेमधील आणि विरोधक पुढाऱ्यांना आगामी नगरपालिका, नगरपरिषदा आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी करणे जास्त महत्त्वाचे वाटत आहे. त्यामुळेच ती तयारी सुरू झाली आहे. आम्ही मुद्दाम फक्त संत्र्यांचा विषय निवडला इतर अनेक पिकांची ही अशीच गत आहे. यामध्ये एकच बाब खरी ती म्हणजे, 'शेतकरी दुःखी तर सगळे जग सुखी' !

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी

# भारत पूर्णतः सज्ज!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :
मुंबई हे भारताच्या सागरी क्षेतातील महत्वाचे स्थान असून इंडिया मेरीटाईम वीक- २०२५ च्या निमित्ताने मुंबईमध्ये भारत नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी सज्ज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

यावेळी नेस्को, गोरेगाव येथे आयोजित इंडिया मेरीटाईम वीक- २०२५ या आंतरराष्ट्रीय सागरी परिषदेचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

उद्घाटन सोहळ्यास केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्री सवानंद सोनोवाल, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन शरण मांझी, केंद्रीय राज्यमंत्री शंतनु ठाकूर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि केंद्रीय सचिव विजय कुमार, आदी मान्यवर उपस्थित होते.

इंडिया मेरीटाईम वीक २०२५ च्या निमित्ताने आज जगभरातील सागरी तज्ज्ञ, उद्योगपती आणि प्रतिनिधी भारतात एकत्र आले असल्याचे सांगून, केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह म्हणाले की, गेटवे ऑफ इंडिया आता गेटवे ऑफ द वर्ल्ड बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारताचा ११ हजार किलोमीटरचा किनारा आता जागतिक विकास केंद्र होत आहे.

सागरी क्षेत्र देशाच्या जीडीपीत ६० टक्क्यांहून अधिक योगदान देते. पाच हजार वर्षांपूर्वीपासून भारत सागरी व्यापारात अग्रस्थानी होता. आज इंडो-पॅसिफिक क्षेत्रात भारत पुन्हा आपली सागरी ताकद सिद्ध करत आहे. सागर, सागरमाला, गतिशक्ती आणि समुद्रयान यासारख्या प्रकल्पांमुळे सागरी पायाभूत सुविधांना नवे बळ मिळाले आहे. भारत जहाजबांधणीत जगात पाचव्या क्रमांकावर असून नवीन बंदरांचीही उभारणी वेगाने सुरू असल्याचे ते म्हणाले.

२०४७ पर्यंत भारत जागतिक सागरी नेतृत्व प्राप्त करण्याचे ध्येय आहे. वाढवण बंदर लवकरच जगातील टॉप १० बंदरांमध्ये गणले जाणार आहे. ग्रेट निकोबार व कोचिन बंदरात नव्या गुंतवणुकीची प्रक्रिया सुरू आहे. मच्छीमारांच्या सुरक्षेसाठीही सरकारने ठोस उपाययोजना केल्या आहेत. जागतिक गुंतवणूकदारांनी भारताच्या सागरी क्षेत्रात सहभागी होऊन आपल्या आणि भारताच्या समृद्धीचा मार्ग प्रशस्त करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या परिषदेत १०० पेक्षा अधिक देशांतील साडेतीनशेहून अधिक तज्ज्ञ सहभागी झाले असून, सागरी क्षेत्रात १० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. भारत आणि विविध देशांमधील परस्पर सहकार्य वाढवून जागतिक सागरी उद्योगांना नवे बळ देण्याचे काम या परिषदेच्या माध्यमातून होणार आहे.

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा विश्वास : इंडिया मेरीटाईम वीक - २०२५ चे उद्घाटन




### महाराष्ट्र देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

भारत आणि महाराष्ट्राकडे विविध क्षेत्रात अमर्याद संधी आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत नव्या मेरीटाईम पॉवरच्या रूपात उभा राहत आहे. महाराष्ट्र देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू आहे असे सांगून या प्रवासात गुंतवणूकदारांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

सागरी ताकदीत महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. मुंबई पोर्ट आणि जेएनपीए देशाच्या कंटेनर वाहतुकीत मोठी भूमिका बजावत आहेत. यात मुंबईसह, महाराष्ट्रातील बंदरांची भूमिकाही सदैव महत्वाची राहिली आहे. यातूनच मुंबईला देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा मिळाला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

वाढवण पोर्ट पूर्ण झाल्यावर हे बंदर जगातील महत्वाच्या आणि पहिल्या दहा बंदरापैकी एक असेल. वाढवणमुळे भविष्यात महाराष्ट्रासोबतच भारत मेरीटाईम शक्तीच्या रूपात उदयास येईल. जागतिक व्यापार आणि जागतिक पुरवठा साखळीमध्ये भारताचे स्थान अधोरेखित असेच राहील. या बंदराच्या उभारणीमुळे उद्योग, व्यवसाय या अनुषंगाने महाराष्ट्रामध्ये अनेक संधी निर्माण होतील. महाराष्ट्राने नुकतीच महाराष्ट्र शिप बिल्डिंग पॉलिसी २०२५ जाहीर केली आहे. या धोरणांतर्गत जहाजबांधणीसाठी एक मजबूत इकोसिस्टम आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले जात आहे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मेरीटाईम व्हिजनमध्ये आणि अमृतकाल मेरीटाईम व्हिजनमध्ये, वाढवण पोर्ट एक मैलाचा दगड ठरणार असल्याचेही फडणवीस यावेळी म्हणाले.

### सागरी शांततेतून विकास

केंद्रीय बंदरे मंत्री सवानंद सोनोवाल म्हणाले की, शांतताप्रिय देशांमध्ये गुंतवणूक वाढते. देशात मोदी आणि अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली स्थैर्य निर्माण झाले आहे, त्यामुळे देशात मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीचे वातावरण तयार झाले आहे. सागरी क्षेत्र विकसित भारत निर्मितीतील महत्त्वाचा घटक ठरत आहे.

## मतदार याद्या अपडेट होणार

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २७ :




निवडणूक आयोगाने विशेष सघन सुधारणा (एसआयआर) संदर्भात पत्रकार परिषद घेतली, या परिषदेदरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी देशभरातील एसआयआर लागू करण्याबाबत माहिती दिली.

निवडणूक आयोग पुढील आठवड्यात देशभरात एसआयआर लाँच करू शकते. त्याची सुरुवात १०-१५ राज्यांपासून होईल. एसआयआर प्रथम अशा राज्यांमध्ये लागू केला जाईल, जिथे पुढील वर्षाच्या आत विधानसभा निवडणुका होणार आहेत. आसाम, तामिळनाडू, पुद्दुचेरी, केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये २०२६ मध्ये विधानसभा निवडणुका होतील.

निवडणूक आयोगाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले होते की, ज्या राज्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत, तिथे आता एसआयआरआयोजित केले जाणार नाही. याचे कारण म्हणजे खालच्या स्तरावरील कर्मचारी त्या निवडणुकांमध्ये व्यस्त असतील. ते एसआयआरसाठी वेळ काढू शकणार नाहीत. निवडणुकीनंतर या राज्यांमध्ये एसआयआरआयोजित केले जाईल.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, निकाल सर्वांना स्पष्ट दिसत आहेत. बिहारमध्ये एसआयआर यशस्वी झाला. दुसऱ्या टप्प्यात, १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार याद्या अद्ययावत केल्या जातील.

## सर्वोच्च न्यायालयाचे ५३ वे सरन्यायाधीश होणार सूर्यकांत

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २७ :
सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण आर. गवई यांनी सोमवारी केंद्र सरकारकडे त्यांचे उत्तराधिकारी म्हणून वरिष्ठ न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांची शिफारस केली.



त्यांचे नाव मंजुरीसाठी केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे पाठवण्यात आले आहे. यासह, सर्वोच्च न्यायालयाच्या ५३ व्या मुख्य न्यायाधीशांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली आहे. पारंपरिकपणे, कायदा मंत्रालयाने विनंती केल्यानंतरच विद्यमान सरन्यायाधीश त्यांच्या उत्तराधिकारीची शिफारस करतात.

## श्रेयस अय्यर आयसीयूमध्ये

■ वृत्तसंस्था, सिडनी, दि. २७ :
भारतीय एकदिवसीय संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यरला सिडनी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तो सध्या अतिदक्षता विभागात (आयसीयू) आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या सामन्यादरम्यान झालेल्या बरगडीच्या दुखापतीमुळे त्याला अंतर्गत रक्तस्त्राव होत आहे.

शनिवारी (२५ ऑक्टोबर) तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात अय्यरने बॅकवर्ड पॉइंटवरून अ‍ॅलेक्स कॅरीला बाद करण्यासाठी एक शानदार झेल घेतला. यादरम्यान त्याच्या डाव्या बरगडीला दुखापत झाली. तो ड्रेसिंग रूममध्ये परतला, त्याला ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आले.

श्रेयस गेल्या काही दिवसांपासून आयसीयूमध्ये आहे. रिपोर्ट्स आल्यानंतर, अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याचे आढळून आले आणि त्याला ताबडतोब दाखल करावे लागले. त्याला दोन ते सात दिवस निरीक्षणाखाली ठेवले जाईल, कारण रक्तस्त्राव संसर्गात पसरण्यापासून रोखणे महत्वाचे आहे, असे एका सूत्राने सांगितले.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत श्रेयस अय्यरला उपकर्णधार बनवण्यात आले. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात, श्रेयसने चपळता दाखवली आणि मागे धावत एक शानदार झेल घेतला.

## निवडणुकीत विरोधकांचा सूपडा साफ करा - अमित शहा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :
देशातील जनता आज भाजपाचे स्वागत करायला तयार आहे. महाराष्ट्रात आज डबल इंजिन सरकार आहे. पण महाराष्ट्रात ट्रिपल इंजिन सरकार आले पाहिजे. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी येत्या निवडणूकांत इतक्या त्वेषाने कार्य केले पाहिजे की निवडणुकांत विरोधकांचा पूर्ण सूपडा साफ झाला पाहिजे. दुर्बिणीतून शोधूनही विरोधी पक्ष दिसला नाही पाहिजे असे आवाहन केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी केले.



प्रदेश भाजपाच्या नवीन कार्यालयाचे भूमिपूजन मुंबईत करण्यात आले. या कार्यक्रमात अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह भाजपाचे सर्व प्रमुख नेते उपस्थित होते.

अमित शहा म्हणाले, भाजपाचे कार्यालय हे कार्यकर्त्यांसाठी मंदिर असते. आज महाराष्ट्र भाजपा स्वबळावर वाटचाल करतो आहे. फडणवीस यांच्या नेतृत्वात तीन वेळा पक्षाने विजय मिळविला. केंद्राप्रमाणे आता महाराष्ट्रातही भाजपा एक महत्वाचा पक्ष आहे. आता हे ५५ हजार चौरस फुटांचे नवीन कार्यालय उभारण्यात येत आहे.

प्रदेशाध्यक्षांसोबत मुख्यमंत्री यांचेही कार्यालय आहे. ते मुख्यमंत्री यांना आठवण करून देईल की याच कार्यालयातून ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्रात देखील काही जिल्हे उरले आहेत, जेथे कार्यालय नाही, त्यातही डिसेंबर २०२६ पर्यंत कार्यालये उभारा असे अमित शहा म्हणाले.

## भाजप काचेच्या घरात नाही, दगड फेकू नका : फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :
मुंबईतील भाजपच्या नव्या प्रदेश कार्यालयाच्या जागेवरून विरोधकांनी केलेल्या टीकेला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले.



'आम्ही काचेच्या घरात राहत नाही, त्यामुळे आमच्यावर दगड फेकण्याचा प्रयत्न करू नका,' असा स्पष्ट इशारा फडणवीस यांनी विरोधकांना दिला आहे. यावेळी त्यांनी भाजपच्या पूर्वीच्या लहान कार्यालयातील अडचणी आणि माजी राष्ट्रीय अध्यक्ष अमित शाह यांनी तेथे बसून केलेली निवडणूक तयारी याची आठवण सांगितली, तसेच पक्षाने हे कार्यालय घेण्यासाठी सर्व नियम पाळून, स्वतःच्या पैशाने जागा विकत घेतल्याचे ठामपणे स्पष्ट केले.

मुंबईतील मरीन लाईन्सवर भाजपच्या नवीन प्रदेश कार्यालयाचे भूमिपूजन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज करण्यात आले. दरम्यान, विरोधकांकडून या कार्यालयाच्या जमिनीवर आक्षेप घेण्यात आला आहे.

मुंबईत आपल्या प्रदेशाला चांगले कार्यालय मिळाले पाहिजे, अशी आमची सगळ्यांची इच्छा होती. त्यासाठी खूप ठिकाणी जागा सातत्याने शोधत होतो. सरकारी जागेच्या मागे न जाता, परवडणारी खासगी जागा मिळेल, अशी जागा शोधण्याच प्रयत्न आमचा चालला होता. मनोज कोटक यांनी ही जागा शोधून काढली. अनेक अडचणी या जागेमध्ये होत्या. एक-एक अडचण आम्ही दूर केली आणि हळूहळू ही जागा मिळवली.

## चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :
महाराष्ट्रात पुन्हा एकदा पाऊस धुमाकूळ घालायची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या ताजा अंदाजानुसार चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली जिल्ह्यांना बुधवार २९ ऑक्टोबर रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

या ठिकाणी या दिवशी विजांच्या गडगडाटासह खूप जोरदार पाऊस बरसण्याची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ५० किलोमीटर राहण्याचा अंदाज वर्तवला आहे.

मुंबई, पुणे, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, नाशिक, लातूर, धाराशिवसह इतर जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आलाय. या काळात वादळ आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे.

## ब्रह्मचर्याची पिलावळ नाही..

### उद्धव ठाकरेंची भाजपसह शहांवर टीका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :
आजचा योगायोग म्हणजे सामनामध्ये दोन जागा पाहिल्या. भाजप कार्यालयाचे उद्घाटन आणि जिजामाता उद्यानामध्ये पेंग्विन येणार. पण पेंग्विन आणल्यावर त्या बुद्धीचे लोक इथे आपल्यावर टीका करतात ते वेगळंच. आज ॲनाकोंडा मुंबईत येऊन गेला. उद्घाटन करा पण हा घराणेशाहीवर टीका करतो. ठाकरे यांनी अमित शहा यांचा ॲनाकोंडा असा उल्लेख केला.



आम्ही घराण्याच्या परंपरेचे पाईक आहोत. पण तुमची ब्रह्मचयार्ची पिलावळ आहे. ब्रह्मचयार्ला चाळीस पिलावळं कशी झाली असा सवाल ठाकरेंनी उपस्थित केला. गाढवंही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले हा तुकाराम महाराजांचा अभंग आहे. याचे प्रमाणही ठाकरेंनी यावेळी दिले. लोकशाहीमध्ये मतदार सरकारला निवडतात. पण सरकार मतदाराला निवडत असल्याची परिस्थिती आहे. अशा पद्धतीचा बोगस प्रकार सुरू आहे. त्यामुळेच मी बुथ प्रमुखांना इथे बोलावल्याचे ठाकरे म्हणालेत.

गोळ्या घालण्याचा आदेश देणारा व्यक्ती मोरारजी देसाई हा देखील एक गुजरातीच होता. गोळ्या घालून मराठी माणूस झुकत नाही, म्हणून पैसे देवून मुंबई ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. मला आश्चर्य वाटते की या अशा पिलावळीला आपण का वाढवले. चहावाला पंतप्रधान झाला पण त्याला पाठिंबा दिला होता. पण चहावर जीएसटी लावणारा हा कसा पंतप्रधान आहे. देशप्रेमी म्हणणारी ही बोगस देशप्रेमी टोळी आहे, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी हल्लाबोल केला.

## महिला डॉक्टरची आत्महत्या प्रकरणात नवा ट्विस्ट



■ वृत्तसंस्था, सातारा, दि. २७ :
फलटण उपजिल्हा रुग्णालयातील मृत महिला डॉक्टरवर ज्या विवाहितेचा शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी कथित दबाव टाकण्यात आला होता, त्या विवाहितेचे आई-वडील आता समोर आलेत. त्यांनी आपल्या मुलीचा पीएम रिपोर्ट बदलण्यात आल्याचा संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी पोलिस व राजकीय दबावावरही भाष्य केले आहे. त्यामुळे या प्रकरणाला एक वेगळेच वळण मिळाले आहे.

दीपाली निंबाळकर हिने सासरच्या छळाला कंटाळून १९ ऑगस्ट २०२५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. फलटण उपजिल्हा रुग्णालयात त्यांचे शवविच्छेदन करण्यात आले होते. शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी तेथील महिला डॉक्टरवर दबाव टाकण्यात आल्याचा आरोप आहे. आता महिला डॉक्टरच्या आत्महत्येनंतर दीपाली यांच्या आई भाग्यश्री यांनी माध्यमांपुढे येत आपल्या मुलीचा शवविच्छेदन अहवाल बदलण्यात आल्याचा आरोप केला आहे.

## पुढच्या दीड वर्षात चित्रपट इंडस्ट्री संपेल

### महेश मांजरेकर यांचे एआयबाबत भयावह भाकीत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :
बॉलिवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते महेश मांजरेकर यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) मुळे चित्रपटसृष्टीचे अस्तित्वच धोक्यात येईल, असे भाकीत केले आहे.

पुढच्या दीड वर्षांत सिनेमा पूर्णपणे बंद होईल, कारण अकजे व्हिज्युअल्स तयार करतं, ते कॅमे?याद्वारे निर्माण करणे अशक्य असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे पुन्हा सगळ्यांनी नाटकांकडे वळले पाहिजे, असेही ते म्हणाले.

सध्या बऱ्याच क्षेत्रात एआयचा वापर वाढला आहे. केवळ एका प्रॉम्प्टवर अवघड काम सोपे होते. अनेक क्षेत्रांत एआयमुळे अनेकांचे रोजगार जाण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. अशातच महेश मांजरेकर यांनी एआयच्या संदर्भाने भयावह भाकित केले आहे.



महेश मांजरेकर म्हणाले, एआयने एवढं टेकओव्हर केलंय की आता मानवी सर्जनशीलतेची गरजच उरणार नाही. माझं मत आहे, दीड वर्षानंतर सिनेमा बंद होईल, बंद म्हणजे बंदच! तुम्ही कितीही चांगले व्हीफीएक्स केले, तरी अक तयार करत असलेली दृश्यं कॅमेरावर देणं अशक्य आहे. मी घरबसल्या बसून टायटॅनिकमधली लायटिंग, लिओनार्डो डिकॅप्रियोपेक्षा चारपट सुंदर हिरो तयार करून सिनेमा बनवू शकतो. म्हणजे, आता घरी बसूनच चित्रपट निर्मिती शक्य झाली आहे.

महेश मांजरेकरांनी एआयने तयार केलेल्या महाभारतह्या ट्रेलरचाही उल्लेख केला. तो ट्रेलर अक्षरशः डोळे दिपवणारा आहे. जर हे सर्व एका क्लिकवर होऊ शकत असेल, तर लोक कलाकारांवर पैसे का खर्च करतील? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मात्र, एआय वापरण्यासाठीही हुशारीची गरज लागेल, असेही त्यांनी नमूद केले.

ज्या दिवशी एआयला सिनेमा बनवण्याचा कोड मिळेल, त्या दिवशी आपण संपणार! कारण रोज दहा हजार सिनेमे तयार होतील आणि त्यासाठी खर्च लागणार नाही, असे ते म्हणाले.

## पिक्चर अभी बाकी है..

रविंद्र धंगेकरांचा सूचक इशारा



■ **मुंबई :** पुण्यातील ऐतिहासिक जैन बोर्डिंगच्या जागेवरील वादग्रस्त व्यवहार अखेर रद्द झाल्यानंतर या प्रकरणात शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांनी जैन मुनींची भेट घेऊन समाजाला दिलेला शब्द पाळल्याचा आनंद व्यक्त केला. या भेटीनंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत मी आजही विकृतीविरोधात बोलतो, भाजपविरोधात नाही. माझा लढा हा समाजहितासाठी आहे. नीलेश घायवळ कसा पळाला, हा विषय अजून संपलेला नाही, असे वक्तव्य करत भविष्यातील राजकीय संघर्षाचे संकेत दिले. या संपूर्ण प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिलेला शब्द पाळला असून, त्यांनी कुठेही अडथळा आणला नाही, असे सांगत धंगेकरांनी शिंदेंचे आभार मानले.

धंगेकर म्हणाले की, मी अनेक वर्षांपासून या समाजाबरोबर कार्य करत आहे. जैन बोर्डिंगच्या विटेलापण हात लावू देणार नाही, हे मी सुरुवातीपासूनच स्पष्ट केले होते. माझी कोणाच्याही कुटुंबाशी लढाई नाही, पण कोणी विकृती आणि भ्रष्टाचाराचा खेळ केला तर मी थांबणार नाही. जर या प्रकरणाचा तिसरा अंक सुरू झाला, तर मी राजकीय आयुष्याची चिरफाड करीन, असा थेट इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, पुण्यातील शिवाजीनगर येथील जैन बोर्डिंगच्या जागेवर गेल्या काही महिन्यांपासून मोठा वाद सुरू होता. हिराचंद नेमचंद दोषी यांनी १९५८ साली ही वसतिगृह उभारली होती, जी दिगंबर आणि श्वेतांबर जैन समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी होती. मात्र अलीकडेच ही जागा काही विश्वस्तांनी विकासाच्या नावाखाली विक्रीसाठी दिल्याचे समोर आले. समाजातील अनेक सदस्यांनी याला तीव्र विरोध केला आणि विक्रीच्या प्रक्रियेत धमादाय आयुक्त कार्यालयाने नियमांची पायमल्ली केल्याचा आरोप केला. या व्यवहारामध्ये गोखले कन्स्ट्रक्शन कंपनीसह काही राजकीय नेत्यांचे नाव जोडले गेल्याने प्रकरण अधिकच गाजले.

## नव्या कार्यालयासाठी भाजपने जमीन लाटली

रविंद्र धंगेकरांचा सूचक इशारा



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी महाराष्ट्र भाजपच्या नव्या कार्यालयाच्या जमिनीवर आक्षेप घेतला आहे. सदर जागा महाराष्ट्र हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशनची ९९ वर्षे लीजवर घेतलेली आहे. इमारत धोकादायक आहे असे दाखवून ती ताब्यात घेण्यात आली आणि त्यावर आता भाजपचे कार्यालय बांधले जात आहे, असे ते म्हणालेत. त्यांच्या या दाव्यामुळे भाजप कार्यालयाच्या जागेवरून मोठा वाद रंगण्याची शक्यता आहे.

रोहित पवार म्हणाले की, राज्यात जमीन घोटाळे जोमात असताना भाजपा कार्यालयाच्या जागेबाबत देखील वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. सदरील जागा महाराष्ट्र हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशनची ९९ वर्ष लीजवर घेतलेली जागा असून इमारत धोकादायक आहे असे दाखवून ती ताब्यात घेऊन पाडण्यात आली आणि त्या ठिकाणी भाजपा कार्यालयाचे भूमिपूजन करण्यात आले.

एकीकडे पुण्यातील जैन बोर्डिंग प्रकरणात मोठ्या प्रमाणात रोष असताना भाजपा कार्यालयाच्या जागेबाबतच चर्चा सुरु असतील तर जनतेत चुकीचा संदेश जाऊ शकतो, त्यामुळे भाजपा नेत्यांनी यावर खुलासा करणे योग्य राहील, असे त्यांनी म्हटले आहे.

## १३ कोटींचे एमडी जप्त आठ जणांना अटक

**मुंबई :** मुंबई पोलिसांनी अमली पदार्थांच्या आंतरराष्ट्रीय रॅकेटचा पदार्फाश करत फॅक्टरीवर छापा टाकून १३ कोटी रुपयांचे मेफेड्रोन ड्रग्ज जप्त केले. या प्रकरणी एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी सुरू केलेल्या ऑपरेशन क्लीनमध्ये हे १३ कोटी रुपये किमतीचे ६ किलो ६७५ ग्रॅम एमडी ड्रग्स जप्त केले. झोन-६ चे उपायुक्त समीर शेख यांनी सांगितले की, ५ ऑक्टोबर रोजी ताब्यात घेतलेल्या आरोपींकडून या फॅक्टरीचा मागमूस लागला होता. त्यानुसार आमच्या पथकाने सापळा रचून ५७ ग्रॅम एमडीसह त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान, पुण्यातही १ लाख ३० हजारांचे एमडी जप्त करण्यात आले. झोन-६ च्या विशेष पथकाने तात्काळ कारवाई करत नालासोपारा (पूर्व) येथील पेल्हार गावातील रशीद कंपाउंड गाठले. हे ठिकाण ड्रग्स निर्मितीचे मुख्य केंद्र असल्याचे सिद्ध झाले. पथकाने या फॅक्टरीवर छापा टाकून पंचनामा केला. ही फॅक्टरी काही महिन्यांपासून कार्यरत होती आणि येथे सक्रियपणे एमडीचे उत्पादन घेतले जात होते.

### मराठा - कुणबी आरक्षण वाद

# सुप्रीम कोर्टाचा ओबीसी संघटनेला अंशतः दिलासा

याचिका मुख्य प्रकरणासोबत ऐकून घेण्याचे हायकोर्टाला निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :** मराठा-कुणबी आरक्षणासंदर्भातील सुनावणीत ओबीसी वेल्फेअर असोसिएशनला सर्वोच्च न्यायालयाकडून अंशतः दिलासा मिळाला आहे.

संघटनेच्या याचिकेवर न्यायालयाने स्वतंत्रपणे तत्काळ सुनावणीचे निर्देश देण्यास नकार दिला असला, तरी ती याचिका मुख्य प्रकरणासोबत ऐकून घेण्याचे आदेश हायकोर्टाला देण्यात आले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ नोव्हेंबर रोजी होणार असून, त्यावेळी ओबीसी संघटनेची याचिकाही त्यात समाविष्ट केली जाईल.

ओबीसी वेल्फेअर असोसिएशनकडून मराठा-कुणबी आरक्षणाविरोधात उच्च न्यायालयात पीआयएल दाखल करण्यात आली होती. त्यावर लवकर सुनावणी व्हावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे मागणी करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने लवकर सुनावणीची मागणी नाकारली आहे. परंतु, उच्च न्यायालयात या ओबीसी संघटनेचे म्हणणे ऐकून घेतले जाणार आहे. त्यामुळे ओबीसी वेल्फेअर असोसिएशनला हा अंशतः दिलासा मानला जात आहे.



ओबीसी वेल्फेअर असोसिएशनचे वकील मंगेश ससाणे यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना, या संदर्भामध्ये आतापर्यंत तेरा आत्महत्या झाल्या आहेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डिसेंबरमध्ये होणार आहेत, असे नमूद करत याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाला 'लवकर सुनावणीचे निर्देश' देण्यास स्पष्ट नकार दिला.

असे असले तरी, न्यायालयाने ओबीसी संघटनेची याचिका मुख्य प्रकरणासोबत ऐकून घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मराठा आरक्षणासंदर्भात १८ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीत ओबीसी वेल्फेअर असोसिएशनच्या या याचिकेचाही समावेश केला जाईल. या निर्णयामुळे ओबीसी संघटनेला अंशतः दिलासा मिळाला असून, आता या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

याबाबत बोलताना ओबीसी संघटनेचे वकील मंगेश ससाणे म्हणाले, जी पीआयएल दीड वर्षांपासून हायकोर्टात प्रलंबित आहे, ती सात ऑक्टोबरला सुनावली होती. पण बाकीच्या रेट पिटीशनबरोबर सुनावणीस त्यांनी नकार दिला होता. मुख्य प्रकरणाबरोबर आमचेही प्रकरण ऐकले जावे. ही आमची मागणी मान्य केलेली आहे.

त्याचबरोबर दोन सप्टेंबरचा जीआरला आव्हान देण्यासंदर्भात अमेंडमेंट अर्ज देखील १८ नोव्हेंबरला बाकीच्या याचिकांबरोबर ऐकण्यास हायकोर्टाला सांगितले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डिसेंबरमध्ये येऊन ठेपल्या आहेत. या निवडणुकांत कुणबी दाखल्यांमुळे आमचे हक्क डावलल्या जातील, या विवंचनेत तेरा जणांनी होऊन आत्महत्या केल्यात. त्यामुळे या प्रकरणावर लवकर सुनावणी घेण्यासाठी हायकोर्टाला आदेश देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात केली.

## घरात अन् महाराष्ट्रात मराठीतच बोला...



■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. २७ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी आपल्या मायमराठीचा अभिमान व स्वाभिमान जपण्यासाठी जनतेला घरात अन् महाराष्ट्रात सर्वत्र मराठीतच बोलण्याचे आवाहन केले. हिंदी भारतात अनेक राज्यांत चालणारी भाषा आहे. ती आलीच पाहिजे. पण मराठी आपली मातृभाषा आहे. ती आपल्याला उत्कृष्टपणे बोलता आली पाहिजे, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांनी सोमवारी साताऱ्याच्या वाई तालुक्यातील एकसर येथील पद्मश्री शाहीर कृष्णराव साबळे प्रतिष्ठानच्या कलास्मारकाची पाहणी केली. त्यांनी नव्याने उभारण्यात येणाऱ्या अद्ययावत स्मृती स्मारकाच्या भूमिपूजन व कोनशिला अनावरण सोहळ्यातही सहभाग नोंदवला. यावेळी बोलताना त्यांनी उपस्थितांना मराठीत बोलण्याचा आग्रह धरला. ते म्हणाले, आपण आपल्या मायमराठीचा अभिमान व स्वाभिमान जपला पाहिजे. नव्या पिढीला मराठी भाषेची गोडी लागली पाहिजे. त्यासाठी आपण घरात व महाराष्ट्रात मराठीतच बोलले पाहिजे.

ते पुढे म्हणाले, सद्यस्थितीत बहुतेकांची मुले, नातवंडे इंग्रजी माध्यमांच्या शाळेत टाकली जातात. या प्रकरणी ज्यांना जे वाटेल ते करावे. पण घरात असेल किंवा महाराष्ट्र असेल तिथे सतत मराठीत बोलत राहिले पाहिजे. अन्यथा भविष्यात १०-२० पिढ्यानंतर मराठी नामक एखादी भाषा होती असे सांगण्याची वेळ येऊ नये. यासाठी आपण आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे. विशेषतः समोरचा आपल्याशी हिंदीत बोलत असेल तर, आपण लगेच त्याच्याशी हिंदीत न बोलता मराठीतच बोलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यामुळे तो ही मराठीतच बोलेल.

इंग्रजीविषयी काही विचारण्यासाठी सोय नाही. ती जगभरात फिरण्यासाठी लागणारी भाषा आहे. ती आलीच पाहिजे. हिंदीही भारतातील अनेक राज्यांत चालणारी भाषा आहे. ती पण आली पाहिजे. पण मराठी आपली मातृभाषा आहे. ती उत्तमपणे बोलता आली पाहिजे. लिहिता व वाचता आली पाहिजे. एकदा मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता आली, तर हिंदी बोलायला काही अडचण येत नाही, याची पण सर्वांनी नोंद घेतली पाहिजे, असे अजित पवार म्हणाले.

# मनसेचा गड मजबूत

■ **वृत्तसंस्था, रत्नागिरी, दि. २७ :** रत्नागिरी जिल्ह्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली आहे. काही महिन्यांपूर्वी पक्षातून बाहेर पडलेले अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते पुन्हा राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मनसेत परतले आहेत.



जिल्हाध्यक्ष अविनाश सौंदळकर यांच्या पुढाकाराने हा मोठा पक्षप्रवेश सोहळा मुंबईत पार पडला. या कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी राज ठाकरे यांचे नेतृत्व म्हणजे आत्मविश्वास, असा नारा देत पुन्हा मनसेच्या झेंड्याखाली निष्ठा व्यक्त केली. यामुळे नुकतेच भाजपमध्ये गेलेल्या वैभव खेडेकर यांना मोठा धक्का बसला असून, रत्नागिरी जिल्ह्यात मनसेचा गड पुन्हा मजबूत झाल्याचे दिसून येत आहे.

जिल्हाध्यक्ष अविनाश सौंदळकर यांच्यासोबत उपजिल्हाध्यक्ष अरविंद मालाडकर, जुनेद बंदरकर, तसेच तालुका आणि शहर पातळीवरील अनेक पदाधिकारी राज ठाकरे यांच्या भेटीसाठी मुंबईत दाखल झाले. राज ठाकरेंच्या उपस्थितीत हे सर्वजण पुन्हा मनसेत दाखल झाले. यामध्ये महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचाही मोठा सहभाग होता.

जिल्हा सचिव सुनील साळवी, तालुका अध्यक्ष सचिन शिंदे (रत्नागिरी), संदेश साळवी (चिपळूण), नीलेश भामणे (खेड), तसेच रुपेश चव्हाण (रत्नागिरी) यांचा या यादीत समावेश आहे. या पुनरागमनामुळे जिल्ह्यातील मनसेची संघटनात्मक रचना पुन्हा एकदा सक्रिय झाली असून, कार्यकर्त्यांमध्ये नव्या जोमाचा संचार झाला आहे.

मनसेतून बाहेर पडताना वैभव खेडेकर गटाने काही अंतर्गत मतभेद आणि गैरसमजांमुळे राज ठाकरे यांच्या नेतृत्वावर नाराजी व्यक्त केली होती. मात्र, अविनाश सौंदळकर यांच्या मध्यस्थीने या सर्व मतभेदांचा निराकरण करण्यात आला. राज ठाकरे यांचं नेतृत्व राज्याच्या विकासासाठी अपरिहार्य आहे, असं सांगत या सर्व कार्यकर्त्यांनी पुन्हा पक्षात प्रवेश केला.

गेल्या काही महिन्यांत रत्नागिरी जिल्ह्यात मनसेची संघटना शिथिल झाल्याचं चित्र होतं. परंतु आता प्रमुख नेत्यांच्या पुनरागमनामुळे पक्षाची पकड पुन्हा मजबूत झाली आहे. मनसे जिल्हाध्यक्ष सौंदळकर यांनी यावेळी सांगितले की, आमच्या कार्यकर्त्यांची मनसेबद्दलची निष्ठा कधीच कमी झाली नव्हती, आता ती पुन्हा संघटित रूपात दिसणार आहे.

दरम्यान, मनसेमधून बाहेर पडल्यावर वैभव खेडेकर यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्यांच्या पक्षप्रवेशाचा कार्यक्रम तीन वेळा पुढे ढकलण्यात आला होता. अखेर काही दिवसांपूर्वी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत खेडेकरांचा पक्षप्रवेश पार पडला.

मात्र, त्यांच्या सोबत गेलेले अनेक प्रमुख पदाधिकारी पुन्हा मनसेकडे वळल्याने खेडेकर यांची राजकीय गणितं पूर्णपणे बदलली आहेत. राज ठाकरे यांच्या नेतृत्वावर पुन्हा विश्वास ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पुनरागमनानंतर रत्नागिरी जिल्ह्यात मनसेचा प्रभाव पुन्हा वाढताना दिसतो आहे.

## बीबी रेसिंगने जिंकली इंडियन सुपरक्रॉस लीगची पहिली फेरी

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २७ :** इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीग (आयएसआरएल) सीझन २ ची पहिली फेरी पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे नुकतीच पार पडली.

यजमान बीबी रेसिंग संघाने या थरारक स्पर्धेत अव्वल स्थान पटकावत दमदार कामगिरी केली. जगातील पहिल्या फ्रँचायझी-आधारित सुपरक्रॉस लीगच्या या उद्घाटन फेरीत हजारो प्रेक्षकांनी रायडर्सच्या रोमांचक शर्यतीचा अनुभव घेतला.

बिगरॉक मोटरस्पोर्ट्सचा मॅट मॉस (ऑस्ट्रेलिया) याने ४५०सीसी आंतरराष्ट्रीय वर्गात कावासाकीवर स्वार होत विजेतेपद मिळवले. बीबी रेसिंगचा हंटर श्रॉसर (अमेरिका) याने २५०सीसी आंतरराष्ट्रीय वर्गात होंडावर अप्रतिम गती दाखवत प्रथम क्रमांक पटकावला. गुजरात ट्रेलब्लेझर्सचा बेन हॉलग्रेन (थायलंड) याने २५०सीसी इंडिया-एशिया मिक्स वर्गात केटीएमवर शानदार प्रदर्शन करत विजय मिळवला.




भारताचे रुग्वेद बागुर्जे, इक्षान शानबाग आणि प्रज्वल विश्वनाथ यांनीही या स्पर्धेत उत्कृष्ट सहभाग नोंदवला. २१ देशांतील ३६ हून अधिक रायडर्स सहभागी झाले होते.

## आंतरराष्ट्रीय विजेत्या फेडरल लिमाला शिवराज राक्षेने लपेटले

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. २७ :** सटाण्यात राजे शिवछत्रपती मित्रमंडळ सटाणा व सुनील महाजन मित्र परिवार बागलाण यांच्या वतीने दीपावलीनिमित्त आयोजित भव्य कुस्ती दंगलीत पाच लाखांची मानाची कुस्ती डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे व आंतरराष्ट्रीय विजेता ब्राझीलचा पहिलवान फेडरल लिमा यांच्यात झाली. पुण्याचा डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे याने समोरून लपेट डाव टाकत लिमाला चीत करून मानाची पाच लाखांची कुस्ती जिंकली.



सटाणा येथील भाक्षी रोड लगत आयोजित कीर्ती सुनील महाजन प्रायोजित पाच लाख रुपयांची कुस्ती महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे व ब्राझीलचा आंतरराष्ट्रीय विजेता पहिलवान फेडरल लिमा यांच्यातील कुस्तीचा निर्णायक क्षण. याच लपेट डावावर राक्षेने लिमावर मात करून मानाची ही कुस्ती जिंकली.

राक्षे विरुद्ध लिमा यांच्या लढतीसाठी कीर्ती सुनील महाजन यांनी ५ लाखांचे बक्षीस ठेवले होते. इतर कुस्त्यांसाठी ५१ हजार, ४१ हजार, ३१ हजार, २१ हजार आणि ११ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात आली. मुलींच्या एका कुस्तीत सटाण्याची शुभांगी शेवाळे व मालेगावची कविता सोनवणे यांच्यात ११ हजारांची कुस्ती बरोबरीत सुटली.

# नाशिकरोड कारागृहात बंदीवानाची आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. २७ :** नाशिक रोड येथील मध्यवर्ती कारागृहात घडलेल्या आत्महत्येच्या घटनेने प्रशासनात खळबळ माजली आहे. लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात शिक्षा भोगत असलेल्या ५८ वर्षीय शिवदास भालेराव या बंदीवानाने स्वतःचा जीव घेतला. कारागृहातच त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ही घटना कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटींकडे पुन्हा एकदा लक्ष वेधणारी ठरली आहे.

शिवदास भालेराव हा सिन्नर तालुक्यातील रहिवासी असून, त्याला अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याच्या गुन्ह्यात अटक झाली होती. न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली होती आणि जून २०२४ पासून तो नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होता. कारागृहात त्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.

कारागृहातील पोलिस अंमलदारांनी तात्काळ त्याला खाली उतरवून जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर कारागृहात एकच खळबळ उडाली असून, सहकारी कैद्यांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

भालेरावने आत्महत्या करण्यामागचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. प्राथमिक माहितीप्रमाणे, तो गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणावात असल्याची शक्यता तपासली जात आहे. नाशिकरोड पोलिस ठाण्यात या घटनेची अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## प्रमोद महाजनांचा केवळ पैशांसाठी खून..

प्रकाश महाजनांचा २० वर्षांनंतर दावा : सारंगी महाजनांवर गंभीर आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :** भाजपचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांचा खून केवळ पैसा व स्वार्थासाठी करण्यात आल्याचा दावा त्यांचे बंधू प्रकाश महाजन यांनी केला आहे. प्रवीण हे आपले बंधू प्रमोद महाजन यांना केवळ पैशासाठी ब्लॅकमेल करत होते. ज्या व्यक्तीच्या माध्यमातून हे ब्लॅकमेलिंग सुरू होते, ती व्यक्ती आजही जिवंत आहे, असे ते म्हणालेत. त्यांच्या या आरोपामुळे या प्रकरणाला नव्याने फोडणी मिळाली आहे.



सारंगी महाजन यांनी दोन दिवसांपूर्वी पंकजा व धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. पंकजा व धनंजय मुंडे हे केवळ खंडणीखोर आहेत. ते गोपीनाथ मुंडे यांचे खरे राजकीय वारसदार नाहीत. त्यांची खरी वारस ही बीडची जनताच आहे, असे त्या म्हणाल्या होत्या. त्यांच्या या टीकेनंतर प्रकाश महाजन यांनी सोमवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधताना त्यांच्यावरच गंभीर आरोप केलेत.

प्रकाश महाजन म्हणाले, प्रमोद महाजन यांना ब्लॅकमेल केले जात होते. प्रवीण महाजन यांनी आपल्या भावाचे आयुष्य उद्ध्वस्त केले. प्रमोद राक्षस असला तरी, त्याला गोळ्या घालण्याचा अधिकार कुणी दिला? केवळ पैसा, लोभ व स्वार्थासाठी त्याचा खून झाला. ठाण्यातील अनेकाना याची माहिती आहे. त्यातले काही आजही जिवंत आहेत.

प्रवीण कोणताही कामधंदा करत नव्हता. नोकरी करायची नाही, पण कंपनीकडून पगारवाढ मागायचा. पैसे मागायचे. एवढाच त्याचा उद्योग होता. शेवटी मनुष्य जेव्हा एकटा पडतो, अपराधभाव व लोभ त्याला खातो तसेच झाले. त्याच्या मृत्यूचे खरे कारण हाच भूतकाळ होता.

प्रकाश महाजन पुढे म्हणाले, गोपीनाथ मुंडे यांनी प्रवीण महाजन यांच्याविरोधात एक साक्ष दिली होती. तेव्हापासून एक वैर पेटले आणि आज जी बदनामी सुरू आहे ही त्याच वैराची सावली आहे. मुंडेंनी सारंगी व प्रवीण यांच्या नावावर विश्वास ठेवून जमीन घेतली होती.

आज त्याच जमिनीवरून केस करून पंकजा मुंडे यांच्यावर डाग लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. केवळ महाजन हे आडनाव असल्यामुळे लोक गप्प आहेत. पण धनंजय व पंकजा यांनी आवाज उठवला, तर त्यांना उद्या वकीलही मिळणे अवघड होईल. सारंगी यांना वाटते की, पंकजा बिघडलेली आहे.

पण तुम्ही परळीला आणि लोकांना विचारा, कोण बिघडलेले आहे? त्यानंतर तुम्हाला वस्तुस्थिती समजेल. कदाचित तुमचे त्यांच्याशी रक्ताचे नाते नसेल, पण आमचे आहे. वडील गेल्यानंतर त्या मुलीवर किती संकटे आली हे मला ठावूक आहे.

आता तुम्ही केवळ तुमच्या स्वार्थासाठी तिच्यावर बोट ठेवता? गोपीनाथ मुंडे यांनी फोन केल्यानंतर तुम्हाला ऑस्ट्रेलियाचा व्हिसा मिळतो. प्रमोद महाजन यांनी सांगितल्यानंतर अमेरिकाचा व्हिसा मिळतो. आता त्यांच्या मुलांची बदनामी करताना तुम्हाला थोडीही लाज वाटत नाही का? असा सवाल प्रकाश महाजन यांनी विचारला.

# महिला डॉक्टर व बनकरमध्ये फोटोवरून झाला होता वाद

■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. २७ :** फलटण उपजिल्हा रुग्णालयातील आत्महत्या केलेल्या महिला डॉक्टर व आरोपी पीएसआय गोपाळ बदने यांच्यात जानेवारी ते मार्च या कालावधीत संभाषण झाले. पण त्यानंतर त्यांच्यात कोणतेही संभाषण झाले नाही. पण आत्महत्येच्या दिवशी त्यांचा आरोपी प्रशांत बनकर यांच्याशी फोटोवरून वाद झाला होता, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आज दिली.



रुपाली चाकणकर यांनी आज फलटण उपजिल्हा रुग्णालयाला भेट देऊन महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाची माहिती घेतली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी या प्रकरणावर विस्तृत भाष्य केले.

त्या म्हणाल्या, घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. यामध्ये पोलिस, प्रशासकीय विभाग व आयसी समिती (अंतर्गत तक्रार समिती) यांच्याशी विस्तृत चर्चा केली. त्यात अनेक गोष्टी समोर आल्या. महिला आयोग प्राधान्यक्रमाने शासकीय, निमशासकीय व खासगी आस्थापनांत आयसी समिती अस्तित्वात आहे की नाही? हे तपासून पाहते. या समित्या केवळ अस्तित्वात असून चालणार नाही, त्या सक्रीय असल्या पाहिजेत. कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी तथा महिलांना सुरक्षितता मिळण्यासाठी ही समिती अत्यंत महत्त्वाची आहे.

त्या पुढे म्हणाल्या, फलटण उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य विभागाची आयसी समिती कार्यरत आहे. पण संबंधित डॉक्टरने कोणतीही तक्रार या समितीकडे केली नव्हती. त्यांची तक्रार डॉक्टरांची पोलिसांविरोधात व पोलिसांची डॉक्टरांविरोधात आहे. या प्रकरणी एक चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या अनुषंगाने ही केस २३ ऑगस्ट २०२५ रोजी निकाली काढली गेली होती. या प्रकरणी पोलिसांची तक्रार फीट व अनफिटचा रिपोर्ट देण्यात दिरंगाई करण्याशी संबंधित होती. तर डॉक्टरने पोलिसांनी आरोपींना रात्री नव्हे तर दिवसा कामाच्या वेळातच तपासणीसाठी आणण्याचा आग्रह धरला होता.

त्यानंतर चौकशी समितीने त्यात डॉक्टरांनी कर्मचाऱ्यांशी किंवा पोलिस कर्मचाऱ्यांशी बोलताना व्यवस्थित बोलावे किंवा त्यांची पदस्थापना बदलावी, असा चौकशी समितीचा अहवाल होता. महिला डॉक्टरांनी तीनवेळा बदली होणार होती. पण त्यांनी फलटण उपजिल्हा रुग्णालयाचाच आग्रह धरला. त्यामुळे त्यांच्यासाठी स्पेशल ऑर्डर काढून त्यांना पुन्हा याठिकाणी काम करण्याची संधी दिली होती.

त्यात पोलिसांनी सीडीआर काढले आहेत. या सीडीआरच्या अनुषंगाने सुसाईड नोटमध्ये नाव असणाऱ्या गोपाळ बदने, प्रशांत बनकर आदींची चौकशी होईल, असे त्या म्हणाल्या.

**मार्चनंतर कम्युनिकेशन नाही**

चाकणकर पुढे म्हणाल्या, महिला डॉक्टरचा जानेवारी ते मार्च महिन्यापर्यंत गोपाळ बदने यांच्याशी त्यांचा संपर्क होता. त्यानंतर त्यांचे त्यांच्याशी कोणतेही कम्युनिकेशन नाही. फोटो काढण्यावरून म्हणजे फोटो नीट आले नाहीत यावरून त्या दोघांत वाद झाला. त्या वादाचे रुपांतर भांडणात झाले. त्यामुळे त्या घरातून निघून तेथील एका मंदिराच्या ठिकाणी गेल्या. नंतर त्या लॉजवर राहण्यासाठी गेल्या. त्यानंतर त्यांनी रात्रभर प्रशांत बनकरला मेसेज केले आहेत. प्रशांत बनकर यांचा मोबाईल बंद होता. मी आत्महत्या करेल अशा आशयाचाही मेसेज त्यांनी त्यांना केला होता, अशी माहिती त्यांनी दिली.

# येत्या निवडणुकीत वंचितचा झेंडा फडकावण्याचा निर्धार

■ महासागर प्रतिनिधी
संग्रामपूर, दि. २७ :

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी सज्ज झाली आहे. २४ ऑक्टोबर रोजी वंचित बहुजन आघाडी संग्रामपूर तालुका अध्यक्ष किशोर भिडे यांच्या नेतृत्वाखाली वरवट बकाल येथील पक्ष कार्यालयात तालुकास्तरीय कार्यकर्ता बैठक संपन्न झाली. बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका ताकदीने लढवण्याचा निर्धार करण्यात आला.



या बैठकीत वंचित युवा तालुका अध्यक्ष आशिष धुंदळे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, वंचित बहुजन आघाडी ही सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर लढणारी ताकद आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आमचा झेंडा निश्चितच फडकणार आहे. इच्छुकांची मोठी गर्दी आमच्याकडे होत असून, जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद आम्हाला मिळत आहे.

बैठकीत पंचायत समितीवर वंचित बहुजन आघाडीचा झेंडा फडकवण्याचा निर्धार सर्व कार्यकर्त्यांनी एकमुखाने व्यक्त केला. पक्षसंघटना बळकट करण्याबरोबरच गावपातळीवर संपर्क वाढवण्याचे आवाहन तालुकाध्यक्ष भिडे यांनी केले.

यावेळी तालुकाध्यक्ष किशोर भिडे, युवा तालुका अध्यक्ष आशिष धुंदळे, तालुका महासचिव नंदकिशोर पुंडे, दीपक पहुरकर, उपाध्यक्ष सचिन राऊत, श्रीकृष्ण भालतडक, नयन कुरेशी, राजू पवार, राहुल भिलंगे, शिरु पाटील, सिद्धार्थ गाडे, शेषराव खंडेराव, राहुल सुरडकार, विजय भारसाकळे, पंजाब वानखडे, सागर परघरमोर, आकाश इंगळे, जीवन वाकोडे, दिनेश डिगे, नीलेश लहासे, हुसेन सुरले, अक्षय वानखडे आदी उपस्थित होते.

# हातरुण येथे पावसामुळे भिंत कोसळल्याने चिमुकला ठार



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २७ :

जिल्ह्यात रविवारी दुसऱ्या दिवशीही अवकाळी पाऊस पडला. पावसामुळे भिंत कोसळून चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बाळापूर तालुक्यातील हातरुण येथे घडली. भिंतीखाली दबल्याने सै. हसनैन सै. बिस्मिला कुरेशी (८) हा मुलगा मृत्युमुखी पडला. दरम्यान गुरुवारपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर शेतमाल ठेवण्यासाठी जागा उपलब्ध आहे की नाही, याची शेतकऱ्यांनी अडत्यांशी संपर्क करावे, असे आवाहन अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीकडून करण्यात आले आहे.

बाजार समितीत आवक वाढली गत काही दिवसांपासून कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनीची आवक वाढली आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवस पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे शेतमाल बाजार समितीमध्ये विक्रीस आणण्यापूर्वी आडत्यासोबत संपर्क करून शेतमाल उतरवण्यासाठी जागा उपलब्ध आहे की नाही, याबाबत विचारणा करावी. जागा नसल्यास व अचानक पाऊस आल्यास शेतमाल ओला होण्याची शक्यता आहे. अडत्याकडे चौकशी करूनच शेतमाल आणण्याचे नियोजन, असे बाजार समितीकडून जाहीर करण्यात आले आहे.

# मोक्षाचा मार्ग व मानवतेला दिशा देण्याचे काम संत करतात : संत रामपाल महाराज

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. २७ :

समाजात वाढत्या अंधश्रद्धा, अन्याय आणि मतभेद वाढले आहेत. मात्र यावर अंकुश ठेवण्यासाठी संतांचे मार्गदर्शनाची गरज असते. संत नसते तर या जगाचे काय झाले असते, याचा विचारच करु शकत नाही. मोक्षाचा मार्ग व मानवतेला दिशा देण्याचे काम संत करतात, असे मार्गदर्शन संत रामपालजी महाराज यांनी केले.



महात्मा ज्योतिबा फुले कॉन्व्हेंट जांभरुण बुलडाणा येथे आज २६ ऑक्टोबर रोजी आयोजित विशाल सत्संगात संत रामपाल बोलत होते. ते म्हणाले की, जो मूर्ति रहित परब्रह्म आहे, त्याचीच मूर्ती भगवान सदाशिव आहे. त्यांच्या शरीरातून एक शक्ति प्रकट झाली ती शक्ति अंबिका, दुर्गा (प्रकृति), त्रिदेवजननी (श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी यांना उत्पन्न करणारी माता) संबोधली गेली. तिला आठ भुजा आहेत. सदाशिव जे आहेत, त्यांना शिव, शंभू आणि महेश्वरसुद्धा म्हटले जाते. ते आपल्या सर्व देहभर भस्म लावतात. त्या कालरूपी ब्रह्मने एक शिवलोक नामक क्षेत्राची निर्मिती केली.

नंतर दोघांपासून एक पुत्र उत्पन्न झाला. त्याचे नाव विष्णू ठेवले. पुढे रुद्र संहितेच्या सातव्या अध्यायातील पान नं. १०३ वर ब्रह्माजींनी म्हटले आहे, की माझी उत्पत्ती सुद्धा भगवान सदाशिव (ब्रह्म काल) आणि प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून झाली. अशाप्रकारे ब्रह्मा, विष्णू आणि रुद्र या तीन देवतांमध्ये गुण आहेत, परंतु शिव (काल ब्रह्म) गुणातीत मानला गेला आहे.

सदाशिव व प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून तीन देवांची (ब्रह्मा, विष्णू, महेश) उत्पत्ती झालेली आहे. तिन्ही भगवंतांची माता दुर्गाजी आहे. या तिघांचा पिता ज्योति निरंजन (काल ब्रह्म) आहे.

हेच तिन्ही प्रभु रजोगुणी-ब्रह्माजी, सत्गुणी-विष्णूजी व तमोगुणी-शिवजी आहेत. ब्रह्माजी यांचे कडे उत्पत्ति करणे, विष्णुजी कडे पालन पोषण करणे तसेच (महेश)शिवजी यांचे कडे संहार करणे म्हणजे मारणे या विषयावर संत रामपाल यांनी वेद, गीता आणि पुराणांतील प्रमाणांच्या आधारे सखोल विवेचन केले.

# ६० महिलांनी घरासह सजवले अंगण

■ महासागर प्रतिनिधी, खामगाव, दि. २७ :

जलंबच्या इतिहासात प्रथमच सुरभी सेवा बहुउद्देशीय संस्था व जलंब ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ घर सुंदर अंगण स्पर्धेचे आयोजन १८ ते २५ ऑक्टोबर या दरम्यान करण्यात आले आहे. या स्पर्धेत जलंब गावातील ६० महिलांनी सहभाग घेवून ही स्पर्धा यशस्वी केली आहे.

दिवाळीत महिलांनी आपली कल्पकता वापरून पर्यावरण पूरक वस्तूचा उपयोग करून घर व अंगण स्वच्छ ठेवायचे या दृष्टीकोनातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी स्पर्धक महिला आपल्या कल्पकतेतून आपले घर व अंगण सजवत आहेत आणि घरासमोरील अंगणात अप्रतिम अशा रंगी बेरंगी रांगोळ्याचा उपयोग करून रांगोळ्या काढत आहे. या रांगोळ्या नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. या स्पर्धेत सहभागी झालेल्या घर मालकांच्या घरांची २६ ऑक्टोबर रोजी सरपंच पती सुनील हेलोडे, सेवानिवृत्त केंद्र प्रमुख रामभाऊ धामणकर, सदस्य महेश गव्हादे, सुरभी सेवा बहुउद्देशीय संस्थेचे सचिव उद्धव नेरकर, ग्रामपंचायत कर्मचारी गणेश देवचे, राजू गव्हादे यांनी पाहणी केली. विजेत्यांचा गौरव स्पर्धेत घर व अंगण सजविणाऱ्या घर मालकांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षिस देण्यात येणार आहे. त्याच बरोबर गावातील प्रत्येक वार्डातील ५ उत्कृष्ट स्पर्धकांना सुध्दा आयोजकांच्या वतीने बक्षिसे देण्यात येणार आहे.

# शिक्षकांनी निःस्वार्थ वृत्तीने कार्य करावे : सीईओ मेश्राम

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २७ :

शिक्षण विभाग जिल्हा परिषदेतर्फे जिल्हास्तरीय शिक्षक गुणगौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन जिल्हा परिषद कर्मचारी भवन येथे करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या ९ आदर्श शिक्षकांचा जिल्हास्तरीय शिक्षक गुणगौरव पुरस्काराने प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. शिक्षकांनी निःस्वार्थ वृत्तीने कार्य करावे, असे आवाहन सीईओनी केले.




अध्यक्षस्थानी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके होते. कार्यक्रमाला उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी माया शिर्के, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य रत्नमाला खडके, शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार आणि उपशिक्षणाधिकारी कैलास राठोड उपस्थित होते. जिल्ह्यातील नऊ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या आदर्श शिक्षकांमधील नीलेश कवडे यांना महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सुद्धा गौरव करण्यात आला होता. सत्कार समारंभात स्पर्धा परीक्षा तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील ३७ शिक्षकांच्या कार्याचा गौरव प्रशस्तिपत्र देऊन करण्यात आला. सोबतच तालुकास्तरावर स्पर्धा परीक्षा संदर्भात निशुल्क वर्ग घेत असलेल्या तालुक्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन साहेबराव मोरडे यांनी तर आभार शिक्षण विस्तार अधिकारी श्याम राऊत यांनी मानले. या सत्कार समारंभाला जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख व सर्व मुख्याध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक रतनसिंग पवार यांनी केले. सीईओ अनिता मेश्राम यांनी जिल्हा परिषद शाळेतील गुणवत्ता वाढवण्यासाठी जिल्ह्यात सुरू असलेल्या शैक्षणिक उपक्रमांचा गौरव केला. या पुरस्कारापासून प्रेरणा घेऊन शिक्षकांनी निःस्वार्थ वृत्तीने सर्व काम करावे असे आवाहन त्यांनी शिक्षकांना केले. अध्यक्षीय भाषणात विनय ठमके यांनी पुरस्कार व कार्य गौरव सन्मान प्राप्त शिक्षकांमुळे जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळा संदर्भात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

## जि. प. च्या प्रारूप मतदार यादीवरील १८ आक्षेप निकाली

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २७ :

जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गणांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केल्यानंतर प्रशासनाकडे एकूण 18 आक्षेप दाखल झाले होते. त्यावर प्राधिकृत मतदार अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन वरील आक्षेप निकाली काढले आहेत. आता 27 ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. यात 16 लाख 61 हजार 537 मतदार संख्या समाविष्ट आहेत. जिल्हा परिषद गट आणि गणांच्या प्रारूप आरक्षणावरही आक्षेप मागविण्यात आले होते. अखेरच्या दिवसापर्यंत एकूण 18 आक्षेप दाखल झाले होते. सोमवारी सदर आक्षेप शिफारशीसह विभागीय आयुक्तांकडे पाठविले जाणार आहेत. त्यानंतर आक्षेप विचारात घेऊन योग्य त्या कार्यवाहीच्या सूचना निवडणूक विभागाला दिल्या जातील. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर 3 नोव्हेंबर रोजी अंतिम आरक्षणाची अधिसूचना आयुक्त प्रसिद्ध करणार आहेत.

प्रशासनाला गट, गणांची रचना, सभापतीपदाचे व गट-गणांचे आरक्षण, मतदारयादी संदर्भात कार्यवाही करण्यासाठी कार्यक्रम आखला आहे. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत यापूर्वीच मुंबईत काढण्यात आली. आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निवडणूक विभागाकडून निवडणुकीची तयारी केली जात आहे. जिल्हा परिषदेची प्रारूप मतदार यादी गत आठवड्यात प्रसिद्ध करण्यात आली होती.

# मुकेश सारवान यांचा जिल्ह्यात सत्कार सोहळा



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २७ :

मूळ निवासी नागवंशी भारतीय नागरिक उपेक्षित असल्याची खंत व्यक्त करत सामाजिक न्याय आणि परिवर्तनासाठी कार्यरत असलेले महाराष्ट्र राज्यातील सफाई कर्मचारी कामगारांचे आशास्थान, सामाजिक चळवळीचे प्रणेते मुकेश सारवान यांच्या अकोला जिल्ह्यात आगमनानिमित्त त्यांचा विविध सामाजिक संघटनांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. या स्वागत सोहळ्यात महाकाल संघटनांचे सर्वेसर्वा गोंट्या गोडाले, शिवराज सफाई कर्मचारी सेना जिल्हाध्यक्ष रणजीत गोडाले, महिला शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय मंडळ महाराष्ट्र राज्य सर्वेसर्वा चंद्रप्रभा शेगोकार, संत रविदास सामाजिक सेवा संस्था संस्थापक संतोष वानखेडे, संत रोहिदास पंचायत सदस्य दिनेश काकडे, मुस्लिम सामाजिक संघटनांचे सर्वेसर्वा आझाद खान मेहकर, वाल्मिकी बावनी पंचायत मिथुन बारसे, महाराष्ट्र राज्य उपेक्षित दलित सामाजिक परिषद सिकंदर मदार्ने, अखिल भारतीय वाल्मिकी महापंचायत, महाकाल संघटना हिंमत खरारे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ कर्मचारी अन्नू डुलगज, युवा सेना जिल्हाध्यक्ष जीत चडाले, मुकेश कोपरे, विशाल सारवान, महाराष्ट्र राज्य सफाई मजदूर काँग्रेस, सुदर्शन समाज, सिंधी पंचायत विनोद मोटवानी, दिव्यांग प्रहार संघटनांचे संजय झालटे, तसेच विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमानंतर मुकेश सारवान यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, मी लवकरच विदर्भ दौऱ्यावर येऊन विविध प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

# अक्षय नागलकर हत्याकांडातील आणखी ४ आरोपी अटकेत

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २७ :

जुन्या शहरातील अक्षय नागलकर हत्याकांडातील फरार ४ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने रविवारी अटक केली. या प्रकरणात आतापर्यंत अटक केलेल्या आरोपींची संख्या ८ झाली आहे. अटकेतील मुख्य आरोपी चंद्रकांत बोरकरसह चौघा आरोपींना न्यायालयाने १ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. आरोपींची संख्या नऊ झाली आहे. शिवा माळी हा आरोपी अद्याप फरार आहे.



पोलिसांनी यापूर्वी मुख्य आरोपी चंद्रकांत महादेव बोरकर (रा. शिवसेना वसाहत), अशोक उर्फ ब्रम्हा पांडुरंग भाकरे (रा. मोरगाव भाकरे), क्रिष्णा वासुदेव भाकरे (रा. मोठी उमरी) आणि आशू उर्फ आशिष शिवकुमार वानखडेरा. जुने शहर, अकोला) यांना अटक केली होती. स्थानिक गुन्हे शाखेने रविवारी रोहित गजानन पराते (रा. पार्वती नगर, बाळापूर नाका, अकोला), अमोल अजाबराव उन्हाळे (रा. हरीहरपेठ, जुने शहर, अकोला), नारायण गणेश मेसरे (रा. बाळापुर, जि. अकोला), आकाश बाबुराव शिंदे (रा. भौरद, जि. अकोला) अशा चौघांना अटक केली. यातील पराते व उन्हाळे या दोघांना अहिल्यानगर येथून, मेसरे याला बाळापूर येथून, तर आकाश शिंदे याला अकोला रेल्वे स्टेशनवरून ताब्यात घेण्यात आले. शिवा रामा माळी हा एकच आरोपी फरार आहे.

# बोंडगाव जिल्हा परिषद शाळेत पर्यावरणपूरक दीपोत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. २७ :

प्रत्येक घराचा आपल्या हक्काचा, समतेचा व ज्ञानाचा एक दिवा शाळेत लावावा. तसेच प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी, या आवाहनाला प्रतिसाद देत बोंडगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची प्रतिज्ञा घेऊन २१ ऑक्टोबर रोजी दिवाळीचा दीपोत्सव साजरा करण्यात आला.

नवीन पोषाख परिधान करून विद्यार्थी दिवा घेऊन सायंकाळी सहा वाजता शाळेत आले. दिव्यांच्या प्रकाश झोतात पहिलेच रंगीबेरंगी सजावट, हिरवाईने नटलेल्या शाळेने गुलाबी पिवळा शालू पांघरल्याचे अतुलनीय दृश्य उपस्थित विद्यार्थी व गावकऱ्यांनी अनुभवले. यानिमित्त पर्यावरणपूरक फटाकेमुक्त दिवाळीचा विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांनी व पालकांनी सुद्धा आनंद लुटत अंधारातून प्रकाशाकडे नेणारा या दीपोत्सवातून एकात्मतेचा संदेश घराघरात पोहोचवण्याचा हा प्रयत्न होता. तसेच दिवाळी सुटीत अभ्यासापासून मुले दूर जावू नयेत, म्हणून दिवाळीच्या अभ्यासासोबतच मुलांना शिक्षकांच्या वतीने पेनांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला शाळा समिती अध्यक्ष प्रवीण इलामे, सरपंच रामा पाटील थारकर, विनायक ईलामे, शाळा समिती सदस्य अजय अंदुरकार, संगीता अंदुरकार, वंदना ईलामे, मनोरमा थारकर, दत्ता ईलामे यांच्यासह पालक उपस्थित होते. मुख्याधपक डिगांबर काकड व शिक्षिका वर्षा काकड यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले.

# अवैध धंदे बंद करा

## शिवसेनेचे कडक कारवाईचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
जळगाव जामोद, दि. २७ :

तालुक्यात पोलिसाच्या आशिवार्दाने सुरू असलेले अवैध धंदे तत्काळ बंद करण्यात यावे, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने २५ ऑक्टोबर रोजी एका निवेदनाद्वारे ठाणेदार यांच्या मार्फत उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याकडे केली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनानुसार मागील काही दिवसापासुन तालुक्यात अवैध धंद्यांनी थैमान घातले आहे. वरली मटका, जुगार, गुटखा व अवैध दारू तसेच अवैध वाळु वाहतुक करण्यात येत आहे. सुरू असलेल्या अवैध धंद्याना पोलिसांचे अभय असल्याने अनेक नागरिकांचे संसार उध्वस्त झाले आहेत तालुक्यातील अनेक गावातील महिलांनी या अगोदर पोलीस स्टेशनला बऱ्याच वेळा निवेदन दिले आहे. परंतु आजही अनेक गावात दारूची अवैध विक्री करण्यात येत आहे.




त्यामुळे सर्रास किराणा दुकान व टपरिवर गुटख्याची विक्री करण्यात येत आहे. त्यामुळे सुरू असलेले अवैद्य धंदे २ नोव्हेंबर पर्यंत बंद करण्यात यावे, अन्यथा पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसैनिकांनी दिला आहे. निवेदन देताना शिवसेना तालुकाप्रमुख संजय धुळे, देविदास घोपे, संजय भुजबळ, मिर्झा बेग, प्रकाश भुंगटे, विजय चित्रे, प्रकाश तायडे, चेतन उगले, नारायण धुळे, मंगेश टाकसाळ, पप्पु वानखडे, बाळू पाटील उपस्थित होते.

SBI स्टेट बँक ऑफ इंडिया State Bank of India

शाखा - भिवापूर

एसबीआय भिवापूर, तहसिल भिवापूर, जिल्हा नागपूर

वाहन लिलाव सूचना

भारतीय स्टेट बँक शाखा भिवापूर वाहनांची विक्री करिता "जसे आहे जेथे आहे", या आधाराव अर्ज आमंत्रित करीत आहे.

| अ. क्र. | नाव | वाहनांचे विवरण | राखीव किंमत | ईएमडी (राखीव किंमतीच्या 10%) | बोली वाढीव रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मेसर्स केजीएन एग अँड किराणा स्टोअर्स प्रोप्रा. मोहम्मद. झाकीर नजीर शेख | नोंदणी - MH40CD9074 निर्माण आणि मॉडेल - TATA ACE GOLD+ तारीख नोंदणी - 19/06/2022 | रु. 1,75,000/- | रु. 17,500/- | रु. 2000/- |

वरील विवरणाचे वाहन ऑफलाईन पध्दतीने लिलाव करण्यात येत आहे. इच्छुक पार्टी वाहनांचे निरीक्षणाकरीता श्री. अनिल वानखेडे, मो. नं. 9822638370 यांना दिनांक 02/11/2025 ला सकाळी 11:00 ते सायं 5:00 वाजे दरम्यान संपर्क करु शकतात.

इच्छुक व्यक्तींनी बंद लिफाफ्यामध्ये अर्ज करुन, (अर्जा सोबत भारतीय स्टेट बँक भिवापूर शाखा यांच्या नावे ईएमडीचा डीडी व आपले आधार कार्ड जोडावे) भारतीय स्टेट बँक शाखा भिवापूर येथे दि.03/11/2025 दुपारी 04:00 पर्यंत जमा करावे. राखीव किंमतीपेक्षा कमी रक्कमेचा अर्जाचा विचार केला जाणार नाही, लिलाव दि. 04/11/2025 रोजी दुपारी 01:00 ते 02:00 वाजता करण्यात येईल, ज्या व्यक्तीची ऑफर रक्कम जास्त राहील त्या व्यक्तीला सर्वाधिक बोली लावणारा घोषित करण्यात येईल. उच्चतम बोलीदाराला पुढील कार्यालयीन दिवशी 15% रक्कम जमा करावी लागेल. व उर्वरित रक्कम 15 दिवसात भरावी लागेल

कोणत्याही कारणानी लिलाव स्थगित किंवा निविदा अर्ज नामंजुर करण्याचा अधिकार बँकेचे सक्षम अधिकारी यांना राहील. अधिक माहितीकरीता भारतीय स्टेट बँक, भिवापूर शाखा यांच्याशी संपर्क साधावा.

शाखा प्रबंधक
भारतीय स्टेट बँक, भिवापूर शाखा

(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर

ई मेल :-constdivnagpur.cc@mahapwd.gov.in (दूरध्वनी क्र. ०७१२-२५६२९७६)

ई - निविदा सुचना क्रमांक ३३ सन २०२५-२०२६

(मजुर सहकारी संस्थेकरीता)

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) बांधकाम संकुल सिव्हील लाईन्स, नागपूर (महाराष्ट्र बांधकाम खात्याकडून ) खालील कामांकरीता निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करणार नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बी-१ प्रपत्र नमुन्यातील निविदा (Percentage Rate) ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (रू.लक्ष) |
|---|---|---|
| १ | तालुका मौदा माथनी येथील अर्धनारी नटेश्वर मंदीर घाट येथे पर्यटन विकास कामे करणे. ता. मौदा जि. नागपुर | रु. ४१.०० लक्ष |
| २ | तालुका पारशिवनी येथे बॅकवर्ड क्लास बॉइज हॉस्टेल येथील कंम्पाउंड वॉलचे बांधकाम करणे. ता. पारशिवनी जि. नागपुर | रू. ४९.०० लक्ष |

ई-निविदा उपलब्ध कालावधी: As per e-tender schedule uploaded on e-portal http://mahatenders.gov.in
निविदापूर्व बैठक:- As per e-tender schedule uploaded on e-portal http://mahatenders.gov.in
ई-निविदा उघडणे:- (ऑनलाईन नमूद केलेले वेळापत्रक लागू व अंतिम राहील.)

१) https://mahatenders.gov.in सूचना फलकावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. (सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वृत्तपत्रीय शुध्दीपत्रक न देता वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर कार्यालयातील सूचना फलक
३. पत्रव्यवहाराकरीता संपर्क व पत्ता: उपरोक्त नमूद केलेल्या ई-मेल किंवा दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
४. वरील निविदा डाऊनलोडच्या तारखेला ७२ तासात निविदाची तसेच लिफाफा १ मध्ये दस्ताएवजाची प्रत या विभागात सादर करण्यात यावी.

जावक क्रमांक ६५७९ / निविदा लिपीक/दि.१३/१०/२०२५

(पराग ठमके)
कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प)
नागपूर

क्र. संमावज/नाग/५४५/ २०२५

# फीट अनफीटच्या खेळात डॉक्टरचा बळी!

शासकीय रुग्णालयात कुणाला फिट ठरवायचे आणि कुणाला अनफीट करायचे हे डॉक्टरांच्याच हातात असते. त्यामुळेच राज्यातील अनेक शासकीय रुग्णालयात हा खेळ सुरू असतो. त्यात एखाद्या निरपराधाचा बळी जातो. पण अशाच प्रकारच्या खेळात फलटण येथे एका महिला डॉक्टरचा बळी गेल्याची दुःखद घटना सरकारची झांज उतरवणारी ठरली आहे. सध्या शासकीय रुग्णालये व पोलीस खाते म्हणजे भळभळत्या जखमा झाल्या आहेत. त्यातच सरकारचा आशीर्वाद एखाद्याला असेल, तर तो साव ठरतो. फलटणच्या प्रकरणात भाजपच्या माजी खासदाराचा व त्याच्या पीएचाही समावेश असल्याची चर्चा राज्य कोणत्या दिशेने निघाले हे अधोरेखित करते. बीडमधील शेतकरी कुटुंबातील मुलगी शिकते, डॉक्टर होते, फलटणसारख्या ठिकाणी शासकीय रुग्णालयात सेवा बजावते. पण रक्षक समजले जाणारे पोलीसच भक्षक बनतात. ती तक्रार करते पण तक्रार घेतली जात नाही. शेवटी ती हातावर आरोपींची नावे लिहून जीव देते. जिजाऊ व सावित्रीच्या लेकी जर अशा जीव देऊ लागल्या तर या राज्याला पुरोगामी तरी का म्हणावे? या प्रकरणातील खलनायक पोलीस खात्यातील असल्याने आता गृहमंत्री या नात्याने मुख्यमंत्री काय भूमिका घेतात हे पहावे लागेल. असं म्हणतात की, पोलिस उपनिरीक्षक असलेला गोपाळ बदने महिलांची छेड काढायचा, डोळा मारायचा, तक्रार केल्यास पैसे मागायचा. आता डॉक्टर तरुणीच्या प्रकरणाने संशयित आरोपी तोंड लपवत निघाला. जर तो निर्दोष असेल तर त्याने फरार का व्हावे? एका सरकारी रुग्णालयातील डॉक्टर तरुणीने हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली, या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. आत्महत्येपूर्वी डॉक्टर तरुणीने स्वतःच्या हातावर 'माझ्या मरण्याचे कारण पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने असून, त्याने चारवेळा माझ्यावर अत्याचार केला, तसेच प्रशांत बनकर याने मागील चार महिने शारीरिक व मानसिक छळ केला,' असे लिहून ठेवले आहे. याप्रकरणी फलटण शहर पोलिस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर यांच्यावर मानसिक व शारीरिक त्रास, तसेच लैंगिक अत्याचार गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी पोलिस अधिकाऱ्याला निलंबित केले असून, पहाटेच्या सुमारास प्रशांत बनकरला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या निमित्ताने पोलिस खात्यातील कारभार चव्हाट्यावर तर आलाच पण शासकीय रुग्णालयातील कारभार कसा चालतो हे जाता जाता या महिला डॉक्टरने पुन्हा एकदा सरकारला दाखवून दिले. अधिक संतापजनक आणि दुःखद गोष्ट अशी की, रयतेतील स्त्रीची बेअब्रू केल्याप्रकरणी ज्या शिवछत्रपतींनी रांझ्याच्या पाटलाचा चौरंगा केला होता, त्यांचे वारस म्हणवून घेणारे राजकारणी, याच सातारा जिल्ह्यात लोकप्रतिनिधी आहेत, त्यांनाही अशा गोष्टींची चाड नसावी हे मस्तकात तिडीक आणणारे आहे!





गुन्हेगाराला जात, पात, धर्म, देश नसतो हे डॉ. संपदा मुंडेंच्या घटनेमुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले. घटनेचे ठिकाण जरी फलटण असले, तरी मयत डॉ. संपदा आणि आरोपी गोपाळ हे दोघेही बीड जिल्ह्यातीलच असल्याने गुन्हेगारी वृत्तीचा डाग पुन्हा एकदा गडद होताना दिसतोय.

मायबाप पोटाला चिमटा काढून मुला मुलींना डॉक्टर, इंजिनियर बनवतात आणि लेकरं देखील जिवाचं रान करुन अत्यंत कठोर परिश्रमाने शिक्षणाचे दिव्य पार पाडतात ते या नराधमांनी त्यांना मारुन टाकण्यासाठीच का? या लेकरांच्या जिवाशी खेळणाऱ्या नराधमास आणि त्याला पाठीमागे घालणाऱ्या लोकप्रतिनिधींस कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहीजे.

निरपराध व्यक्तीचा हकनाक बळी गेल्यानंतरच कारवाई करण्याचा आपल्याकडे पायंडा पडलेला आहे आणि आपल्या हे अंगवळणी पडलेय. काही कोडगे याचेही समर्थन करताना दिसतात, ही त्याहून अधिक शरमेची बाब. एखाद्या व्यक्तीला न्याय द्यायचा असेल तर त्या व्यक्तीच्या हयातीत आणि शक्य तितक्या जलदगतीने निष्पक्षपातीपणे द्यायला पाहिजे ही साधी अपेक्षाही आपण ठेवू शकत नाही का? हे सर्व लाजिरवाणे आहे.


दरम्यान या प्रकरणात आरोप झालेल्या पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदनेबाबत काही धक्कादायक माहिती समोर आली. फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयात आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांकडून पोलीस उपनिरीक्षक बदनेवर गंभीर आरोप करण्यात आले. बदने हा महिलांची छेड काढायचा, डोळा मारायचा आणि तक्रार केल्यास पैसे मागायचा असं रुग्णांची नातेवाईक असलेल्या एका महिलेने म्हटलं आहे. तो अद्याप फरार असून त्याचा पोलिस शोध घेत आहेत.

या महिलेने बदनेवर आरोप करताना सांगितलं की, सदर डॉक्टर माझी भाची होती. डॉक्टर अंशुमन धुमाळ यांचाही उल्लेख यात आहे. रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात येऊन बदने धमकावल्याचे आणि इतर पोलिस अधिकाऱ्यांना त्रास दिल्याचे अनेक आरोप आहेत. या सगळ्याबद्दल या डॉ. धुमाळ यांना विचारले असता त्यांनी मला माहिती नाही, माझ्याकडे हा खुलासा करण्यात आला नव्हता अशी उत्तरं दिली आहेत.

मुळातच शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा अधीक्षक पैशासाठी कोणत्याही थराला जातात, याची अनेक उदाहरणे महाराष्ट्राने पाहिली आहेत. पैसा कमविण्याच्या नादात ते काय करतील, याचा नेम राहिलेला नाही. नमुना म्हणून नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयातील कारभार पाहिला, तरी संपूर्ण राज्याचा अंदाज येऊन जाईल. पण या सर्व अधिकाऱ्यांचे साटेलोटे मुंबईत मंत्रालयात पोहोचलेले असतात. त्यांचे निलंबन जरी झाले तरी थोडसं विस्मरण होताच पुन्हा त्यांची पुनर्नियुक्ती केली जाते.

फलटणच्या प्रकरणातील पोलीस उपनिरीक्षकाचंही तेच होणार आहे. अनेक घटनांमध्ये मृतांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठ्या गायब करण्याचे प्रकार घडतात म्हणूनच फलटण प्रकरणातील डॉक्टर तरुणीने गळफास घेण्यापूर्वी तळहातावर आत्महत्येचे कारण लिहिले आहे. पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असे म्हणतात.

याप्रकरणी गुन्हा दाखल असल्याचे आणि सखोल तपास केला जाईल, असे त्यांनी सांगितले आहे. आता हातावरील मजकूर हाच महत्त्वाचा पुरावा मानला जात असून, त्या दिशेने पोलिस तपास करीत आहेत.



थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९११४२०

या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतली असल्याचे सांगितले जात असले, तरी आपल्याच पक्षाच्या माजी खासदाराचा या प्रकरणात उल्लेख होत आहे, याची जाणीव त्यांना आहे की नाही माहित नाही. पण त्यांनी संबंधितांना जाब विचारणे गरजेचे आहे. त्यांना निलंबित करणे किंवा वैद्यकीय अधीक्षकांना नोटीसा काढणे या बाबी आता किरकोळ झाल्या आहेत. कारण भ्रष्टाचाराच्या प्रकरणात पकडल्या गेलेल्या अनेकांना तातडीने निलंबित करण्यात येते व यथावकाश त्यांना पुन्हा मलईदार ठिकाणी नेमणूक दिली जाते. अशी अनेक उदाहरणे या राज्याने पाहिली आहेत व पहातदेखील आहेत.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी फलटणमध्ये सर्व शासकीय कामात सत्ताधारी आमदार सचिन कांबळे आणि अभिजित निंबाळकर यांचा हस्तक्षेप असतो, असा दावा केला आहे. ते विरोधी गटातील नेता असल्यामुळे त्यांनी केलेला आरोप सरकार किती गांभीर्याने घेतात हे पाहावे लागेल!

## तब्बल २१ वेळा तक्रार देऊनही दखल नाही?

फलटणमधील या महिला डॉक्टरने तिला त्रास दिला जात असल्याची तक्रार तब्बल एकवीस वेळा दिली होती, तरीही तिची दखल घेतली गेली नव्हती. सतत दडपणाखाली राहून तिचे मानसिक संतुलन ढळले. तिचे शोषण केले गेले. त्यास कंटाळून तिने आत्महत्या केली. एखादी डॉक्टर तरुणी एकवीस वेळा तक्रार करूनही तिला न्याय मिळत नसेल आणि तिचा जीव गेल्यानंतर कारवाई केली जात असल्याचा देखावा निर्माण केला जात असेल तर अशा कारवाईचे काय लोणचे घालायचे का? पोलिस उपनिरीक्षक पाटील, सहाय्यक पोलिस निरीक्षक जायपत्रे, पोलिस उपनिरीक्षक बदने या तिघांची नावे या तक्रारीत आहेत. या तक्रारीवर कारवाई झाली असती तर तिचा जीव वाचला असता. मात्र तक्रार आली तर कचऱ्याची टोपली दाखवायची हा शिरस्ता झाला आहे, सरकार वा प्रशासनाविरोधात काही बोललं लिहिलं गेलं की त्याला लगोलग देशविरोधी ठरवता येत असल्याने अशांचे फावत आहे. जे लोक अजूनही अशा गोष्टीत मौन बाळगून आहेत वा समर्थन करताहेत त्यांच्यापैकी कुणावरही ही वेळ येऊ शकते. इथे कुणीच कायमस्वरूपी सुपात राहू शकणार नाही, सारेच जात्यात भरडले जाऊ शकतात. गुन्हेगारी प्रवृत्तीना जरब राहिलेली नाही हेच खरे वास्तव आहे.

## डॉ. संपदा मुंडे यांच्यावर सततचा दबाव?

फलटणच्या प्रकरणातील गुन्हेगारांना शिक्षा होवो अथवा न होवो, परंतु तेथील पोलीस अधीक्षकाने नेमकी काय भूमिका घेतली होती, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. कारण आपल्याच भावंडांना सांभाळण्याची भूमिका या खात्याकडून नेहमी होत असते. या प्रकरणातील पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने याने डॉक्टर महिलेवर चार वेळा बलात्कार केला. तर प्रशांत बनकर याने सतत शारीरिक आणि मानसिक छळ केला. पोस्टमोर्टम रिपोर्ट बदलून देण्यासाठी डॉ. संपदा मुंडे यांच्यावर दबाव टाकला जात होता अशी माहिती समोर येत आहे व त्यात तथ्यही दिसते. राज्यातील पोलिस प्रशासन अतिशय निर्ढावलेले आहे.
अनेकदा गुंडांना पाठीशी घालणे, पोलिस कोठडीत कैद्यांना जबर मारहाण करून त्यांचा बळी घेणे, असे प्रकार वाढले आहेत व ते थांबण्याचे नावही घेत नाही. त्यामुळे पोलिसांची मुजोरी वाढली आहे. डॉ. संपदा मुंडे यांनी यापुर्वी पोलिसांकडून त्रास होत असल्याची तक्रार केली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे हतबल होऊन त्यांना आत्महत्या करावी लागली असेल, तर हे कायदा सुव्यवस्थेच्या आणि महिला सुरक्षेच्या नावाने धिंडोरे पिटणाऱ्या सरकारचे अपयश आहे.

## फोन करणारे ते खासदार नेमके कोण?

मिळालेल्या माहितीनुसार सातारा पोलिसांकडून एखादा आरोपी अटक केल्यानंतर त्याला रात्री वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात नेले जायचे. त्या वेळी जर या डॉक्टर ड्युटीवर असायच्या. अशावेळी आरोपीला फिट असूनही अनफिट घोषित करून रुग्णालयात दाखल करायच्या. माहितीनुसार, रात्री आरोपींना रुग्णालयात आणल्यामुळे डॉक्टरचा अतिरिक्त कामाचा ताण वाढायचा. त्यामुळे आपलं काम कमी करण्यासाठी त्या आरोपींना फिट असूनही अनफिट घोषित करून दाखल करायच्या. हे प्रकरण तीन ते चार वेळा घडल्यानंतर पोलिसांनी जिल्हा मेडिकल कौन्सिलकडे तक्रार केली होती. या तक्रारीवर मेडिकल कौन्सिलने डॉक्टरकडून स्पष्टीकरण मागितले असता, डॉक्टरने दिलेले उत्तर सर्वांनाच आश्चर्यचकित करणारे होते. डॉक्टरने सांगितले की, एका खासदाराचा फोन आला होता आणि त्याच्याकडून दबाव टाकण्यात आला होता. मात्र, त्या खासदाराचे नाव तिने उघड केले नव्हते. हे प्रकरण त्या वेळच्या घटनेपुरते मर्यादित होते आणि आत्महत्येशी थेट संबंधीत नव्हते. आता पोलिसांनी ठरविलेच तर ते खासदार नेमके कोण? याचा सहज उलगडा होईल. परंतु ते होणे कदापिही शक्य नाही असे वाटते.




## : शासनकर्ती जमात : स्वाभिमानाचा प्रवास आणि संघर्षाचा संकल्प

भारतात आज प्रत्येक घटक सत्तेच्या केंद्रात पोहोचण्याची आकांक्षा बाळगतो. पण शासनकर्ती जमात बनणे म्हणजे केवळ निवडणुकीत जिंकणे नाही, तर विचाराने, संघटनाने आणि आत्मभानाने समाजाला दिशा देणे होय.

केवळ संख्या नाही, तर सामर्थ्य, एकजूट आणि जागृती हाच खरा सत्तेचा पाया आहे. कारण संख्येने मोठे असणे पुरेसे नाही, विचाराने, संघटनेने आणि कृतीने सक्षम बनल्याशिवाय सत्ता हातात येत नाही. अंतर्गत मतभेद आणि उपगटवाद जे थांबवतात प्रवास. आपला समाज उपजतच विभागला गेला आहे. जात, पंथ, संस्था आणि अहंकार यांच्या भिंतींनी. आपण सारे एकच ही भावना अजूनही कृतीत उतरलेली नाही. नेतृत्वाचा अभाव आणि सत्तालालसा मुळे खरे लोकनेते मागे पडतात, संधीसाधू पुढे येतात. नेतृत्व ही जबाबदारी नव्हे तर प्रतिष्ठेची जागा बनली आहे.

जनतेचा विश्वास या स्वार्थी खेळांमुळे हरवत चालला आहे. शिक्षण आणि अर्थव्यवस्थेतील कमजोरीमुळे शासन हे ज्ञानावर आणि संपन्नतेवर उभे असते. शिक्षणाचा प्रकाश आणि आर्थिक स्वावलंबन हेच सत्तेचे खरे शस्त्र आहेत. जे आजही अनेकांना न मिळाल्याने समाज निर्णयक्षम होत नाही. धर्म, भाषा, प्रांत आणि जातीच्या नावाखाली समाजात फूट पाडली जाते. एकजूट मोडली की सत्ता हातातून निसटते. आपण सत्तेसाठी जन्मलो नाहीच्च ही मानसिक गुलामी अजूनही टिकून आहे. स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला नाही तर इतर आपल्या भविष्यावर नियंत्रण ठेवतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्रिसूत्रीची आज सर्वाधिक गरज आहे. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा. विचारशक्ती आणि विवेक विकसित केला तर कोणताही समाज झुकत नाही. सत्ता टिकवायची असेल तर आर्थिक स्वातंत्र्य अनिवार्य आहे. उद्यमशीलता, तंत्रज्ञान आणि व्यवसाय यात सहभाग वाढवावे लागेल.

वैयक्तिक महत्वाकांक्षा बाजूला ठेवा. सामूहिक विचार, सामूहिक निर्णय आणि सामूहिक नेतृत्व यांवर भर द्यावे लागेल. प्रत्येक गल्लीत, प्रत्येक गावात संघटनाचे बी पेरा. वाचनसंस्कृती, संवाद आणि बौद्धिक प्रबोधन वाढवावे लागेल. आपल्यात नेतृत्व करण्याची क्षमता आहे, हे प्रत्येकाने जाणले पाहिजे. आत्मसन्मानाचा जाज्वल्य भाव निर्माण झाला की सत्ता आपोआप आकर्षित होते.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

शासनकर्ती जमात होणे हा प्रवास एका पिढीचा नाही, तर शतकांचा संघर्ष आहे. पण या संघर्षात जर आपण विचार, संघटन आणि आर्थिक बळ या त्रिसूत्रीला स्वीकारले, तर तो दिवस दूर नाही, जेव्हा आपण केवळ मतदार नव्हे, तर सत्ताधारी आणि निर्णयकर्ते म्हणून इतिहास लिहू.

## हीरापूरचा 'डोलमेन' (मांडवगोटा) आशियातील सर्वात मोठा पुरातत्त्वीय ठेवा उपेक्षित

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यात वसलेले हीरापूर गाव आजही आपल्या कुशीत हजारो वर्षांपूर्वीचा इतिहास साठवून आहे. येथे असलेला हीरापूर मेगालिथिक डोलमेन कॉम्प्लेक्स (Hirapur Megalithic Dolmen Complex) हा अत्यंत महत्त्वाचा पुरातत्त्वीय ठेवा आहे. नागपूरपासून सुमारे ९२ किलोमीटर आग्नेय दिशेला पेरजगड-नागभीड पर्वतरांगांनी वेढलेल्या या भागात प्रागैतिहासिक काळापासून ऐतिहासिक युगापर्यंतच्या अनेक अवशेषांचा ठेवा सापडतो.

### इतिहास आणि पुरातत्त्वीय महत्त्व

सन १९६३ ते २००९-१० दरम्यान भारतीय पुरातत्त्व विभागाने, आणि नंतर २०१०-१३ मध्ये डेक्कन कॉलेज, पुणे तसेच स्थानिक हरित पर्यावरण मंडळ, शंकरपूर यांनी केलेल्या उत्खननांमधून येथे दोन डझनहून अधिक मेगालिथिक समाधी (burials) सापडल्या आहेत. यामध्ये डबल चेंबरड डोलमेन (Double Chambered Dolmen) या रचनांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

स्थानिक भाषेत या विशाल शिलाखंडांच्या रचनेला मांडवगोटा असे म्हणतात, कारण ती एखाद्या मंडपासारखी दिसते. या रचना बलुआ दगड आणि लेटराइट दगडांनी बनविल्या आहेत. पुरातत्त्वज्ञांच्या मते हा डोलमेन सुमारे १०,००० वर्षांपूर्वीचा असून आशियातील सर्वात मोठा डोलमेन मानला जातो.

त्या काळी मानव अस्थी प्रथम या कक्षांमध्ये दफन केल्या जात. काही काळानंतर त्या अस्थी पुन्हा बाहेर काढून त्यांची पूजा-अर्चना केली जात असे आणि नंतर परत तेथेच दफन केल्या जात. त्यामुळे हे ठिकाण फक्त समाधीस्थळ नव्हे तर एक सामाजिक, धार्मिक केंद्र असावे, असे तज्ज्ञांचे मत आहे.





डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
9422125656

### रचना आणि उत्खननातील सापडलेले अवशेष

डोलमेन संकुलातील उत्खननात आठ लहान तांब्याच्या मुद्रा, काचांच्या मण्यांच्या माळा, विटांच्या बांधकामाचे प्लॅटफॉर्म, तसेच मृतक कक्षांमधून विविध सिरॅमिक साहित्य सापडले आहे. यावरून हे ठिकाण फक्त समाधीस्थळ नव्हे, तर एक सुसंघटित सांस्कृतिक केंद्र होते हे स्पष्ट होते.

### सध्याची स्थिती : उपेक्षित वारसा

इतक्या मौल्यवान ऐतिहासिक वारशाची आज अत्यंत वाईट अवस्था आहे. संकुलात गवत आणि झुडपांनी जागा व्यापली आहे, रस्ते मोडकळीस आलेले आहेत, कोणतेही योग्य दर्शक फलक नाहीत आणि स्वच्छतेची वा देखभालीची काहीही व्यवस्था नाही.

दूरून हे ठिकाण ओळखूही येत नाही. स्थानिक लोकांमध्येही याची माहिती मर्यादित आहे आणि प्रशासनिक पातळीवर त्याला आवश्यक तेवढे महत्त्व मिळालेले नाही.

### विकास आणि पर्यटनाच्या दृष्टीने संधी

जर शासन आणि पुरातत्त्व विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले, तर हीरापूरला जागतिक पर्यटन नकाशावर स्थान मिळू शकते.

- येथे वारसा मार्ग (Heritage Trail) तयार करून नागपूर-चंद्रपूर सांस्कृतिक पर्यटन सर्किटशी जोडले जाऊ शकते.
- योग्य माहितीफलक, रस्त्यांची दुरुस्ती, प्रकाशव्यवस्था, व्याख्या केंद्र (Interpretation Centre) आणि मार्गदर्शक सुविधा निर्माण केल्यास हे स्थळ एक सजीव ऐतिहासिक आकर्षण ठरू शकते.
- स्थानिक तरुणांना प्रशिक्षण देऊन गाईड व पर्यटन सहाय्य केंद्र उभारल्यास रोजगाराच्या संधी निर्माण होतील.
- पुरातत्त्वीय दृष्ट्या हे ठिकाण महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशात अभ्यास आणि संशोधनाचे केंद्र बनू शकते.

### सरकारची भूमिका आवश्यक

इतके प्राचीन आणि वैशिष्ट्यपूर्ण मेगालिथिक डोलमेन स्थळ हे फक्त महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशाचे अभिमानाचे द्योतक आहे. या वारशाची माहिती शाळाझमहाविद्यालयांत, पर्यटन विभागाच्या प्रचारमाध्यमांत आणि प्रसारमाध्यमांतून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवली पाहिजे. जर शासनाने या स्थळाला संरक्षित स्मारक घोषित करून संरक्षण आणि पर्यटन विकासाची ठोस योजना राबवली, तर हीरापूर गाव केवळ ऐतिहासिक नकाशावर झळकणार नाही, तर भारताच्या प्राचीन सभ्यतेच्या गौरवशाली अध्यायाला नवी ओळखही मिळेल.

## यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करा!

वाचक लिहितात

'अतिथी देवो भवः' म्हणून ख्याती असलेल्या भारतात दरवर्षी लाखो विदेशी पर्यटक येत असतात. येथील प्राचीन भारतीय संस्कृती, येथील विविधतेतील एकता, परंपरा, पोशाख, भाषा त्यांना भुरळ घालते.

पर्यटनाच्या माध्यमातून दरवर्षी देशाच्या तसेच राज्यांच्या तिजोरीमध्ये अब्जावधी रुपयांची भर पडत असते. पाहुण्यांचा आदर करण्यास शिकवणारी, अतिथींमध्ये देवाचे रूप पाहणारी आपली संस्कृती पर्यटकांवर गारुड निर्माण करते. मागील काही वर्षांपासून मात्र काही विकृत मनोवृत्तीच्या धेंडांमुळे विदेशी पर्यटकांना भारतात वाईट अनुभव येऊ लागले आहेत. याच वर्षी हम्पी येथे पर्यटनासाठी आलेल्या इस्त्रायली तरुणीसह भारतीय तरुणीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना घडली होती. त्यापाठोपाठ दिल्लीत एक ब्रिटिश पर्यटकावर अत्याचार झाल्याची घटना वाचनात आली होती.

सिंहगडावरील घटनेने तर महाराष्ट्राचीही नाचक्की झाली होती. सिंहगडावर गियारोहणासाठी आलेल्या न्यूझीलंडच्या एका तरुण पर्यटकाला काही अल्पवयीन मुलांनी मराठीतील अश्लील आणि गलिच्छ शिव्या द्यायला लावल्या. नुकतीच इंदूरमध्ये ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटर्सचा विनयभंग झाल्याची घटना घडली.

आयसीसी महिला विश्वचषक खेळण्यासाठी भारतात आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाच्या दोन क्रिकेटपटू हॉटेलबाहेर पडत असताना दुचाकीवरून आलेल्या अकील खान नावाच्या इसमाने त्यांचा विनयभंग केला. या घटनेची पोलिसांकडून तातडीने दखल घेण्यात आली आणि तासांतच अकील खानला अटक करण्यात आली. या सर्व घटना आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा मलिन करणाऱ्या आहेत. एक सुसंस्कृत देश म्हणून जगभरात भारताची ख्याती आहे अशा सुसंस्कृत देशाची काही नराधमांमुळे आज बदनामी होत आहे. अशा नराधमांना आयुष्यभराची अद्दल घडेल आणि भविष्यात पुन्हा कोणी असे करण्यास धजावणार नाही अशाप्रकारची कठोर शिक्षा केली जाणे अपेक्षित आहे. देशाची प्रतिमा मालिन करणाऱ्या या धेंडांवर देशद्रोहाचाही गुन्हा प्रविष्ट करण्यात यावा!

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.



## नॉनवेज, पिज्झा, बर्गरपेक्षा हा गोड पदार्थ लिव्हरसाठी धोकादायक

फॅटी लिव्हर आजार हा सर्वात सामान्य आजार बनला आहे. अनेकांना यामुळे शरीरात त्रास होत आहे. दरवर्षी जगभरात अंदाजे 20 लाख लोक लिव्हरच्या आजाराने मरतात. फॅटी लिव्हरचा आजार जीवनशैलीच्या चुकीच्या सवयींमुळे आहे, तसेच चुकीच्या आहारामुळे होतो. लिव्हरचा हा आजार दोन प्रकारचा असतो एक म्हणजे अल्कोहोलिक फॅटी लिव्हर आणि नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर. यातील नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर आजाराचे रुग्णही वाढताना दिसत आहेत.

त्यामागचं कारण म्हणजे चुकीचे पदार्थ खाणे. अनेकांना असे वाटते की जास्त नॉनवेज खाल्ल्याने, तेलाचे-तुपाचे पदार्थ खाल्ल्याने किंवा जंक फूड खाल्ल्याने लिव्हरचा त्रास होतो. काही अंशी ते बरोबर देखील आहे. पण त्याहीपेक्षा एक घटक जो लिव्हरसाठी सगळ्यात धोकादायक मानला जातो. तो म्हणजे फ्रुक्टोज कॉर्न सिरप. हा पदार्थ यकृतासाठी सर्वात धोकादायक मानला जातो. हा घटक कोणत्या पदार्थांमध्ये आढळतो हे फार कमी जणांना माहित असेल.

अमेरिकेतील थायरॉईड आणि ढेउडर आरोग्य तज्ञ डॉ. एड्रियन स्झनाजडर यांनी इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे ज्यामध्ये त्यांनी यकृतासाठी कोणते पदार्थ सर्वात धोकादायक मानले जातात हे स्पष्ट केले आहे. जर या पदार्थांपासून दूर राहिले तर यकृताचे आरोग्य राखता येते.

हा घटक प्रक्रिया केलेले पदार्थ आणि गोड पेयांमध्ये आढळतो. जसे की कुकीज, कँडीज, तृणधान्ये, सॉफ्ट ड्रिंक्स आणि सॉस. जेव्हा हे पदार्थ खातो तेव्हा फ्रुक्टोज यकृतातील चरबीमध्ये रूपांतरित होतो. ज्यामुळे फॅटी लिव्हर आजाराचा धोका नक्कीच वाढतो. ताजी फळे खा आणि प्रक्रिया केलेले पदार्थ टाळा.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### असंवेदनशिलता..!

आटते आमची माया
आटते आमचे प्रेम
लाभ हानीच्या विचारांती
खेळतो आम्ही गेम...

नि:स्वार्थ प्रेमासाठी
मनी लागते उदारता
स्वार्थांध्यांना प्राप्त होईना
ती अलौकीक महानता..

मनाजोगतं झालं नाही
की मनी येते उदासिनता
त्यातून निर्माण होते कुटूंबात
समाजात पराकोटीची कटूता..!

# निथिया कॅपिटल आणि इव्होनिथ होल्डिंग्ज यांनी टॉपवर्थ उर्जा अँड मेटल्स लिमिटेडचे अधिग्रहण केले पूर्ण

**मुंबई, २७ ऑक्टोबर :** निथिया कॅपिटल (निथिया) आणि इव्होनिथ होल्डिंग्ज प्रा. लि. (इव्होनिथ) यांनी टॉपवर्थ उर्जा अँड मेटल्स लिमिटेड (उर्जा) चे एकूण ३०० कोटी रुपये ३४ दशलक्ष अमेरिकन डॉलर) इतक्या मूल्यात अधिग्रहण यशस्वीपणे पूर्ण झाल्याची घोषणा केली आहे. इव्होनिथ ही निथिया कॅपिटलची गुंतवणूक होल्डिंग कंपनी आहे.

ही निथिया कॅपिटलची भारतातील स्टील मालमत्तेची तिसरी यशस्वी खरेदी आहे. याआधी कंपनीने इव्होनिथ मेटॅलिक्स लिमिटेड (ईएमएल) आणि इव्होनिथ व्हॅल्यू स्टील लिमिटेड (एव्हीएसएल)१ पासून सुरुवात केली होती, त्यानंतर क्रेस्ट स्टील अँड पॉवर लिमिटेड (क्रेस्ट) चे अधिग्रहण केले. अधिग्रहणानंतर क्रेस्ट कंपनीचे यशस्वीरीत्या अमलगम स्टीलकडे विक्री करण्यात आले.

महाराष्ट्रातील नागपूरजवळ स्थित उर्जा ही ०.२ दशलक्ष टन वार्षिक क्षमतेची लाँग प्रॉडक्ट्स स्टील उत्पादक कंपनी आहे, ज्यात डायरेक्ट रिड्यूस्ड आयर्न उत्पादन, स्टीलनिर्मिती आणि रोलिंग मिल अशा एकात्मिक सुविधा आहेत. याशिवाय, कंपनीकडे ३५ मेगावॅट क्षमतेचे कॅप्टिव पॉवर प्लांट्स आणि महत्त्वाच्या थर्मल कोळसा खाण परवाने आहेत. स्टील उत्पादन क्षमता ०.५ दशलक्ष टनांपर्यंत वाढविण्यासाठी आणि वीज निर्मिती प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी मोठ्या पुनर्वसन आणि वाढीच्या गुंतवणूक योजनेचा विचार करण्यात आला आहे.

या अधिग्रहणाबाबत बोलताना इव्होनिथ स्टीलचे चेअरमन तसेच निथिया कॅपिटलचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जय सराफ म्हणाले, उर्जा चे अधिग्रहण हे निथिया साठी आणखी एक धोरणात्मक पाऊल आहे, ज्यामुळे कंपनीची स्टील उत्पादन क्षमता ६.० दशलक्ष टनांपेक्षा अधिक होईल आणि भारतात जागतिक दर्जाचे स्टील उत्पादन केंद्र उभे राहील. इव्होनिथ स्टीलची भारतातील कहाणी ही सेंद्रिय आणि असेंद्रिय दोन्ही प्रकारे वाढीवर केंद्रित आहे. आम्ही उर्जा ला या प्रदेशातील अग्रगण्य लाँग स्टील उत्पादक बनवण्याचा उद्देश ठेवला आहे, जसे आम्ही वर्धा येथील इव्होनिथ स्टीलसह केले. वर्धा युनिट आता ३.० दशलक्ष टनांची पूर्णपणे एकात्मिक स्टील उत्पादन क्षमता प्राप्त करण्याच्या दिशेने यशस्वीपणे वाटचाल करत आहे.

निथिया कॅपिटलने डिसेंबर २०२० मध्ये इव्होनिथ स्टीलचे अधिग्रहण केले, त्या वेळी कंपनी तोट्यात होती आणि ०.५ दशलक्ष टनांपेक्षा कमी क्षमतेने कार्यरत होती. सध्या कंपनी १.४ दशलक्ष टन उत्पादनासह अधिक व्यापक उत्पादन श्रेणी तयार करत आहे. कंपनीने उत्पादन वाढवले आहे, अनेक प्रकल्प पूर्ण केले आहेत, कामगिरी आणि नफ्यात लक्षणीय सुधारणा केली आहे आणि आता भविष्यातील वाढीसाठी मजबूत स्थितीत आहे.

उर्जा चे नॉन-एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आणि निथिया कॅपिटलचे भागीदार राजीव रंजन गुहा यांनी पुढे सांगितले, उर्जा चे अधिग्रहण आमच्या भारतातील मालमत्ता पोर्टफोलिओला वैविध्यपूर्ण उत्पादने प्रदान करते, म्हणजे फ्लॅट आणि लाँग स्टील उत्पादने दोन्ही. आता आम्ही उत्पादन वाढविण्यावर लक्ष केंद्रित करून या मालमत्तेला पुन्हा आर्थिक यशाकडे घेऊन जाण्यास उत्सुक आहोत. ही व्यवहाराची यशस्वी पूर्णता दिवाळखोरी आणि बँकिंग कोड (आयबीसी) च्या यशाचे आणखी एक प्रमाण ठरते.




## टोयोटा किर्लोस्कर मोटरने केली अर्बन क्रूझर हायरायडर एअरो एडिशन लॉन्च

### एक्सक्लुझिव्ह स्टाइलिंग पॅकेजसह

**बेंगळुरू, २७ ऑक्टोबर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आपल्या लोकप्रिय एसयूव्ही अर्बन क्रूझर हायरायडरचा नवा एअरो एडिशन लॉन्च केली आहे.हे लिमिटेड एडिशन पॅकेज हायरायडरला एक नवीन, प्रीमियम आणि डायनॅमिक लुक देते. एअरो एडिशनचे डिझाइन रस्त्यावर त्याला आणखी आकर्षक बनवते, ज्यामध्ये दमदार लुक आणि बारकाईने केलेली स्टाइलिंग यांचा अप्रतिम संगम आहे. हा एडिशन अशा ग्राहकांसाठी तयार करण्यात आला आहे, ज्यांना त्यांच्या वाहनात स्टाइल, वेगळेपणा आणि आधुनिक सोयींचे उत्तम मिश्रण हवे आहे.

२०२२ मध्ये लॉन्च झाल्यापासून अर्बन क्रूझर हायरायडर भारतीय एसयूव्ही ग्राहकांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरली आहे आणि अलीकडेच हिने १,६८,००० युनिट्स विक्रीचा नवीन टप्पा गाठला आहे. टोयोटाच्या जागतिक एसयूव्ही वारशावर पुढे चालत, हायरायडरने आपल्या मजबूत आणि आकर्षक डिझाइनसह तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या संगमाने सजग ग्राहकांची आवडती कार म्हणून स्थान मिळवले आहे.

या नव्याने डिझाइन केलेल्या एअरो एडिशन ॲक्सेसरी पॅकेजसह, हायरायडरचा प्रीमियम लुक अधिक उठून दिसतो. त्याचे डिझाइन रस्त्यावर इतरांपेक्षा वेगळे आणि खास भासते. एअरो एडिशन चार रंगांमध्ये उपलब्ध आहे पांढरा, सिल्व्हर, काळा आणि लाल. अर्बन क्रूझर हायरायडरची किंमत १०.९४ लाख (एक्स-शोरूम) पासून सुरू होते.

## सेंटर पॉइंट स्कूलतर्फे शैक्षणिक वर्ष २०२६२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**नागपूर, २७ ऑक्टोबर :** मध्य भारतातील शिक्षण क्षेत्रातील सर्वात विश्वासार्ह संस्थांपैकी एक असलेल्या सेंटर पॉइंट स्कूल तर्फे शैक्षणिक वर्ष २०२६२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इयत्ता १ ते १२ पर्यंतच्या वर्गासाठी अर्ज आता कटोल रोड, अमरावती रोड (बायपास), वर्धमान नगर आणि सेंटर पॉइंट स्कूल इंटरनॅशनल या सर्व शाखांमध्ये स्वीकारले जात आहेत.

प्रवेश प्रक्रिया सप्टेंबर २०२५ पासून मार्च २०२६ पर्यंत चालेल. मार्चनंतरचे अर्ज मध्यावधी प्रवेश म्हणून विचारात घेतले जातील.

गेल्या तीन दशकांपासून शाळा शैक्षणिक उत्कृष्टता आणि वैयक्तिक विकास यांचा समतोल साधणारे, दूरदृष्टी असलेले शिक्षण देत आली आहे. शाळेचा शिक्षणाचा दृष्टिकोन केवळ पाठ्यपुस्तकापुरता मर्यादित नसून त्यात क्रीडा, परफॉर्मिंग आर्ट्स आणि अनुभवाधारित शिक्षणाचा समावेश आहे, ज्यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासू, सक्षम आणि संवेदनशील व्यक्ती म्हणून घडतात.

सीबीएसई अभ्यासक्रम आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण यांच्याशी सुसंगत राहून सेंटर पॉइंट स्कूल विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक विचार, सर्जनशीलता आणि व्यावहारिक ज्ञानाचा विकास करते. त्याच वेळी, सेंटर पॉइंट स्कूल इंटरनॅशनल मध्ये केंब्रिज पाथवे अभ्यासक्रम राबवला जातो, जो जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त असून विद्यार्थ्यांसाठी जगभरातील उच्च शिक्षणाच्या संधी खुल्या करतो.

शाळेच्या प्रमुख उपक्रमांपैकी एक म्हणजे ORION, जो वरिष्ठ माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांची तयारी, उच्च शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय संधींसाठी आवश्यक कौशल्ये, मार्गदर्शन आणि अनुभव प्रदान करणारा विशेष कार्यक्रम आहे. तसेच शाळेचा क्रीडा आणि सहशैक्षणिक उपक्रमांचा आराखडा प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या क्षमता शोधण्याची आणि विकसित करण्याची संधी देतो.

या वर्षी शाळेच्या विविध शाखांमध्ये वर्धमान नगर येथे नवीन खेळाचे मैदान, कटोल रोड येथे क्रिकेट पिच आणि अमरावती रोड (बायपास) येथे वरिष्ठ ग्रंथालय अशी नवीन सुविधाही सुरू करण्यात आली आहेत ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक अनुभवांना नवी दिशा मिळाली आहे.

या प्रसंगी बोलताना सेंटर पॉइंट ग्रुप ऑफ स्कूल्सच्या संचालक प्राचार्या श्रीमती शिल्पी गांगुली म्हणाल्या, सेंटर पॉइंट स्कूलमध्ये आम्ही प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये महानतेची क्षमता आहे, असा विश्वास बाळगतो. २०२६२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करताना आमचा उद्देश तोच आहे असे वातावरण निर्माण करणे जे जिज्ञासा जागवते, आत्मविश्वास वाढवते आणि आयुष्यभरासाठी मूल्ये रुजवते. आम्ही सर्व पालकांना आमंत्रित करतो की त्यांनी सेंटर पॉइंट स्कूल कसे नागपूरमध्ये सर्वांगीण शिक्षणाचा नवा मापदंड निर्माण करत आहे, हे अनुभवावे.

## सॅमसंगकडून स्मार्ट, ऊर्जा-कार्यक्षम कूलिंगसाठी मेड-इन-इंडिया विंडफ्री कॅसेट एसी लाँच

**मुंबई, २७ ऑक्टोबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज त्यांच्या नवीन मेड इन इंडिया स्मार्ट विंडफ्री कॅसेट एअर कंडिशनर्सच्या लाँचची घोषणा केली. नवीन लाइनअपमध्ये सर्वोत्तम कनेक्टीव्हीटी, पर्यावरणपूरक डिझाइन आणि प्रीमियम आरामदायीपणाचे संयोजन आहे, जे व्यावसायिक व निवासी कूलिंग सोल्यूशन्सच्या भविष्याला सुधारते. स्मार्ट नियंत्रण, कार्यक्षम कामगिरी आणि सुधारित स्वास्थ्य देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या नवीन श्रेणीमध्ये विनासायास स्मार्टथिंग्ज एकीकरणासाठी बिल्ट-इन वाय-फाय आणि सॅमसंगचे अद्वितीय विंडफ्री कूलिंग तंत्रज्ञान आहे, जे अधिक थंडाव्याशिवाय सतत आरामदायीपणा देते आणि भारतभरातील वापरकर्त्यांना अधिक सोयीसुविधा व आरामदायीपणा देते. वापरण्यात आलेले पर्यावरणपूरक आर३२ रेफ्रिजरेण्ट शाश्वततेप्रती सॅमसंगच्या कटिबद्धतेची अधिक पुष्टी देते.

''आज आरामदायीपणा म्हणजे रूममध्ये फक्त थंडावा असण्यापर्यंत मर्यादित राहिले नसून अनुभव निर्माण करण्याबाबत आहे, जो सर्वोत्तम, शाश्वत असण्यासोबत भारतातील ग्राहकांच्या गरजांनुसार डिझाइन करण्यात आला आहे. आमचे नवीन विंडफ्री कॅसेट एसी अभिमानाने मेड इन इंडिया आहेत, तसेच डिझाइनची प्रीमियम आकर्षकता, पर्यावरणपूरक रेफ्रिजरेण्ट्सची खात्री आणि स्मार्टथिंग्ज कनेक्टीव्हीटीची सर्वोत्तमता देतात. हे एसी शक्तिशाली कार्यक्षमतेसह दीर्घकाळापर्यंत स्वास्थ्य देण्यासाठी, ऊर्जा बचत करण्यासाठी, पर्यावरणावरील परिणाम कमी करण्यासाठी आणि आरामदायीपणाचा नवीन अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत. या लाँचसह आम्ही मापदंड स्थापित करत आहोत, जेथे एअर कंडिशनिंग स्मार्ट, हरित आणि देशातील व्यवसाय व ग्राहकांच्या सर्वसमावेशक जीवनशैलीनुसार अधिक सर्वोत्तम असतील,'' असे सॅमसंग इंडियाच्या सिस्टम एसीचे प्रमुख विपिन अग्रवाल म्हणाले.




# विज्ञानरत्न डॉ.जयंत नारळीकर

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण स्वर्गीय डॉ जयंत नारळीकर यांना यंदाचा मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विज्ञानरत्न हा वैज्ञानिक क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. डॉ जयंत नारळीकर यांना मरणोत्तर का होईना हा पुरस्कार मिळाल्याने खगोलप्रेमींना कमालीचा आनंद झाला आहे कारण या पुरस्कारावर त्यांचा हक्कच होता. डॉ जयंत नारळीकर यांना हा पुरस्कार त्यांच्या हयातीतच मिळाला असता तर आणखी आनंद झाला असता पण असो देर आये दुरुस्त आये असे म्हणत या पुरस्काराचे स्वागत करायला हवे. डॉ जयंत नारळीकर यांचे याच वर्षी २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे (गणितज्ञ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रचचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## मुलांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आणि गड किल्ल्याबद्दल माहिती

**नागपूर, २७ ऑक्टोबर :** मुलांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आणि गड किल्ल्याबद्दल माहिती कळावी. त्यांना थोड्यावेळ टीवी, मोबाइल पासून लांब ठेवता यावे या उद्देशाने ही कार्यशाळा घेतली.

वर्षा परांजपे, भाग्यश्री काळे, महेश गद्रे, प्रशांत भूत, श्रीपद इंदोलीकर, त्रिलोक ठाकरे, माधव देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली बालमावळ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून एक काल्पनिक किल्ला उभारला. हा किल्ला तुम्ही पुढील ५ दिवस माता मंदिर धरमपेठ येथे जाऊन पाहू शकता व माळ्यांना प्रोत्साहन देऊ शकता. या उपक्रमात खालील बालमावळ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

तन्नमय परांजपे, मिहीर काळे, कार्तिक बापट, वेदांत बापट, सुपर्ण कुलकर्णी, अनीश परांजपे, श्रावणी महिंद्रकर, पार्थ केळकर, नंदन केळकर, हर्ष भीडे, यश भीडे, अवधुत शिरखेडकर, ओवी पांडे, श्लोक पांडे, नित्या जोशी, राधा गद्रे.






**मंगळवार दि. २८ ऑक्टोबर २०२५**

| कल्याण बाजार (पत्थर फोड एकच) | | | | मुंबई बाजार (पत्थर फोड एकच) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ३४५ | ४९० | १५० | ४५० | १२९ | २४९ | १२३ | २६९ |
| २२८ | ५८० | २७७ | ५५९ | २४६ | ३५७ | २५९ | ४५८ |
| १३८ | ६६० | ३३० | ६६७ | ३३६ | ४५६ | ४५७ | १८८ |
| जोडी | | | | जोडी | | | |
| २४ - ३४ - ६१ - ९१ | | | | २० - ५० - ६१ - ७१ | | | |
| २७ - ३७ - ६४ - ९४ | | | | २९ - ५९ - ६४ - ७४ | | | |
| २० - ३० - ६८ - ९८ | | | | २८ - ५८ - ६३ - ७३ | | | |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २८ ऑक्टोबर २०२५

**मंगळवार दि. २८ ऑक्टोबर २०२५**

सर्व बाजार साठी

१६ - ४६ - ७३ - ८३
१० - ४० - ७५ - ८५
१२ - ४२ - ७९ - ८९

३८० - ४०० - १६० - २६०
४७० - २४८ - २५० - ३५०
५६० - ३४७ - ३४० - ४४०

सर्व बाजारासाठी

| सोम. ते बुध. ओपन डे | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| ६१० | १६१ | ४८० | ४७८ | ३६० | १७१ |
| ७८० ५ | २६८ ६ | ५७० २ | ५५१ ९ | ४६० ० | २७८ ७ |
| ५०० | ३६७ | ६६० | ६६७ | ५५० | ३७७ |
| **सोम. ते बुध. क्लोज डे** | | | **सोम. ते बुध. क्लोज नाईट** | | |
| ३०० | २६६ | २४९ | २३६ | ६७० | १४९ |
| ४९० ३ | ३४७ ४ | ३५७ ५ | ४८९ १ | ५८० ३ | २५७ ४ |
| ५८० | ४४६ | ४५६ | १५५ | ४९० | ३३७ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
५ ६ २ ८ ९

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## भगवान बिरसा कलासंगम ची विभागीय फेरी आज अमरावतीमध्ये

### आदिवासींच्या कलागुणांना राज्यस्तरीय ओळख देणा-या स्पर्धेचे भव्य आयोजन

**नागपूर, २७ ऑक्टोबर :** आदिवासी एकता मित्र मंडळ, स्व. लक्ष्मणराव मानकर ट्रस्ट आणि प्रगती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या भगवान बिरसा कलासंगम ही राज्यस्तरीय आदिवासी कलास्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेची पश्चिम विदर्भाची विभागीय फेरी अमरावती येथे मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. सकाळी १० वाजता क्षीतिज पॅलेस, राजपूत धाब्याजवळ, नवसारी चौक, अमरावती येथे होणा-या या फेरीत पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम व यवतमाळ जिल्ह्यांतील ४०० स्पर्धक सहभागी होणार आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी कलाकारांना संधी, सन्मान आणि राज्यस्तरीय ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या या स्पर्धेमध्ये नृत्य, गायन, वाद्य वादन, चित्रकला, हस्तकला, रील्स, व्लॉग्स, फोटोग्राफी तसेच डॉक्युमेंटरी आणि शॉर्ट फिल्म या प्रकारांत ही स्पर्धा घेण्यात येत आहे. पूर्व विदर्भाकरिता ही स्पर्धा गडचिरोली येथे होणार असून महाराष्ट्र राज्यस्तरावरील स्पर्धेचे आयोजन नागपूर येथे पुढील महिन्यात केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्यावतीने घेण्यात येणा-या या अंतिम फेरीतील विजेत्यांना भरघोस पारितोषिके दिली जाणार आहेत, असे लक्ष्मणराव मानकर ट्रस्टचे सचिव प्रशांत बोपर्डीकर यांनी कळवले आहे.

## शब्दकोडे क्रमांक २२५०



**आडवे शब्द :-**
१) अश्विन व कार्तिक या महिन्यातील पौर्णिमा
६) दूत, कारकून
८) काळे ज्वालाग्रही खनिज
१०) निकल, विल्हेवाट
११) सारखा
१२) घोड्याची लाथ
१३) मध्यस्थ
१५) तीव्र रेचक
१७) मोठी टोपली
१९) धुंदी
२१) धांदल घाई
२२) संगीतातील ठेका
२४) लक्ष्मीचे एक नाव
२६) काढलेली सुट्टी
२८) श्रीविष्णूचे दशावतारातील पाचवे रुप
३२) अभिनेता
३४) स्वस्ताईच्या विरुद्ध
३६) डोंगराचा कोसळणारा भाग
३७) धमकी
३८) साखर
३९) वाईट इच्छा
४०) नव्वद अंशाच्या आतील कोन
४२) योग्य, वाजवी ४३) वस्तू, माल
४५) निर्जन
४७) जहाज
५०) कर
५१) दोन मैल
५२) शुद्ध सोने
५६) मालाची विक्री
५७) विरुद्ध, उलट
५९) वंशपरांगत असलेला हुद्दा
६२) फिकीर
६३) शंकराचे उग्र रुप
६५) हाक
६७) जन्म-मृत्यू
६९) रसाळ
७१) पेरणी
७३) डोळे
७५) पंकज, सरोज
७६) पूर्ण तापलेले (पाणी)
७७) कामात तडफ असलेला

**उभे शब्द :-**
१) योगासनातील शेवटचे आसन
२) द्रव पदार्थ
३) अडत्या
४) फौजदार
५) पर्वत
६) सोन्याची नाजूक माळ
७) एक वातुळ कंद
८) शुष्क
९) उपकरण, हत्यार
११) पूर्ण ऐक्य
१४) पत्थर
१५) जगाचे कालचक्र
१६) गोलाकार
१८) पार्वती, गौरी
२०) सरस्वतीचे एक नाव
२३) वस्त्राचा काठ
२५) एक सुगंधी वनस्पती
२७) स्थान, जागृत
२९) मुस्लीमांची धार्मिक शिक्षण देणारी शाळा
३०) समुद्रातील अग्नी
३१) जिव्हा
३२) **** **** बाजपेयी माजी पंतप्रधान
३३) दात
३४) मस्त स्त्री
३५) देवाचे स्तुतीस्तोत्र
४१) न वापरलेला
४४) शोध, तपास
४५) पडवी
४६) झाकणाचे पात्र
४८) गद्य इतिहास
४९) बारा वर्षाचा काळ
५१) राग, त्वेष
५३) वरपांगी
५४) कदर करणारा
५५) पावसाची झड
५७) हवाईअड्डा
५८) युवक
६०) कशा प्रकारचा
६१) नवरा
६२) शरीर
६४) साठ मिनीटे
६६) खाळ
६७) पिता
६८) रक्षण करणारा
७०) प्रजा
७२) कावळा
७४) गरज

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



## राशीभविष्य

**मेष :** आज तुमचा मित्र काहीही बोलला तरी नाराज होऊ नका; तुमची मैत्री अधिक घट्ट होईल. ऑफिसमध्ये सुरू असलेले एखादे काम पूर्ण झाल्याने तुम्हाला आराम मिळेल.

**वृषभ :** तुम्हाला एखादे रहस्य कळू शकेल. तुम्ही कामांवर लक्ष केंद्रित करू शकाल. उत्साह वाढेल. चांगल्या वागण्यामुळे नवे मित्र-मैत्रिणी बनतील. आजचा दिवस खास आहे.

**मिथुन :** पालकांचा गेल्या काही काळापासून असलेला राग आज कमी होईल. राजकारण आणि सामाजिक कार्यात सहभागी असलेल्यांना दिवस अनुकूल वाटेल. महिलांचा दिवस खूप छान जाईल.

**कर्क :** अनावश्यक गोष्टींकडे दुर्लक्ष करा. घरी पाहूणे आल्याने आनंद वाढेल. धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यातही काही वेळ घालवला जाईल. तुम्ही सौहार्द वाढवण्यासाठी पुढाकार घ्याल.

**सिंह :** कुटुंबियांसोबत क्वॉलिटी टाईम घालवाल, जोडीदाराशीही छान गप्पा माराल. यामुळे तुमचे नातेसंबंध सुधारतील. तुम्ही मित्रांसोबत घरी चित्रपट पाहण्याची योजना आखू शकता.

**कन्या :** व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी तुम्हाला नवीन संधी मिळतील. तुम्ही एखाद्याला उधार दिलेले पैसे अचानक परत मिळू शकतात. तुमच्या व्यवसायात एखाद्याकडून फायदा होण्याची शक्यता वाढेल.

**तुळ :** एकाग्रतेने केलेले काम फायदेशीर ठरेल. प्रेम जोडीदारांसाठी आजचा दिवस चांगला आहे. कोणत्याही जबाबदाजयांकडे दुर्लक्ष करणे टाळावे, नंतर त्रास होईल. कुटुंबात आनंदाचे वातारवण असेल.

**वृश्चिक :** आज तुमची अशा व्यक्तीची भेट होईल जी भविष्यात तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. तुमचे आरोग्य चांगले राहील. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त काम संपवण्याचा प्रयत्न कराल.

**धनु :** तुम्हाला ऑफिसमध्ये काही कामावर चर्चा, जास्त मेहनत करावी लागू शकते. चांगली बातमी नक्की समजेल. व्यापारी आज एखाद्या महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात. उधारी संपेल.

**मकर :** व्यवसायात भागीदारी फायदेशीर ठरू शकते. तुम्ही गोष्टी चांगल्या प्रकारे समजून घेण्याचा प्रयत्न कराल. कुटुंबातील सदस्यांशी संबंध सुधारतील, सौहार्दपूर्ण संबंध टिकतील. जीवन बदलेल.

**कुंभ :** जर तुम्ही कामानिमित्त बाहेर जात असाल तर तुमच्या ज्येष्ठांचे आशीर्वाद घ्या, तुमचे काम यशस्वी होईल. तुमच्या जोडीदाराला आज प्रगतीची चांगली संधी मिळेल. व्यवसायात अधिक फायदा होईल.

**मीन :** कुटुंबात धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले जाऊ शकते. तुमचे जीवन सुधारण्यासाठी तुम्ही काही सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न कराल. आरोग्य दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी खबरदारी घ्या

# ज्ञानोबा, तुकारामच्या गजरात पायदळ दिंडीचे आळंदीकडे प्रस्थान

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. २७ :

शहरापासून जवळच असलेल्या घाटपुरी येथील श्री सद्गुरू श्रीधर महाराज संस्थानची पायदळ दिंडी आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्यासाठी २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता श्री क्षेत्र आळंदी कडे रवाना झाली.

दिंडीमध्ये जळगाव जामोद, आसलगाव, सावरगाव, जवळा बाजार, उटी, शेगाव, घाटपुरी, ढोरपगाव, भालेगाव बाजार, रोहणा, धामणगाव रेल्वे या गावा सह अन्य गावांमधील शेकडो वारकरी सहभागी झाले आहेत. पायदळ दिंडीचे नेतृत्व हभप रामभाऊ महाराज चोपडे हे करीत आहेत. घाटपुरी ते श्री क्षेत्र आळंदी हे ४५० किलोमीटरचे अंतर वारकरी २२ दिवसात मार्गक्रमण करीत पूर्ण करणार आहेत. दिंडीतील वारकरी दररोज १८ ते २० किलोमीटर अंतर दररोज पार करणार आहेत. ज्या गावात दुपारी पायदळ दिंडी भोजनासाठी थांबणार आहे, त्या ठिकाणी हभप गोकूळ महाराज यांचे प्रवचन होणार आहे व रात्री ज्या ठिकाणी वारकऱ्यांचा मुक्काम राहणार आहे त्या ठिकाणी कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. आळंदी येथे खंडोबामाळ येथील शंकराचार्य मंदिरात दिंडीचा मुक्काम असतो. पुढील प्रवासासाठी दिंडी रवाना होण्यापूर्वी काकड आरती करण्यात येते. वारकरी रस्त्याने मार्गक्रमण करीत असताना ज्ञानोबा तुकारामाचा गजर करीत असतात. दरवर्षी प्रमाणे यंदाही या पायदळ दिंडी सोहळ्यामध्ये परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. यामुळे मोठ्या उत्साहात हा दिंडी सोहळ्याचे प्रस्थान झाले. ज्ञानोबा तुकारामाचा गजर करत आता भाविक २२ दिवसांचा पायी प्रवास करणार आहेत. यादरम्यान भाविकांना पायी ४५० किमींचे अंतर कापायचे आहे. या दिंडीत सहभागी झालेल्या भाविकांच्या आरोग्याचीही काळजी घेतली जाते. यासाठी आवश्यक तपासणी आणि औषधीही पुरवली जाते. परिसरातील प्रतिष्ठेत दिंडी सोहळा म्हणून याकडे पहिले जाते. यादरम्यान मोठ्या संख्येने शहरवासिय सहभागी होत.



विदर्भातील एकमेव संस्थान; वर्षभरात १८०० किमी पायी श्री सद्गुरू श्रीधर महाराज संस्थान घाटपुरी तर्फे दरवर्षी पंढरपूर, पैठण, त्र्यंबकेश्वर व आळंदी येथे पायदळ दिंडी जात असते. या चारही दिंड्या मिळून पायदळ दिंडीचा प्रवास १८०० कि.मी.चा होतो. या चारही दिंड्या एकूण २७९ गावातून चालत जातात असा मोठा वारकरी संप्रदायाचा वारसा हे संस्थान चालवीत आहे. असा वारसा चालविणारे विदर्भातील हे एकमेव संस्थान असावे.

वारकऱ्यांना मोफत औषधे शहरातील मेडिकल असोसिएशन च्या वतीने मागील पंधरा वर्षापासून पायदळ दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांना प्राथमिक उपचारासाठी लागणारे औषधे विनामूल्य देण्यात येत आहे.

# अनैतिक संबंधातून खून



■ महासागर प्रतिनिधी
वणी, दि. २७ :

शहरातील गजाननगरात झालेला खून पोलिसांनी अवघ्या काही तासांत उकलला. अनैतिक संबंधातून ही हत्या झाल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या घटनेतील दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

वणी शहरात 23 ऑक्टोबर रोजी दुपारी 4 वाजताच्या सुमारास 26 वर्षीय स्वप्नील किशोर राऊत (रंगनाथनगर, वणी) याला एका अज्ञात व्यक्तीने फोन करून पैसे आणायला सांगितले. घरातून बाहेर पडलेल्या स्वप्नीलचा रात्रीपर्यंत फोन बंद राहिला आणि तो घरी परतला नाही. कुटुंबियांच्या शोधानंतर 24 ऑक्टोबर रोजी गजाननगरी, वडगाव टीप रोड येथे त्याचा मृतदेह गळा व डोक्यावर गंभीर जखमा झालेल्या अवस्थेत आढळला. तक्रारीनंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तातडीने तपास सुरू केला.

सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासातून, 23 ऑक्टोबर रोजी स्वप्नीलला लाल पॅशन प्रो दुचाकीवर दोन व्यक्तींसोबत ब्राह्मणी फाटा चौकातून टोलनाक्याकडे जाताना पाहिले गेले. या तपासादरम्यान आरोपींची ओळख पटली. पोलिस तपासानुसार, या प्रकरणातील दोन आरोपी सुमेश रमेश टेकाम (वय 24) आणि सौरभ मारोती आत्राम (वय 27, दोघेही वडजापूर, ता. वणी) येथील रहिवासी आहेत. चौकशीत आरोपींनी हत्या अनैतिक संबंधातून केली असल्याचे स्पष्ट केले आहे. पोलिसांनी अत्यंत कौशल्याने आणि जलद कारवाई हे प्रकरण उकलले असून, पुढील तपास पोउपनि सुदाम आसोरे करत आहेत.

## पत्नीला दगडाने जिवे मारण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी
चांदूर रेल्वे, दि. २७ :

चांदूर रेल्वे शहरातील गोदावरी नगर येथे पत्नीला दगडाने जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना 26 ऑक्टोबरला दुपारी एक ते दीड वाजताच्या दरम्यान घडली असून याप्रकरणी आरोपी पतीविरुद्ध चांदूर रेल्वे पोलिसात गुन्हा दाखल झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, फिर्यादी यांची ननंद जखमी चंदा उत्तम घोष (वय 41 वर्ष) हिचा आरोपी उत्तम विश्वनाथ घोष (वय 43 वर्ष, रा. चांदूर रेल्वे) याच्यासोबत वीस वर्षापूर्वी विवाह झाला होता व ते चांदूर रेल्वे येथेच वास्तव्यास आहेत. आरोपीने पत्नीवर संशय घेत भांडण करून नालीच्या बाजूला पडलेला मोठा दगड हातात घेऊन पत्नीला डोक्यावर मारून गंभीर जखमी केले.

# प्रमोद पोकळे यांच्या भजन संध्येला श्रोत्यांचा प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २७ :

बडनेरा येथे दिवाळी शुभ पर्वाचे औचित्य साधून सालाबाद प्रमाणे यंदाही श्रीसंत सावता युवक मंडळ, जुनिवस्ती बडनेराचे वतीने दिवाळी पाडव्याच्या दिवशी सावता मैदानाच्या श्रीराम विजयोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी आकर्षक फटाक्यांची आतषबाजी करून अन्याय आणि वाईट प्रवृत्तींवर विजय मिळविण्याचे प्रतिक समजल्या जाणाऱ्या नरकासूर दहन सोहळा घेण्यात आला. यावेळी दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे व संच, गुरुदेव सेवा मंडळ यांचा संगीत-संध्या कार्यक्रम पार पडला. यावेळी भजन संध्येचा श्रोत्यांनी आनंद घेतला.

बडनेरा शहरच नव्हे तर पंचक्रोशीतील सर्वसामान्यांच्या



दिवाळीचा अनुपम सोहळा समजल्या जाणाऱ्या या कार्यक्रमाने शानदार आरंभ जिल्हातील दूरदर्शन व आकाशवाणीचे लोक-कलावंत प्रमोद पोकळे व संच, बडनेरा यांच्या सुश्राव्य आवाजातील भजन-संध्या कार्यक्रमाने झाला. प्रभु-रामचंद्रांच्या नामगजराने कार्यक्रमाची सुरुवात करून गायक प्रमोद पोकळे यांनी एकापेक्षा एक अभंग, भजने, भक्तिगीते व गौळणी आदींचे लागोपाठ गायन करून उपस्थितांची मने जिंकून मंत्रमुग्ध केले.

बडनेरासह परिसरातील शेकडो श्रोत्यांनी या भक्ती-मैफिलीला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली कला-आसक्ती सिद्ध केली. यावेळी प्रमोद पोकळे यांना तबल्यावर निलेश रमणे यांनी साथ दिली तर टाळ व सह गायनाच्या साथीला राजेंद्र इंगोले, गणेश खंडार, सुभाष सुने, सुनील तायडे, अशोक रमणे, मनोज संभे, विजय दारोकार व अरविंद अंबाडकर आदी सहकलावंतांनी साथ दिली. या कार्यक्रमातून भक्ती, भाव आणि कला यांचा त्रिवेणी संगम श्रोत्यांनी अनुभवला.

यावेळी आमदार रवि राणा, भाजप प्रदेश सरचिटणीस जयंत डेहनकर, रा.स्व.सं.चे विभागीय संघचालक चंद्रशेखर भोंदू, बडनेराचे पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण, प्रशांत लांडे, श्रीकांत येते व आयोजन समितीचे अध्यक्ष निखिल लडके यांचेहस्ते गायक प्रमोद पोकळे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

# विज्ञान-तंत्रज्ञान विषयावर राज्यस्तरीय नाट्योत्सव



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २७ :

विज्ञान आणि तंत्रज्ञान मानव कल्याणासाठी कसे उपयुक्त ठरू शकते, यावर आधारित राज्यस्तरीय नाट्योत्सव अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात हा नाट्योत्सव पार पडेल. यात तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर विजेते ठरलेले इयत्ता सहावी ते दहावीचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या नाट्योत्सवाचा मुख्य उद्देश नाटक आणि संवादाच्या माध्यमातून विज्ञान व तंत्रज्ञानाविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हा आहे. तसेच, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचारसरणी, कल्पनाशक्ती आणि नवोन्मेषी दृष्टिकोन विकसित करण्यास प्रोत्साहन देणे हेही या आयोजनामागे आहे. राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद, कोलकाता, नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (पुणे), विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) आणि डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नाट्योत्सवाचे उद्घाटन श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या सर सी.व्ही. रमण सभागृहात सकाळी १० वाजता होईल. मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे ५ नोव्हेंबरला आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
रिसोड, दि. २७ :

महाराष्ट्र शासन युवकांचा सर्वांगिण विकासकरणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागणे यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकारच्या वतीने आयोजन करण्यात येते. राज्यात सन २०२५-२६ या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सव विकसित भारत चॅलेज ट्रॅक चे आयोजन १० ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. त्यास अनुसरुन जिल्हास्तरीय युवा महोत्सव, सारकृतिक व नवोपक्रम आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशीम मार्फत ५ नोव्हेंबर रोजी वाटाणे लॉन, वाशीम येथे करण्यात आले आहे. युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकाचे वय हे १५ ते २९ वर्षा पर्यंत असावे. सदर स्पर्धेमध्ये भाग नोंदविण्याकरीता प्रवेश अर्ज ४ नोव्हेंबर पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशीम सादर करावे. सदर जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये लोकनृत्य (गट), लोकगीत (गट), कथा लेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा (इग्रंजी, हिंदी), कविता लेखन (इग्रंजी, हिंदी, प्रादेशिक भाषा) व नवोपक्रम ट्रॅक इत्यादी स्पर्धा आयोजीत करण्यात येणार आहेत.

# अतिवृष्टीग्रस्तांसाठी शिवसेनेचा एल्गार

## बाभुळगाव तहसील कार्यालयासमोर काळी दिवाळी



■ महासागर प्रतिनिधी
बाभुळगाव, दि. २७ :

ऐन लक्ष्मीपूजनाच्या दिवशी, जेव्हा सारा महाराष्ट्र दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघतो, तेव्हा बाभूळगाव तहसील कार्यालयासमोर मात्र काळी दिवाळी साजरी करण्यात आली. अतिवृष्टीने यंदाचा खरीप हंगाम उद्ध्वस्त होऊनही शासनाकडून मदतीचा पत्ता नसल्याने, संतप्त झालेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रिकाम्या थाळ्या वाजवित आणि झुणका-भाकरीची शिदोरी खाऊन सरकारचा तीव्र शब्दात निषेध नोंदविला शेतकऱ्यांना न्याय द्या या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

दिवाळी तोंडावर असतानाही शेतकऱ्यांच्या घरात अंधार आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शासनाने मदत जाहीर केली असली, तरी ती अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. त्यातच, गेल्या वर्षीच्या तिळाच्या नुकसानीची मदतही मिळालेली नाही. आधार प्रमाणीकरणातील तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकरी अनुदानापासून वंचित राहत आहेत. या सर्व समस्यांवर शासनाच्या उदासीनतेचा निषेध करण्यासाठी शिवसैनिकांनी हे शिदोरी आंदोलन केले. शेतकऱ्यांना विनाअट सरसकट कर्जमाफी द्यावी, कापसाला 10 हजार, सोयाबीनला 7 हजार आणि तुरीला 9 हजार रुपये प्रतिक्विंटल भाव द्यावा, तसेच नुकसानभरपाई म्हणून हेक्टरी 50 हजार रुपयांची मदत तत्काळ जाहीर करावी. या आंदोलनात तालुकाप्रमुख गजानन पांडे, तालुका संघटक सागर घवणे, शहरप्रमुख सचिन माटोडे, प्रहार तालुकाध्यक्ष प्रमोद कातरकर यांच्यासह रामेश्वर पेरकुंडे, शैलेश भगत, गजानन कोळणकर, योगेश कावळे, चंद्रशेखर केळतकर, जनार्दन झाटे, प्रवीण काळे, सतीश कावळे, भानुदास राऊत यांच्यासह अनेक शिवसैनिक तथा शेतकरी उपस्थित होते.

# शिवशाही बसचे ब्रेक फेल

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. २७ :

शेगावकडून बुलडाण्याचे दिशेने निघालेली शिवशाही बसचे ब्रेक निकामी झाल्याची घटना आज २५ ऑक्टोबर रोजी घडली. ब्रेक न लागल्यामुळे बस मागील वाहनाला धडकली. यात वाहन उलटुन नुकसान झाले.

बुलडाणा ते खामगाव महामार्गावरील ज्ञानगंगा अभयारण्यातील बोथा घाटातून राज्य परिवहन महामंडळाची शेगाव हुन बुलडाणा निघालेली शिवशाही बस दुपारी १ वाजता जात होती. बोथा घाट चढत असतांना बसचे ब्रेक फेल झाल्यामुळे चालकाचे बस वरील नियंत्रण सुटले. त्यामुळे बस मागच्या गाडीला जाऊन धडकली. त्यामुळे मागील वाहन उलटले .


## Change Of Name

MY OLD NAME WAS **MOHAMMED UZAIF RAZA.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD HUZAIF RAZA.**
OLD PASSPORT NO.:- **T6195105.**
**ADD :** PLOT NO.:-F/10, KASHYAP COLONY, MAHESH NAGAR, SHANTI NAGAR, NAGPUR - 440002, MAHARASHTRA, INDIA.

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **G3195774**. MY OLD NAME WAS **HASNAIN ROSHAN ALI AJANI.** NOW MY NEW NAME IS **HASANAIN ROSHANALI AJANI.**
**ADD :** NEAR MAHESHA GYANPITH SCHOOL WARDHA 442301.

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **N6047536**. MY OLD NAME WAS **TASHIF ASHFAQ AHMED.** NOW MY NEW NAME IS **TASHIF AHMED.**
**ADD :** 302, AKSHAY REGENCY 44 HILL ROAD NAGPUR 440010.

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **N5679858**. MY OLD NAME WAS **TABISH ASHFAQ AHMED.** NOW MY NEW NAME IS **TABISH AHMED.**
**ADD :** 302, AKSHAY REGENCY 44 HILL ROAD NAGPUR 440010.

MY OLD NAME WAS **RAVINDRANATH LAXMANRAO GAURKHEDE.** NOW MY NEW NAME IS **RAVINDRA LAXMANRAO GAURKHEDE.**
**ADD :** UTTARWAR LAYOUT PANDHARKAWADA YAVATMAL - 445302.

MY OLD NAME WAS **PATHAN AYESHA BEGUM RASHID KHAN.** NOW MY NEW NAME IS **AYESHA SAMIR SHAIKH.**
**ADD :** TOFKHANA HINGOLI 431513.

MY OLD NAME WAS **JAKEYA DAWOOD SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **ZAKIYA BEGUM MOHAMMAD DAUD.**
**ADD :** AYESHA GARDEN COLONY, NEAR WATER TANK NEW YERKHEDA KAMPTEE NAGPUR.

MY OLD NAME WAS **SOHEL AHMAD MOHAMMAD ADIL @ SOHAIL SHEIKH @ SOHAIL AHMAD SHAIKH.** NOW MY NEW NAME IS **SOHAIL AHMED SHAIKH.**
**ADD :** FLAT NO. 202 RASHI APARTMENT, PATEL NAGAR, BORGAON CHOWK, NAGPUR 440013.

MY OLD NAME WAS **BIRJIS AHAMED SOHAIL SHEIKH @ BIRGIS SOHAIL SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **BIRJIS SOHAIL SHAIKH.**
**ADD :** FLAT NO. 202 RASHI APARTMENT, PATEL NAGAR, BORGAON CHOWK, NAGPUR 440013

MY OLD PASSPORT NO, **R6645309.** MY OLD NAME WAS **SHARFUDDIN BADRUDDIN ANSARI.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SHARFUDDIN.**
**ADD :** H.NO.653 ANSAR NAGAR MOMINPURA NAGPUR 440018.

MY OLD NAME WAS **BADRUDDIN ANSARI.** NOW MY NEW NAME IS **BADRUDDIN.**
**ADD :** ANSAR NAGAR MOMINPURA NAGPUR 440018.

MY OLD NAME WAS **AKASH ASHOKRAO TUMBADE.** NOW MY NEW NAME IS **AKASH ASHOKRAO TUMBDE.**
**ADD :** PLOT NO.13, KHARBI RING ROAD, MITRAVIHAR NAGAR, HANUMAN NAGAR, NAGPUR - 440009.

MY OLD NAME WAS **SHEKH ASFAK SHEKH BASHIR.** NOW MY NEW NAME IS **ASHFAQUE BASHIR SHEIKH.**
**ADD :** RING ROAD KABRASTAN CHOWK HASANBAG NAGPUR 440024.

MY OLD NAME WAS **SHEIKH MOHSIN SHEIKH ABDUL KHAN** . NOW MY NEW NAME IS **MOHSIN SHEIKH ABDUL SHEIKH.**
**ADD :** BEHIND VETERINARY HOSPITAL, SHANTI NAGAR, CHOR KHIDAKI, NAGINABAGH, CHANDRAPUR 442401 MS.

MY OLD NAME WAS **UBAIDUR RAHMAN HAFIZ KHURSHID AHMAD** . NOW MY NEW NAME IS **UBAID UR RAHMAN KHURSHEED AHMAD ANSARI.**
**ADD :** KAMGAR NAGAR,NARI ROAD, NAGPUR MS- 440026.

MY OLD NAME WAS **SANDIPKUMAR KANTAPRASAD MISHRA.** NOW MY NEW NAME IS **SANDIP KANTAPRASAD MISHRA.**
**ADD :** MISHRA BHAWAN, MU POST, SAKARITOLA, TQ SALEKASA, GONDIA - 441902.


# दिपावलीनिमित्त घेरवरा स्कूलमध्ये स्नेहमिलन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
दारव्हा, दि. २७ :

दिपावलीनिमित्त मास्टर्स अॅथलेटिक्स, बहुउद्देशीय संस्थेद्वारे दिवाळी स्नेहमिलन सोहळा विरजी भिमजी घेरवरा हायस्कूलमध्ये नुकताच पार पडला. याप्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्यगण उपस्थित होते.

आपुलकी, जिव्हाळा, प्रेम सद्भावना व्यक्त करत असताना जुन्या दिवसाच्या आठवणी, जुन्या काळात दिवाळीनंतरच एकमेकांच्या घरी फराळ करायला जाणे आज बंद झाले. या बदलत्या काळात त्या गोष्टी कुठेतरी हरवल्या आहे. आप्त गोतावळा प्रेम एकमेकांबद्दल वाढण्यासाठी या गोष्टीची आज नितांत गरज आहे. यासाठी रविवारी दि. २६ ऑक्टोबर रोजी फराळनिमित्त चर्चेचा कार्यक्रम मास्टर अथलेटिक्स असोसिएशन, क्रीडा संकुल वेल्फेअर संघटनेच्या वतीने एडेड हायस्कूलमध्ये आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये राजेंद्र चिंतकुटलावार, सुरेश निमकर, प्राचार्य भैरव भेंडे, डॉ. मनोज राठोड, श्याम पांडे, अश्फाक अली, गौतम सोनोने, विजय काळे, मुकेश महाराज चुडे, सूत्रसेन भितकर, सचिन काळे, लाला भंडारी आदींची उपस्थिती होती. मास्टर्स अॅथलेटिक्स, बहुउद्देशीय संस्थाद्वारा आयोजित दिवाळी स्नेहमिलन सोहळ्याच्या माध्यमातून सर्व जाती, धर्म, पंथाचे लोक एकत्रित येऊन हा सोहळा वैशिष्ट्य पूर्ण केला. पुढील वर्षी मोठ्या प्रमाणावर सोहळा आयोजित करण्यात येईल.


## जाहीर सूचना

नागपुर या द्वारे जाहीर करण्यात येते की माझे पती श्री. प्रेमलाल अनंत ब्रम्हनोटे यांचा दिनांक. ०९/०९/२०१६ या दिवशी मृत्यू झाला आहे. तरी त्यांच्या नावे असलेलली एक गाडी क्रमांक MH31CS5902 मारुती RITZ VXI BS III (चेसीस क्र. MA3EDKD1S00125721H9, इंजिन क्र. 1007099) हि एक गाडी आहे. मी त्यांची पत्नी बीना प्रेम ब्रम्हनोटे रा. प्लॉट नं. ५६७, एकता कॉलोनी, यादव नगर जवळ, उप्पलवाडी, नागपूर -४४००२६ मी त्यांची पत्नी असल्यामुळे हि एक गाडी आरटीओ नागपूर अर्बन येथे ट्रान्सफर करत आहे. तरी ह्या जाहीर सूचनेद्वारे या गाडीवर कूणाचे काही हरकत, किंवा बोझा किंवा काही उजागर, हक्क असल्यास ह्या जाहीर सूचनेनसार सात दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. तरी जाहीर सूचना सादर.

बीना प्रेम ब्रम्हनोटे
रा. प्लॉट नं. ५६७, एकता कॉलोनी,
यादव नगर जवळ, उप्पलवाडी,
नागपूर – ४४००२६
मो क्र. ९९७५५३०९३३ / ९८३३३७१४७५


# जाहोता - राजस्थानच्या हृदयातले ते गाव ज्याने परंपरेऐवजी बदल स्वीकारला

राजस्थानच्या हृदयात एक असे गाव वसले आहे ज्याने परंपरेपेक्षा बदलाची वाट निवडली जाहोता, ज्याला आता हेरिटेज व्हिलेज किंवा राजऋषी गाव म्हणून ओळखले जाते.

येथे सरपंच श्यामप्रतापसिंह राठोड यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि गावकऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांनी बदलाची बीजे पेरली गेली फक्त पायाभूत सुविधांमध्ये नव्हे, तर लोकांच्या मनातही एकता, प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेवर आधारित प्रणाली स्वीकारण्यात आली. गावकऱ्यांनी खुले मनाने प्रतिसाद दिला. स्थलांतर, व्यसन आणि नैराश्य मागे राहिले, आणि गाव एकत्र प्रगतीकडे वाटचाल करू लागले.

स्वच्छता एक आंदोलन बनले. जाहोता राजस्थानचे पहिले ODF प्लस पंचायत बनले. गावातील सर्वात घाणेरडा कोपरा आता एक आकर्षक सेल्फी पॉईंट बनला आहे अभिमान आणि प्रगतीचे प्रतीक. सांझ तयार करण्यात आली वृद्धांसाठी एक शांत जागा, जिथे ज्ञान, अनुभव आणि शांती एकत्र येतात. सार्वजनिक ठिकाणांचे सौंदर्यीकरण झाले आणि व्यसनमुक्ती कार्यक्रमांमुळे मन आणि शरीर दोन्ही मुक्त झाले सजग जीवनसंस्कृतीचा जन्म झाला. येथे जैविक संयुग शेती बहरली आहे. ५४,००० पेक्षा जास्त झाडे लावली आणि संरक्षित केली गेली आहेत. स्थानिक महिलांनी चालवलेली राजऋषी किचन आता आदर्श वाटिकाच्या माध्यमातून प्रेम आणि आध्यात्मिक स्पंदनांनी उगवलेली सेंद्रिय उत्पादने परोसते जी शरीरासह आत्म्यालाही पोषण देतात.

पाणी म्हणजे जीवन आणि जाहोतामध्ये जीवन पुन्हा मातीपासून फुलत आहे. भूजल पुनर्भरण प्रणालीने भूमीखाली एक शांत क्रांती घडवली आहे. मॅजिक पिट्स, सोक पिट्स आणि कंटूर ट्रेंचेस आता पावसाची प्रत्येक थेंब साठवून पृथ्वीला परत देतात भविष्यासाठी एक वचन. सरपंचांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, जाहोताने एक नवीन शासन प्रणाली स्वीकारली आहे एकता, पवित्रता आणि सामूहिक प्रगतीवर आधारित. महिलांना त्यांचा आत्मविश्वास आणि आवाज मिळाला. जाहोताला भारताची दुसरी आदर्श महिला-अनुकूल ग्रामपंचायत म्हणून मान्यता मिळाली आहे.

येथे शासन म्हणजे केवळ धोरण नव्हे ते लोकांबद्दल आहे. महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल, नेतृत्वाबद्दल आणि गावाच्या परिवर्तनाबद्दल आहे. महिला आता फक्त सहभागी नाहीत त्या निर्णय घेणाऱ्या आहेत. स्वयं-सहायता गटांपासून ते बाल पंचायतांपर्यंत त्यांचा आवाज गावाच्या प्रत्येक कोपऱ्यात घुमतो. जाहोताने महिला-अनुकूल भारत निवडला आहे. सुरक्षा, सन्मान आणि संधी आता स्वप्न नसून वास्तव बनले आहेत. गावातील ३५% लोकसंख्या असलेली मुले आता बाल पंचायतांद्वारे नेतृत्व, जबाबदारी आणि मूल्ये शिकत भविष्य घडवत आहेत. पंचायत लर्निंग सेंटर हे नवोन्मेषाचे प्रतीक आहे आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि समानतेसह ९ स्थानिक शाश्वत विकास उद्दिष्टांशी जोडलेले. येथील मुलांनी भारतातील पहिली बाल पंचायत तयार केली कारण जरी ते मतदान करत नसले, तरी ते आधीच भविष्य घडवत आहेत. डिजिटल लायब्ररीने ज्ञानाचे दरवाजे उघडले आहेत. येथे शिक्षण वर्गात मर्यादित नाही ते पंचायत लर्निंग सेंटरद्वारे प्रवाहित होते, जे तळागाळातील नवोन्मेषाचे प्रतीक आहे. कार्यशाळा, डिजिटल साधने आणि सामुदायिक संवाद प्रत्येक नागरिकाला विशेषतः महिला आणि तरुणांना त्यांचे भविष्य घडवण्यासाठी सशक्त करतात. हे केवळ प्रशासन नाही हे परिवर्तन आहे. मी नाही, आपण ही भावना येथे जिवंत आहे जिथे मूल्य आणि कृती एकत्र येतात आणि प्रत्येक पाऊल एकत्र पुढे टाकले जाते. ही आहे जाहोता - द हेरिटेज व्हिलेज ची कथा जिथे विकास केवळ आकड्यांनी नव्हे, तर बदलाच्या खोलीने मोजला जातो. येथील न्यायालय गावच चालवते आदर, संवाद आणि मूल्यांवर आधारित, काही शुल्क नाही पण दोन्ही पक्ष स्वेच्छेने योगदान देतात कधी वॉटर कूलर, पंखा, किंवा झाडे लावून न्याय समुदायासाठी एक देणगी बनतो. हे फक्त समाधान नाही हे पुनर्स्थापन आहेः नात्यांचे, विश्वासाचे आणि सौहार्दाचे. जाहोताः राजस्थानचे ते गाव जे मिसाल बनले, जिथे महिला नेत्या बनल्या, मुले भविष्य घडवतात आणि गाव स्वतः एक जिवंत उदाहरण ठरले आहे.


RNINO-20789/71 | Mahasagar Nagpur | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ | महासागर नागपूर | **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**फोन : ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३**



## चटपटीत आणि कुरकुरीत कॉर्न

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, येता-जाता तोंडात टाकण्यासाठी काही तरी लागतं. संध्याकाळी एखादा कुरकुरीत खमंग पदार्थ चहाची लज्जत वाढवतो. अशा वेळी तुम्ही झटपट तयार होणारे क्रिस्पी कॉर्न बनवू शकता. चला तर, करु या.

**सामग्री:** पाणी, एक कप कॉर्न, लाल तिखट, प्रत्येकी एक चमचा जिरे पूड, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ, दोन ते तीन चमचे कॉर्न फ्लोर, तेल, चिरलेला कांदा आणि कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात कॉर्न घालून पाच मिनिटे शिजवून घ्या. पाणी काढून कॉर्न थंड करायला ठेवा. थंड झाल्यावर कॉर्नमध्ये कॉर्न फ्लोर आणि मीठ घाला. नीट मिक्स करून घ्या. आता कढईत तेल तापवा. तेल गरम झाल्यावर त्यात कॉर्न घाला. सोनेरी रंगावर तळून घ्या. भांड्यात काढून घ्या. दुसऱ्या भांड्यात लाल तिखट, जिरेपूड, चाट मसाला आणि थोडं मीठ एकत्र करा. तळलेल्या कॉर्नवर आपल्या चवीनुसार हा मसाला घाला. त्यावर चिरलेला कांदा आणि कोथिंबिर घालून हलवून घ्या. थोडं लिंबू पिळा.




### शेर की जुबानी

अच्छे तो सभी होते है, बस पहचान बुरे वक्त में होती है।

दो पल की जिंदगी के दो नियम, निखरो फुलों की तरह और बिखरो खुशबू की तरह

लिखी हुई बात को प्रत्येक पढनेवाला नहीं समझ सकता, क्योंकि लिखनेवाला भावनाएं लिखता है, और लोग केवल शब्द पढते हैं।

## अडीचशे हॉटेलचा मालक!

**अचिव्हर**

अमोल कोहली हा भारतीय मुलगा अमेरिकेतील एका हॉटेलमध्ये प्लेट्स धुत असे. आता त्याच्या नावे तब्बल २५० रेस्टॉरंट्स आहेत. अमोलने वेटर म्हणून कामाची सुरूवात केली होती. त्याचीच ही यशोगाथा...

एक १५ वर्षांचा मुलगा खर्च भागवण्यासाठी, ग्राहकांना सेवा देण्यासाठी आणि टेबल साफ करण्यासाठी हॉटेलमध्ये प्लेट्स धुतो. वर्षानुवर्षे कठोर परिश्रम केल्यानंतर एक दिवस येतो आणि नशीब उजाडते तेव्हा तो केवळ ते हॉटेल विकत घेतो आणि मालक बनतो. इतकेच नाही तर पुढे तो अनेक हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सदेखील विकत घेतो. ही कथा कोणत्याही गल्लाभरु चित्रपटातील नाही तर यश मिळवण्यासाठी अमेरिकेत गेलेल्या एका भारतीय मुलाची आहे. ही स्वप्नवत कहाणी अमोल कोहलीची आहे.


अमोल २०१३ मध्ये अमेरिकेतील 'फ्रेडलीज' नामक रेस्टॉरंटमध्ये काम करत असे. त्या वेळी तो हायस्कूलचा विद्यार्थी होता. खर्च भागवण्यासाठी तो ओव्हरटाईम करत असे. त्या वेळी अमोलला प्रतितास पाच डॉलर्स पगार मिळत असे. कामाचा भाग म्हणून त्याला हॉटेल साफ करणे, प्लेट्स धुणे आणि स्वयंपाक करणे यापासून सर्व काही करावे लागत असे. कोहलीकडे कोणतेही निश्चित काम नव्हते. मॅनेजरने सांगितले काम त्याला करावे लागायचे. नोकर ते मालक यादरम्यानचा त्याचा प्रवास एकूण दोन दशकांचा आहे. आज तो त्याच 'फ्रेडलीज' हॉटेल रेस्टॉरंटचा मालक आहे. अमोलची कंपनी 'इन्व्हेस्टमेंट ग्रुप' ने फ्रेडलीज विकत घेतले आहे



आणि हॉटेलची मूळ कंपनी, ब्रिक्स होल्डिंग्ज आणि सहा इतर रेस्टॉरंट्सची मालकीदेखील त्यांच्याकडे आहे.

अमोलच्या कंपनीने त्यासाठी अब्जावधी डॉलर्स दिले आहेत. रेस्टॉरंटमध्ये काम करून अमोल व्यवसाय शिकला. ३७ वर्षीय अमोलने वेटर म्हणून काम करताना व्यवसायाचे बारकावे शिकले आणि ड्रेक्सेल विद्यापीठात वित्त आणि मार्केटिंगचा अभ्यास केल्यानंतर स्वतःचा व्यवसाय स्थापन केला. तो अनेक वर्षे रेस्टॉरंटमध्ये काम करताना अभ्यासही करत होता. त्यातील बारकावे शिकत होता. यातूनच व्यवसायाचा विमा उतरवण्यापासून कर्मचाऱ्यांच्या खर्चाचा आणि जेवणाच्या खर्चाचा अंदाज लावण्यापर्यंत सर्व काही त्याला अवगत झाले. आज २५० रेस्टॉरंट्सचा मालक कोहलीने स्वतःची गुंतवणूक कंपनी स्थापन केली असून 'फ्रेडलीज'ची सर्व ३१ ठिकाणे विकत घेतली आहेत. अमोलने 'क्लीन ज्यूस', 'ऑरेंज लीफ', 'रेड मँगो', 'स्मूदी फॅक्टरी प्लस किचन', 'सुपर सॅलड' आणि 'हम्बल डोनट' देखील विकत घेतले आहे. अशा प्रकारे आता तो अमेरिकेत जवळजवळ २५० रेस्टॉरंट्सचा मालक आहे. अर्थातच हे करताना अमोलला असंख्य आव्हानांनाही सामोरे जावे लागेल. कोविड-१९ च्या वेळी २०20 मध्ये रेस्टॉरंट साखळी दिवाळखोरीत निघाली. पण यातूनही तो सावरला आणि यशाचा आलेख वाढता ठेवला.

### टेक्नो टॉक




#### व्हॉटस् ॲपचे नवे फीचर

व्हॉट्सॲप हे जगातील सर्वात लोकप्रिय मेसेजिंग ॲप असून भारतातील लाखो लोक ते दररोज वापरतात. आता व्हॉट्सॲप वापरकर्त्यांसाठी नवीन वैशिष्ट्ये देत आहे. ही वैशिष्ट्ये गोपनीयता वाढवण्यास मदत करणारी आहेत. आता मोबाइल नंबर शेअर न करता चॅट करता येईल.

आतापर्यंत व्हॉट्सॲपवर एखाद्याशी चॅट करण्यासाठी मोबाइल नंबर आवश्यक होता. तथापि व्हॉट्सॲप लवकरच एक नवीन वैशिष्ट्य सादर करणार असून ते वापरकर्त्यांना त्यांच्या नावाचा वापर करून एकमेकांशी कनेक्ट होण्यास अनुमती देईल. यामुळे मोबाइल नंबर शेअर करण्याची आवश्यकता दूर होईल आणि गोपनीयता अधिक सुरक्षित होईल. तथापि, ही प्रक्रिया फक्त वापरकर्ता नाव प्रविष्ट करणे आणि चॅट सुरू करणे इतके सोपे नसेल.

अहवालानुसार, व्हॉट्सॲप चार-अंकी 'युजरनेम की' ची चाचणी करत आहे. याचा अर्थ असा, की वापरकर्ते त्यांच्या वापरकर्ता नावासह हा चार-अंकी कोड शेअर करू शकतात, जेणेकरून ते चॅट करू शकतील. हे अतिरिक्त सुरक्षा स्तर म्हणून काम करेल, जेणेकरून अनोळखी व्यक्तींना त्यांचे नाव शोधून संदेश पाठवण्यापासून रोखता येईल.

## चार्टर्ड अकौंटटला जगभर संधी



**संधीच्या शोधात?**

चार्टर्ड अकाउंटट होणे अनेकांचे स्वप्न असते. सीए ही केवळ एक पदवी नाही तर अत्यंत प्रतिष्ठित व्यावसायिक ओळख आहे. चार्टर्ड अकाउंटंट्सचे काम फक्त भारतापुरतेच मर्यादित नाही. जागतिकीकारणाच्या युगात भारतीय सीएंना जगभरातून आकर्षक संधी मिळत आहेत. अनेक देशांना अनुभवी आणि कौशल्य संपन्न अकाउंटंट्सची गरज आहे. त्याठिकाणी भारतीय सहजपणे करिअर करू शकतात.

**कॅनडा:** कॅनडा केवळ शिक्षणासाठीच नव्हे तर अकाउंटिंग आणि फायनान्स प्रोफेशनसाठीही एक उत्तम डेस्टिनेशन आहे. येथे सीपीए कॅनडा ही प्रमुख संस्था असून ती भारतीय सीएच्या कौशल्यांना मान्यता देते. काही शैक्षणिक आणि तांत्रिक परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर तुम्ही कॅनडामध्ये स्थायिक होऊन उत्कृष्ट नोकरी मिळवू शकता.

**ऑस्ट्रेलिया:** ऑस्ट्रेलियामध्ये फायनान्स क्षेत्र वेगाने विकसित होत आहे. इथे चार्टर्ड अकाउंटंट्सना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. भारतीय सीएंना ऑस्ट्रेलियन सर्टिफिकेशन मिळवण्यासाठी काही स्थानिक परीक्षांचा सामना करावा लागतो. पण एकदा पात्रता मिळाली की तिथे करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध होतात.

**सिंगापूर:** सिंगापूर ही आशियातील महत्त्वाची आर्थिक राजधानी मानली जाते. भारतीय चार्टर्ड अकाउंटंट्सना तिथे मान्यताप्राप्त जागतिक कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी मिळते. तिथल्या स्थानिक टॅक्स आणि कॉर्पोरेट लॉबद्दल थोडे ज्ञान असले तर प्रवेश सोपा होतो.

**ब्रिटन:** ब्रिटनममध्येही काही मॉड्यूल्स आणि परीक्षांनंतर भारतीय प्रोफेशनल्सना स्थायिक होता येते. मोठमोठ्या मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये फायनान्स, ऑडिट आणि कन्सल्टिंग क्षेत्रात मागणी वाढत आहे.

**संयुक्त अरब अमिराती:** संयुक्त अरब अमिरातीमध्ये 'आयसीएआय' शाखा कार्यरत असून तिथे भारतीय चार्टर्ड अकाउंटंट्सना चांगली प्रतिष्ठा आहे. दुबई, अबुधाबीसारख्या शहरांमध्ये भारतीय 'सीएं'ना उत्तम पगार आणि जीवनशैलीसह करिअर वाढवता येते. इथे स्थानिक परीक्षा आवश्यक नसल्यामुळे अनेक बाबी सहज शक्य आहेत.

## रायडर पँटची क्रेझ

**ग्रुमिंग**

सणांच्या या हंगामात तरुणाई पोशाखांबाबत जागरूक होणे स्वाभाविक आहे. या काळात पारंपरिक कुर्ता-पायजमाचा ट्रेंड प्रचलित असतो. मात्र या वर्षी तरुणाई पारंपरिक घटकांसह फ्यूजन शैली स्वीकारत आहे. डिझायनर्स कुर्ता-पायजमासह प्रयोग करत असताना तरुणाई बॉलीवूड सेलिब्रिटींच्या ड्रेसिंग सेन्सनेदेखील प्रभावित झाली आहे. डिझायनर्सच्या मते, सणाच्या हंगामात कुर्ता शॉर्ट लेंथमध्ये दिसत असून पायजम्याची जागा रायडर पँट्सने घेतली आहे पारंपरिक पार्श्वभूमिध्येही ही फ्यूजन शैली प्रवेश करत आहे.



तरुणांना विशेषतः वरुण धवन आणि अर्जुन कपूरची शैली आवडते आणि त्या आधारे डिझाइन तयार करण्यासाठी ते डिझायनर्सना आग्रह करत आहेत. पूर्वी रायडिंग पँट्स जोधपूरमध्ये तयार होत असत. मात्र आता ही स्टाईल सगळीकडे दिसते आहे. एकूणच डिझाइनर कुर्ता-पायजमावर विविध प्रयोग करत असून तरुणांसाठी नवीन लूक तयार करण्याचा, नेहमीच्या शैलीपासून दूर जाऊन लोकांना आकर्षित करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. यासाठी वस्त्रतज्ज्ञांनी अफगाणिस्तानच्या परहान, काश्मीरच्या फिरान आणि नेपाळच्या कुर्ता शैलींचा बराच अभ्यास केला आहे. परिणामस्वरुप या हंगामात राजस्थानी, भोपाली, लखनऊ, मुलतानी, पठानी, पंजाबी, बंगाली इत्यादींसह सर्व प्रकारचे कुर्ती पॅटर्न बाजारात लक्षणीय बदल घडवून आणताना दिसत आहेत.

कुर्ता आणि पॅन्टसह चामड्याचे शूज वापरले जातात. मात्र आता काही बदलांसह या शैलीत स्नीकर्सनेदेखील स्थान घेतले आहे. ते पॅन्टसह उत्तम प्रकारे पेअर केले जातात.

### स्मार्ट टॉक




#### चॅटजीपीटीमधून पैसेही पाठवता येणार

दैनंदिन जीवनात चॅटजीपीटीचा वापर वाढत आहे. आता हे 'एआय चॅटबॉट' यूपीआय पेमेंट देखील करू शकेल. हे साध्य करण्यासाठी चॅटजीपीटी तयार करणारी कंपनी 'ओपन एआय'ने नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) आणि फिनटेक कंपनी 'रेझरपे' यांच्याशी भागीदारी केली आहे. 'एआय चॅटबॉट'सह रिअल-टाइम पेमेंट नेटवर्क एकत्रित करण्याचा हा भारतातील पहिलाच प्रयत्न आहे. त्याच्या मदतीने वापरकर्ते चॅट इंटरफेसद्वारे खरेदी पूर्ण करू शकतील.

या काळात, 'ओपन एआय' एजंट सुरक्षित, जलद आणि वापरकर्ता-नियंत्रित पद्धतीने व्यवहार कसे प्रक्रिया करू शकतात, याची चाचणी करेल. चाचणी यशस्वी झाली तर ती लागू केली जाऊ शकते. सध्या, फक्त निवडक वापरकर्ते काही प्लॅटफॉर्मवर ते वापरू शकतात. तुम्ही 'बिगबास्केट'वर चॅटजीपीटी वापरून पेमेंट करू शकता. 'टाटा ग्रुप'चा ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, बिगबास्केट ही चॅटजीपीटी वापरून वापरकर्त्यांना पेमेंट करण्याची परवानगी देणाऱ्या पहिल्या सेवांपैकी एक आहे. या पायलटमध्ये 'ॲक्सिस बँक' आणि 'एअरटेल पेमेंट्स बँक' हे बँकिंग भागीदार आहेत. यूपीआय ही सर्वात लोकप्रिय पेमेंट पद्धत असून याद्वारे दरमहा २० अब्जाहून अधिक व्यवहार होतात.

### स्टाईल मंत्रा



#### माऊस काम करीत नाही?

'माऊस'बद्दल लोक जास्त विचार करत नाहीत. परंतु हे उपकरण काम करणे थांबवते तेव्हा मात्र सगळेच थांबते. लॅपटॉपमध्ये टचपॅडची सोय असली तरी अनेकजण सोयीसाठी माऊसच वापरतात. म्हणूनच माऊस खराब झाला तर मोठी अडचण होते. नवीन माऊस घेणे हा सोपा उपाय असला तरी नादुरुस्त माऊस दुरुस्त करण्यासाठी काही पद्धती तुम्ही वापरून पाहू शकता.

इतर कोणत्याही उपकरणाप्रमाणे, माऊसला पॉवरची आवश्यकता असते. तुमचा वायरलेस माऊस काम करत नसेल तर प्रथम तो सुरु आहे का ते तपासा. तो चालू असेल तर बॅटरी तपासा. कधीकधी जुन्या बॅटरीमुळे तो काम करणे थांबवतो. नवीन बॅटरी घालल्यास पुन्हा सुरू होईल. वायरलेस माऊसला काम करण्यासाठी डोंगलची आवश्यकता असते. तो संगणकात प्लग इन केलेला नसेल तर माऊस काम करणार नाही. म्हणून हे रिसीव्हर प्लग इन करा.

माउस डोंगलद्वारे कनेक्ट होत नसेल तर ब्लूटूथद्वारे कनेक्ट करण्याचा प्रयत्न करा. माउस प्लग इन केलेला असेल आणि तरीही काम करत नसेल तर यूएसबी पोर्ट तपासा. तो एका पोर्टमध्ये काम करत नसेल तर दुसऱ्या पोर्टमध्ये प्लग करण्याचा प्रयत्न करा. कधीकधी यूएसबी पोर्टमध्ये कचरा किंवा धूळ शिरल्याने ते निरुपयोगी होतात. माऊसला संगणकाशी संवाद साधण्यासाठी 'ड्रायव्हर्स' नावाच्या सॉफ्टवेअरच्या लहान तुकड्यांची आवश्यकता असते.

## आमचं लग्न होईल का?

**मॅच मेकिंग**

मी ३० वर्षांचा मुलगा असून सध्या एका मुलीच्या प्रेमात आहे. ही मुलगी माझी दूरची बहिण आहे. तिचंही माझ्यावर खूप प्रेम आहे. आम्ही एकमेकांशिवाय अजिबात राहू शकत नाही. गेल्या साडेतीन वर्षांपासून आम्ही नात्यात आहोत. पण आमचे कुटुंबिय खूप जुनाट विचारांचे आहेत. आमचं नातं बहिणभावाचं असल्यामुळे आमच्या लग्नात अडचणी येऊ शकतील. कायद्यानुसार आम्ही लग्न करू शकतो का आणि आम्ही आमच्या घरच्यांची कशी समजूत काढू? कृपया मार्गदर्शन करा.

**उत्तर :** प्रत्येक धर्माच्या काही प्रथा आणि परंपरा असतात. हिंदू धर्मात बहिण-भावांमध्ये लग्न होत नाहीत. अर्थात या सगळ्या गोष्टी प्रत्येकाच्या मानण्यावर असतात.



काही कुटुंबांमध्ये लांबच्या नात्यातही लग्न करत नाहीत. आता तुमच्या नात्याबद्दल बोलायचं तर सर्वात आधी तू तुझ्या प्रेयसीशी बोल. तिच्या मनात काय आहे हे जाणून घे. तुम्ही एकमेकांशिवाय जगू शकत नसाल तर पुढे जायला हरकत नाही. तुम्ही तुमच्या कुटुंबातल्या लोकांशी बोला. तुम्हाला समजून घेणाऱ्या व्यक्तीशी बोला. तुम्ही खूप दूरचे नातेवाईक आहात. त्यामुळे या लग्नाला मान्यता मिळू शकते. त्यामुळे आधीच तर्क लढवत बसू नका. घरच्यांशी मोकळेपणाने बोला. तुम्हाला मार्ग मिळेल.

## प्रवास ध्येयनिष्ठ हवा



**स्वत:ला घडवताना...**

करिअर आणि जीवनात यश मिळविण्यासाठी ध्येयनिर्धारण ही पहिली आणि अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. म्हणूनच स्वतःची ध्येये ठरवणे आणि ती गाठण्यासाठी योजना आखणे गरजेचे ठरते.

**तुमची कौशल्ये ओळखा :** तुमची ताकद आणि कमकुवतता कोणती?

**तुमची मूल्ये समजून घ्या :** जीवनात सर्वात महत्त्वाचे काय आहे? कुटुंब, करिअर, समाजसेवा, आर्थिक स्वातंत्र्य हे शोधा.

**स्मार्ट ध्येये ठरवा:** ध्येय स्पष्ट आणि विशिष्ट असावे. उदा. 'नोकरी मिळवायची' ऐवजी 'मार्केटिंग मॅनेजरची नोकरी मिळवायची.' असे ठरवा. ध्येय असे ठरवा की प्रगती मोजता येईल. उदाहरणार्थ, 'पगार २० टक्के वाढवायचा?' हे ध्येय असेल तर मोजदाद करता येईल. मुख्य म्हणजे ध्येय प्राप्त करणे शक्य असावे. दुसरे म्हणजे ध्येय तुमच्या मूल्यांशी आणि दीर्घकालीन योजनांशी जुळले पाहिजे. प्रत्येक ध्येयासाठी मुदत निश्चित करा. दीर्घकालीन आणि अल्पकालीन ध्येये ठरवा. दीर्घकालीन ध्येय जसे की, 'स्वतःचा व्यवसाय सुरू करणे', 'व्यवस्थापकीय पद गाठणे' होय तर अल्पकालीन ध्येय म्हणजे 'प्रमाणपत्र मिळवणे', 'नवीन कौशल्य शिकणे' असे असू शकेल.

वेळोवेळी ध्येयांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. अपयश आल्यास नाउमेद होऊ नका तर ते धडा म्हणून स्वीकारा. कधीही पारंपरिक भूमिकांमुळे बांधील होऊ नका. सकारात्मक लोकांच्या वर्तुळात राहा. नकारात्मक विचार दूर करा. लहान-लहान यशांचेही कौतुक करा. गरज लागेल तेव्हा चर्चा करून कुटुंबाची मदत मागा. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या सगळ्याची सुरुवात आजच करा.





## भोपाळजवळ भटकताना...

**भटकंती**

आपल्या देशात फिरण्यायोग्य अनेक ठिकाणे आहेत. ऐतिहासिक जाण वाढवण्यासाठी किंवा निसर्गाच्या सानिध्यात, शांततेत वेळ घालवण्यासाठी अनेकजण तेथे जातात. बऱ्याचदा हिल स्टेशन्स फक्त उत्तराखंड किंवा हिमाचलमध्ये आहेत असे वाटते. पण मध्य प्रदेशची राजधानी असणाऱ्या भोपाळच्या आसपाही अनेक सुंदर हिल स्टेशन्स आणि पर्यटन स्थळे आहेत. आज त्यांची माहिती घेऊ.

भोपाळपासून सुमारे २०६ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या पंचमढीला 'सातपुड्याची राणी' म्हटले जाते. हे जोडप्यांसाठी, कुटुंबासाठी आणि मित्रांसाठी एक परिपूर्ण ठिकाण आहे. येथील बी फॉल्स, अप्सरा विहार आणि पांडव गुहा पर्यटकांना आकर्षित करतात. येथील राष्ट्रीय उद्यानात तुम्हाला हिरवीगार निसर्ग, जंगले आणि वन्य प्राणी पाहायला मिळतील.

पाताळकोट हे ठिकाण भोपाळपासून २५६ किलोमीटर अंतरावर असलेली एक दरी असून ती घनदाट जंगल आणि उंच झाडांनी वेढलेली आहे. ट्रेकिंग आणि ॲडव्हेंचरची आवड असणाऱ्यांसाठी हे ठिकाण उत्तम आहे. जवळचे छिंदवाडा शहर स्थानिक पदार्थांची चव चाखण्यासाठी आणि भेट देण्यासाठी एक उत्तम ठिकाण आहे.

भोपाळपासून २८७ किलोमीटर अंतरावर असलेले मांडू जहाज महाल आणि प्राचीन वास्तुकलेसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणाचे सौंदर्य एखाद्या युरोपीय शहराची आठवण करुन देणारे आहे. दोन तलावांच्या मध्ये बांधलेला जहाज महाल एखाद्या बोटीसारखा दिसतो. ही त्याची सर्वात मोठी खासियत आहे. मांडू ऐतिहासिक वारशामुळे तसेच सुंदर बागांमुळे पर्यटकांचे आवडते ठिकाण बनलेल आहे.

भोपाळपासून २८५ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या अमरकंटकजवळील मायकेल हिल्सवरून तुम्हाला घनदाट जंगल आणि नद्यांचे अद्भुत दृश्य पाहता येईल. येथून नर्मदा आणि वनगंगा नद्यांचा संगम दिसतो. अमरकंटक शहर धार्मिक दृष्टिकोनातूनदेखील खास आहे.

नैसर्गिक सौंदर्याव्यतिरिक्त भोपाळमध्ये अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळेदेखील आहेत. तिसऱ्या शतकात सम्राट अशोक यांनी बांधलेल्या सांची स्तूप बौद्ध धर्माच्या प्रमुख स्मारकांमध्ये गणला जातो. भोपाळपासून ३२ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या 'भोजपूर' मंदिरात अपूर्ण अवस्थेत असणारे जगातील सर्वात मोठे शिवलिंग बघायला मिळते.

# ...तर पहिली गोळी माझ्या छातीवर!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर/अमरावती, दि. २७ :

शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसह, शेतमालाला हमीभाव, मच्छीमार, शेतमजूर आणि मेंढपाळ बांधवांच्या न्याय्य मागण्यांसाठी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील महाएल्गार आंदोलनाला आज निर्णायक वळण लागले.

शेकडो ट्रॅक्टरसह बच्चू कडूंचा विराट ताफा बेलोरा (ता. चांदूरबाजार) येथून नागपूरच्या दिशेने रवाना झाला. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष करणाऱ्या सत्ताधाऱ्यांशी आता बच्चू कडू आणि समर्थक आरपारच्या लढाईसाठी सज्ज झाल्याचे प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

शासनाच्या घोषणांवर शेतकऱ्यांचा विश्वास संपला आहे. आता त्यांचा तिरंगा म्हणजेच त्यांचा आवाज बनला आहे. आंदोलनात गोळी चालली तर पहिली गोळी मी माझ्या छातीवर घेईल, असे बच्चू कडू म्हणाले.

निवडणुकीपूर्वी सरकारने सातबारा कोरा करू म्हणून दिलेली घोषणा आज केवळ फसवणुकीचा कागद ठरल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. अतिवृष्टी, ढगफुटी आणि बाजारात शेतमालाला न मिळणाऱ्या भावामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष आहे. केंद्र सरकारच्या आयात-निर्यात धोरणामुळे कापसावरील आयातशुल्क माफ करण्यात आले आणि परदेशी कापूस देशात आला. यामुळे देशातील कापूस अक्षरशः रस्त्यावर आला आहे. सोयाबीनचा हमीभाव ५ हजार ३३० असताना, शेतकऱ्याला ते केवळ ५०० ते ३ हजार रुपये या दरात विकावे लागत आहे. यंदा दिवाळी काळोखात बुडाली, असे आंदोलकांचे म्हणणे आहे.

महाएल्गार आंदोलनाला संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून, काँग्रेस पक्षानेही या आंदोलनाला अधिकृत पाठिंबा दिला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रक काढून पाठिंबा जाहीर केला. बच्चू कडू यांनी भ्रमणध्वनीवरून सपकाळ यांचे आभार मानले आणि आंदोलनात सहभागी होण्याची विनंती केली. बच्चू कडू स्वतः ट्रॅक्टर चालवत मोर्चाचे नेतृत्व करत आहेत.

या आंदोलनात मराठवाडा आणि विदर्भातील मेंढपाळ बांधव तसेच मच्छीमार समाजही सहभागी झाला आहे. गेल्या पाच दिवसांपासून शेकडो बैल, शेळ्या-मेंढ्या घेऊन हे बांधव नागपूरकडे कूच करत आहेत.

हा ताफा आज वर्धा येथे मुक्कामी होता. २८ ऑक्टोबरपासून हा मोर्चा नागपूरच्या दिशेने पुढे सरकणार आहे. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन पोलिसांनी मार्गावर कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे.




आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली २८ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे 'महाएल्गार' आंदोलन होणार आहे. आंदोलनाचा बेलोरा ते नागपूर असा १८२ किलोमीटरचा प्रवास निश्चित करण्यात आला आहे. अडगाव, यावली शहीद, डवरगाव फाटा, वर्धा, पवनार, सेलू, केळझर, खडक आणि शेवटी बुटीबोरी येथे हा प्रवास थांबेल. विजय जावंधिया, वामनराव चटप, राजू शेट्टी, महादेव जानकर, डॉ. अजित नवले, कॉ. राजन क्षीरसागर, प्रकाश पोहरे, दीपकभाई केदार, प्रशांत डिक्कर आणि विठ्ठलराजे पवार यांसारखे नेते एकाच मंचावर येत शेतकऱ्यांच्या आत्मसन्मानासाठी एल्गार पुकारणार आहेत.

## धापेवाडा टेक्सटाईल उद्योगासाठी
# नितीन गडकरींचा पुढाकार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे वडीलोपार्जित गाव धापेवाडा, नागपूर जिल्ह्यातील औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण बनत आहे.

धापेवाडा येथे गडकरी यांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या टेक्सटाईल उद्योगाने स्थानिक कापडनिर्मिती उद्योगाला एक नवीन ओळख मिळाली आहे.



नुकतीच येथे ५ कोटी खर्चाने हातमाग केंद्रासाठी एक मोठी इमारत उभारण्यात आली असून, त्याचे उद्घाटन येत्या जानेवारी महिन्यात होणार आहे.

धापेवाडा टेक्सटाईलमध्ये कोश्याच्या साड्या तयार केल्या जातात. सहा महिन्यांपूर्वी मुंबईतील काही मॉडेल्स नागपूरमध्ये आल्या होत्या आणि त्यांनी या साड्यांचे प्रदर्शन केले. प्रदर्शनानंतर या साड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून, सध्या १२ हजार रुपयांच्या या साड्यांसाठी वेटिंग लिस्ट तयार झाली आहे.

धापेवाडा येथे साड्या बनवल्या जातात तर प्रिंटिंग झारखंडमध्ये केले जाते. धापेवाडा टेक्सटाईलच्या साड्या परिधान करून त्या या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. गडकरी यांनी सांगितले की, येथील हातमाग वस्त्र युरोप, अमेरिका तसेच जगभरात निर्यात करण्याचा मानस आहे. हातमाग वस्त्र लोकप्रिय व्हावे यासाठी आम्ही सतत प्रयत्न करीत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

धापेवाडा टेक्सटाईलचा विकास स्थानिक अर्थव्यवस्थेसाठी आणि रोजगार निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. स्थानिक कापड उद्योग आणि हस्तकला यामुळे गावाची ओळख फक्त भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही वाढेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

याचवेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कळमेश्वर शहरातील विकास प्रकल्पांचा भूमिपूजन कार्यक्रमही पार पडला. ते म्हणाले की, कळमेश्वर शहर सॅटॅलाइट सिटी म्हणून विकसित होईल आणि येथील हातमाग उद्योगाच्या माध्यमातून हे शहर जागतिक नकाशावर उभे राहील.

कळमेश्वरमधील रेल्वे क्रॉसिंगवर ५३६ मीटर लांबीचा रेल्वे उड्डाण पुल उभारला जाणार असून, यासाठी ५५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे रेल्वे फाटक बंद होऊन वाहतुकीत होणाऱ्या विलंबापासून नागरिकांना दिलासा मिळणार आहे, तसेच वेळ आणि इंधनाची बचत होणार आहे. याशिवाय वन टाइम इम्प्रूव्हमेंट योजनेअंतर्गत ९.५ किमी रस्त्यांचे दुभाजकांसह सुधारणा, पादचारी मार्ग, बस थांबे, जलनिस्सारण सुविधा, पथदिवे आणि पुलांची पुनर्बांधणी अशा विविध सुविधा योजनेत समाविष्ट आहेत. ९६ कोटी रुपयांच्या या तरतुदीने कळमेश्वरमधील रस्ते आणि वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित व आधुनिक बनविण्याचे उद्दिष्ट आहे.

# तरुणाची हत्या करून मृतदेह जाळला

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २७ :

शहरातील बहुचर्चित अक्षय नागलकर तरुणाच्या बेपत्ता प्रकरणाला वेगळे वळण प्राप्त झाले. दिवाळीच्या दिवशी आठ जणांनी अक्षयला जेवणासाठी हॉटेलमध्ये बोलावून त्याची निर्घृण हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह शेतातून जाळून टाकल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी सुरुवातीला चार आरोपींना अटक केली. उर्वरित चार आरोपींना अहिल्यानगर, बाळापूर व शहरातून ताब्यात घेण्यात आले. अटकेतील आरोपींची संख्या आता आठ झाली आहे.

शहरातील डाबकी रोड पोलीस ठाण्यामध्ये शिला विनायक नागलकर यांनी त्यांचा मुलगा अक्षय नागलकर (वय २६ वर्ष, रा. मारोती नगर, जुने शहर) हा २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता बाहेर जाऊन येतो, असे सांगून घरून गेल्यानंतर बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली.

स्थानिक गुन्हे शाखेचे चार, डाबकी रोड पोलिसांचे दोन व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे दोन असे एकूण आठ पथकांनी शोध सुरू केला. संशयित चंद्रकांत बोरकर याला ताब्यात घेतले. चौकशीमध्ये त्याने ब्रम्हा भाकरे, रोहित पराते, क्रिष्णा भाकरे, आशु वानखडे, शिवा माळी, आकाश शिंदे व अमोल उन्हाळे या आठ जणांनी अक्षयला भौरद येथील हॉटेल एमएच ३० येथे जेवणासाठी बोलावले. पूर्ववैमनस्यातून त्याची हत्या करण्यात आली. मृतदेह ब्रम्हा भाकरे याचे मोरगाव भाकरे येथील शेतातील टिनाच्या शेडमध्ये जाळून टाकल्याची कबुली आरोपींनी दिली.

या प्रकरणात चंद्रकात बोरकर, ब्रम्हा भाकरे, क्रिष्णा भाकरे, आशू वानखडे यांना सुरुवातीलाच अटक झाली. पथकाने रोहित पराते व अमोल उन्हाळे यांना अहिल्यानगर येथून, तर नारायण मेसरे याला बाळापूरमधून ताब्यात घेतले. आरोपी आकाश शिंदेला नंतर ताब्यात घेतले गेले.

# वाघाच्या हल्ल्यात माजी सरपंच ठार



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २७ :

चिमूर वनपरिक्षेत्रांतर्गत डोमा बीटातील शिवरा गावात वाघाने धुमाकूळ घातला असून, नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली आहे.

रविवार, २६ ऑक्टोबरच्या सायंकाळी शिवराचे माजी सरपंच नीलकंठ भुरे (६०) यांच्यावर वाघाने हल्ला केला असता त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना सोमवार २७ ऑक्टोबरच्या सकाळी उघडकीस आली. मागील नऊ दिवसात जिल्ह्यात वाघाने चार जणांचा बळी घेतल्याने मानव, वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. नीलकंठ भुरे हे शेतात गेले असता वाघाने अचानक हल्ला केला. त्यात त्यांचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे, याच परिसरात अवघ्या एका महिन्यात वाघाच्या हल्ल्यातील ही दुसरी घटना आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

## लोकरंजन

# २८ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार 'निर्धार'




आजवर बऱ्याच मराठी चित्रपटांनी समाजाला आरसा दाखवण्याचं काम केलं आहे. समाजात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब नेहमीच रुपेरी पडद्यावर उमटल्याचे पाहायला मिळाले आहे. याद्वारे काही चित्रपटांनी समाजाला नवी दिशा देण्याचेही काम केले आहे. याच वाटेवरील 'निर्धार' हा आगामी मराठी चित्रपट येत्या २८ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक मंदिरामध्ये गणरायाच्या आशीवार्दाने 'निर्धार' चित्रपटाचे कुतूहल जागवणारे पहिले पोस्टर प्रदर्शित करण्यात आले. याप्रसंगी श्री सिद्धिविनायक मंदिर विश्वस्त महेश मुदलीयार आणि जितेंद्र राऊत चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळी उपस्थित होती.

जयलक्ष्मी क्रिएशनच्या बॅनरखाली निर्मात्या पद्मजा वालावलकर यांनी 'निर्धार' चित्रपटाची निर्मिती केली आहे. दिनानाथ वालावलकर यांनी लिहिलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन दिलीप भोपळे यांनी केले आहे. प्रदर्शित करण्यात आलेले पोस्टर देशभक्तीची भावना जागवणारे आहे. पोस्टरवरील तिरंग्याची अनोखी झलक क्षणार्धात लक्ष वेधणारी आहे.

आजवर अनेक व्यक्तिरेखांमध्ये जीव ओतणारे डॉ. गिरीश ओक आणि नायकाच्या रूपातील सौरभ गोगटे पोस्टरच्या केंद्रस्थानी आहेत. त्यांच्या जोडीला इतर कलाकारांनी साकारलेल्या व्यक्तिरेखाही पाहायला मिळतात. पोस्टर पाहिल्यावर हा 'निर्धार' खूप मोठा उठाव करणारा असून, वैचारीक लढाईला चालना देणारा असल्याचे जाणवते. या चित्रपटातील तरुणाई वास्तवातील तरुणाईला भ्रष्टाचाराबाबत काय सांगू पाहते आणि कोणत्या मुद्द्यावर एकवटली आहे हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. भ्रष्ट समाजव्यवस्थेवर प्रहार करण्याचा प्रयत्न या चित्रपटात करण्यात आला असून, त्या विरोधातील युद्ध पाहायला मिळणार आहे. भ्रष्टाचारीरूपी राक्षसाला भस्मसात करण्यासाठी संघर्ष करत समाजापुढे नवा आदर्श ठेवणाऱ्या तरुण पिढीची कथा या चित्रपटात आहे.

■ ■ ■

# रवी जाधव सादर करणार नवा कोरा तमाशापट 'फुलवरा'




पंधरा वर्षांपूर्वी म्हणजेच २०१० साली आलेल्या 'नटरंग' या चित्रपटाने त्या काळात अमाप लोकप्रियता मिळवत प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं होतं. या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं रवी जाधव यांनी तर झी टॉकीजची (आताचं झी स्टुडिओज) ही पहिलीच निर्मिती होती. मराठी चित्रपटसृष्टीत इतिहास घडविणाऱ्या या चित्रपटाची निर्मिती करणारे झी स्टुडिओज, अथांश कम्युनिकेशन आणि दिग्दर्शक रवी जाधव पुन्हा एकदा एकत्र आले आहेत एक नवा कोरा तमाशापट घेऊन ज्याचं नाव आहे 'फुलवरा'.

फुलवराबद्दल बोलताना दिग्दर्शक रवी जाधव म्हणतात की," तमाशा हा माझा आवडता लोककलाप्रकार आहे. तमाशाच्या फडावरती हे कलावंत आपली कला सादर करुन प्रेक्षकांचं मनोरंजन करतात तेवढंच रंजक फडाच्या मागचं त्यांचं आयुष्य असतं आणि हेच आयुष्य मला कायम अस्वस्थ करतं. यावरच आधारीत एक विषय माझ्या डोक्यात होता. याचदरम्यान मी 'द फोक आख्यान' हा एक अनोखा लोककलाविष्कार बघितला आणि त्या सादरीकरणाने मी भारावून गेलो.

सध्याची ही तरुण पिढी ज्या आत्मियतेने आणि तळमळीने आपली लोककला , परंपरा प्रेक्षकांपर्यंत पोहचविण्याचं काम करत आहेत ते वाखणण्याजोगं आहे. त्यांचा हा ध्यास बघूनच त्यांच्या सोबतीने लोककलेचा एक नवा अध्याय प्रेक्षकांसमोर चित्रपटाच्या माध्यमातून मांडावा असा विचार मनात आला आणि त्यातूनच फुलवरा चित्रपटाची गोष्ट तयार झाली. 'द फोक आख्यान' ज्याच्या लेखन आणि निवेदनातून सजलं आहे त्या ईश्वर अंधारेचा या विषयावरचा अभ्यास थक्क करणारा आहे आणि हर्ष विजय या तरुण जोडगोळीला असलेली लोकसंगीताची जाण ही कौतुकास्पद आहे.

'फुलवरा' चित्रपटाची संकल्पना आणि दिग्दर्शन रवी जाधव यांचे असून कथा-पटकथा-संवाद आणि गीते ईश्वर ताराबाई अंधारे यांचे आहेत. संगीत हर्ष-विजय यांचं असून निर्मिती उमेशकुमार बन्सल, बवेश जानवलेकर (झी स्टुडिओज) आणि मेघना जाधव (अथांश कम्युनिकेशन) यांची आहे. चित्रपटात प्रमुख भूमिकेत कोणते कलाकार असतील हे अद्याप गुलदस्त्यात असून याबद्दलची उत्सुकता प्रेक्षकांच्या मनात निर्माण झाली आहे. पुढच्या वर्षीच्या दिवाळीत हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

■ ■ ■

# 'वेल डन आई' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित...

महाराष्ट्राच्या घरोघरी विनोदाचा वर्षाव करीत लोकप्रिय झालेल्या कॉमेडी क्वीन विशाखा सुभेदारची मुख्य भूमिका असलेला 'वेल डन आई' हा चित्रपट मुहूर्तापासूनच प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारा ठरला आहे. टीझर मागोमाग या चित्रपटाचा ट्रेलरही प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. ३१ ऑक्टोबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्यासाठी सज्ज असलेल्या 'वेल डन आई'चा ट्रेलर अतिशय उत्कंठावर्धक आणि कुतूहल वाढवणारा आहे.

या सिनेमाच्या ट्रेलर प्रकाशन सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे जगभरातील सर्व आईंना समर्पित असलेल्या 'वेल डन आई' चित्रपटाचा ट्रेलर कलाकार-तंत्रज्ञाच्या आईच्या उपस्थितीत प्रदर्शित करण्यात आला. दीपाली प्रोडक्शन या बॅनरअंतर्गत निमार्ते सुधीर पाटील यांनी 'वेल डन आई' चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाच्या लेखनासोबतच दिग्दर्शनही शंकर अर्चना बापू धुलगुडे यांनी केले आहे. कथा, पटकथा आणि संवादलेखन संदीप गचांडे व शंकर धुलगुडे यांनी केले आहे. 'वेल डन आई'च्या टीझरने सोशल मीडियावर लक्ष वेधल्यानंतर आता ट्रेलर प्रेक्षकांची उत्सुकता वाढवत आहे.

'तुला नाही वाटत का माझं लग्न व्हावं...' असा नायकाने आपल्या आईला विचारलेल्या प्रश्नाने ट्रेलरची सुरूवात होते. आईच्या भूमिकेत असलेली विशाखा सुभेदारही आपल्या मुलाचे लग्न व्हावे अशीच इच्छा व्यक्त करते. आपल्या मुलाच्या डोक्यावर अक्षदा टाकत 'शुभमंगल सावधान...' म्हणण्यासाठी आतुरलेल्या या आईसमोर काही आव्हाने आहेत. तिचा पती शांताराम माने हाच तिच्यासमोरील मोठे आव्हान असते. नवरदेवाची आई मुलाचे लग्न करण्यासाठी काय काय शक्कल लढवते, पतीची कशी समजूत घालते, या सर्व गदारोळात नायक-नायिकेचे लग्न होते की आणखी काय होते ते चित्रपटात पाहायला मिळेल.




■ ■ ■

# फुलबाजीसारखी झळाळी आणि चिवड्यासारखी उब



प्रकाश, आनंद आणि आठवणींनी भरलेला सण म्हणजे ह्यदिवाळीह्व. या निमित्ताने सगळीकडे उजळून निघालेलं वातावरण, फराळाच्या चविष्ट पंगती, आणि कुटुंबीय आणि मित्रपरिवार यांमधील गोडवा यामुळे दिवाळी खास ठरते. छोट्या-मोठ्या गोष्टींमध्ये प्रत्येकाची एक खास आठवण असते आणि कलाकारही त्याला अपवाद नाहीत. झी मराठीवरील लोकप्रिय मालिका वीण दोघातली ही तुटेना मधील स्वानंदी ही भूमिका साकारणारी तेजश्री प्रधान हिने दिवाळीबद्दल तिच्या भावना उलगडून सांगितल्या . दिवाळीतील फटाके आणि फराळाच्या संदर्भात बोलताना तेजश्री म्हणाली, "मला वाटतं मी फुलबाजीसारखी आहे. ती तड तड आवाज करत प्रकाश देते, पण त्याच वेळी शांततेची अनुभूतीही देते. ती हळूहळू मंद होत जाते .

फराळाच्या पदार्थांबाबत विचारल्यावर तेजश्रीने म्हणते "माझ्या मते, मी चिवड्यासारखी आहे. बाकीच्या फराळाच्या पदार्थांपेक्षा तो थोडा हेल्दी असतो आणि त्यात बऱ्याच गोष्टींचं मिश्रण असतं. त्याप्रमाणे मी ही अनेक विषयांवर बोलते आणि लोकांच्या मनाला आधार देते." तिच्या या विचारांतून तिच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू स्पष्टपणे दिसून येतात.

ती म्हणाली, "मी प्रत्येक दिवाळी कुटुंब आणि मित्रांमध्ये साजरी केली आहे, आणि यंदाही त्यांच्याबरोबरच दिवाळी घालवणार आहे. तेजश्री प्रधान हिच्या या मनमिळावू आणि अंतर्मुख विचारांनी दिवाळीच्या सणाला अजून एक सुंदर पैलू मिळतो जिथे प्रत्येक फुलबाजीचा प्रकाश आणि चिवड्याची उब आपल्या नात्यांमध्ये सौंदर्य फुलवत जाते.

■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# पीएम जनमन योजनेतील कामगिरीसाठी महावितरणचे कौतुक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान म्हणजेच पीएम जनमन योजनेमध्ये महावितरणने केलेल्या कामगिरीचे व १३१ टक्के उद्दिष्टपूतीर्चे केंद्रीय विद्युत मंत्रालयाने कौतुक केले आहे. याबाबत केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पंकज अग्रवाल यांनी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना पाठवलेल्या पत्रामध्ये महावितरणच्या कामगिरीचा गौरव केला आहे.

देशातील दुर्गम भागात निवासी व सर्वार्थाने दुर्बळ आदिवासी गट यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी केंद्र शासनाने पीएम जनमन योजना सुरू केली आहे. दुर्गम भागातील अतिमागास जनजाती समूहांना सुरक्षित घरे, पिण्याचे पाणी, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, उपजीविकेच्या संधी आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधा व सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या योजनेअंतर्गत राज्यातील १६ जिल्ह्यांतील ११३७ गावांमध्ये लाभार्थ्यांना नवीन वीजजोडण्या व त्यासाठी विद्युतीकरणाची कामे महावितरणकडून वेगाने सुरू करण्यात आली. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीही या कामांचा वेळोवेळी आढावा घेतला.

त्याची फलनिष्पत्ती म्हणजे योजनेमध्ये १३१ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली आहे. महाराष्ट्रासाठी ८ हजार ५५६ लाभार्थ्यांना वीजजोडणी देण्याचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात तब्बल ११ हजार २३५ घरांमध्ये नवीन वीजजोडणी कार्यान्वित करण्यात आली आहे.

नवी दिल्ली येथे आदि कर्मयोगी अभियान २०२५ची राष्ट्रीय परिषद नुकतीच झाली. पीएम जनमन योजनेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राष्ट्रपती यांच्याहस्ते केंद्रीय विद्युत मंत्रालयाचा या परिषदेत गौरव करण्यात आला. या गौरवासाठी महाराष्ट्राचा ऊर्जा विभाग व महावितरणचे देखील मोठे योगदान आहे.

दुर्गम भागात निवासी आदिवासी गटांच्या घरांचे विद्युतीकरण करण्यासाठी महाराष्ट्राने केलेल्या कामगिरीचे कौतुक आहे. आदिवासी कल्याण, सक्षमीकरण व सर्वसमावेशक विकासात महाराष्ट्राच्या ऊर्जा विभागाचे व महावितरणचे योगदान महत्त्वाचे आहे, असे केंद्रीय ऊर्जा सचिव पंकज अग्रवाल यांनी पत्रामध्ये नमूद केले आहे

# सावकारांनी सोडली पवारांची साथ

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २७ :

राज्यात पुढील काही दिवसांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असून, सर्वच पक्षांनी निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतराला देखील वेग आला आहे. महाविकास आघाडीला धक्के बसत आहेत. शिवसेना ठाकरे गटाला मोठा फटका बसला असून, राष्ट्रवादी शरद पवार गटातल्या अनेक नेत्यांनी अजित पवार गट आणि भाजपात प्रवेश केला आहे.

गडचिरोली नगरपरिषदेचे पहिले नगराध्यक्ष सुरेश सावकार पोरेडीवार यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटातील महत्त्वाचे नेते अशी त्यांची ओळख आहे. ते गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि नेते विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत हा प्रवेश मेळावा पार पडला. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष हर्षला तेलमुले यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातून आज काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

# आत्महत्येची एसआयटीमार्फत चौकशी व्हावी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :



फलटण मधील त्या डॉक्टर तरुणीला आत्महत्येस कुणी प्रवृत्त केले, तिच्यावर कुणी दबाव आणला याची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी आमची सर्वांची मागणी आहे, तर आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तीला कठोर शिक्षा द्यावी, त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी स्थापन करावी अशी आमची मागणी आहे, असे ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी म्हटले आहे.

बबनराव तायवाडे म्हणाले की, डॉक्टर तरुणीने केलेल्या आत्महत्येला कुणी जातीय रंग देऊ नये. समाजातील सर्वांची तिला न्याय मिळवून देण्याची जबाबदारी आहे. कुठल्याही समाजातील मुलं-मुली असो त्यांना जर कुणी त्रास देत असेल तर त्यांना संरक्षण मिळायला हवे. त्यांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण झाली पाहिजे.

तायवाडे म्हणाले की, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर आज कुठे ओबीसी समाजामधील मुलं-मुली हे डॉक्टर, इंजिनिअर आणि कार्पोरेटमध्ये मोठमोठ्या पदावर आज आम्हाला दिसून आले आहेत. याचा आम्हाला आनंद आणि गर्व आहे. पण हे होत असताना एका डॉक्टर तरुणी इतक्या कमी वयात स्वतःचे जीवन संपवण्याचा निर्णय घेते आत्महत्या करते ही मनाली ठेचणारी गोष्ट आहे. तिला आत्महत्या करण्याकरता कुणी प्रवृत्त केले याचा तपास होणे गरजेचे आहे.

# 'राष्ट्रवादी'च्या ऑफिसमध्ये चक्क लावणीचे ठुमके

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नागपूर येथील कार्यालयात चक्क लावणीचा कार्यक्रम घेण्यात आल्याचा प्रकार उजेडात आला आहे. यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला असून, त्यात एक महिला कार्यकर्ती लावणी सादर करताना दिसून येत आहे. याविषयी समाज माध्यमांत उलटसुलट चर्चा रंगली आहे.

अजित पवारांनी दोन महिन्यांपूर्वी नागपुरातील पक्ष कार्यालयाचे उद्घाटन केले होते. राष्ट्रवादीच्या नागपूर शहराध्यक्षांनी नुकताच या कार्यालयात दिवाळी मिलन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात पक्षाच्याच एका महिला कार्यकतीर्ने २ गाण्यांवर लावणी सादर केल्याचा प्रकार घडला. त्यावेळी पक्षाचे जिल्ह्यातील सर्वच प्रमुख नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. त्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. पक्ष कार्यालयात अशा प्रकारचे नृत्य सादर करणे कितपत योग्य आहे? असा प्रश्न या प्रकरणी उपस्थित केला जात आहे.

व्हायरल व्हिडिओत दिसून येत आहे की, राष्ट्रवादीची एक महिला कार्यकर्ती मला जाऊ द्या ना घरी वाजले की बारा या लावणीवर नृत्य सादर करत आहे. तिचे नृत्य पाहून उपस्थित दर्शक वन्स मोअर मागणी करत आहेत.

व्हिडिओत काही महिला कार्यकर्त्याही दिसून येत आहेत. त्या ही नृत्य सादर करणाऱ्या कार्यकर्तीला प्रोत्साहन देताना दिसून येत आहेत. पण आता याविषयी सोशल मीडियात उलटसुलट प्रतिक्रिया उमटत आहेत.

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रतिमेला धक्का?**

उल्लेखनीय बाब म्हणजे, अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच कार्यक्षमता व कामाला प्राधान्य देणा?या संस्कृतीसाठी ओळखला जातो. पण पक्षाच्या नागपूर येथील कार्यालयात एका कार्यकर्तीने लावणी सादर केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पक्षाच्या या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

कार्यस्थळ हे प्रामुख्याने पक्षाच्या ध्येयधोरणांवर काम करण्यासाठी व जनतेच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी असते. त्यामुळे त्या ठिकाणी लावणी सारखा कार्यक्रम आयोजित करणे हे पक्षाच्या गंभीर व कार्यक्षम प्रतिमेशी विसंगत वाटते.

दुसरीकडे, हा व्हिडिओ व्हायरल झाल्याने राष्ट्रवादीच्या अंतर्गत व्यवस्थापन व कार्यकर्त्यांच्या वर्तनावरही प्रश्न उपस्थित होत आहेत. अजित पवार यांनी स्वतः कार्यस्थळी कठोर कामाची संस्कृती रुजवण्याचा प्रयत्न करत असतात. त्यामुळे या घटनेचा पक्षाच्या प्रतिमेला धक्का बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पक्ष नेतृत्वाने या प्रकरणी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, कार्यालयातील वर्तन नियमावली व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी योग्य व्यासपीठ निवडण्याबाबत स्पष्ट धोरण आखण्याची गरजही या प्रकरणी व्यक्त केली जात आहे. या व्हिडीओची शहरात सर्वत्र चर्चा आहे.

महासागर नागपूर वृत्तसागर

■ मंगळवार, दि. २८, ऑक्टोबर २०२५ ■

## अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, सावरगाव, दि. २७ :**

नरखेड पोलीस पथकाने गुप्त माहितीद्वारे केलेल्या कारवाईत अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करून गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी वडचिचोली -सावरगाव रोड मसोरा फाटा परिसरात पेट्रोलिंग करताना टिप्पर क्रमांक एमएच ३६ एफ ५८०० हा रेतीने भरलेला आढळला. तपासणीदरम्यान चालकाकडे रेती वाहतुकीचा कोणताही परवाना किंवा रॉयल्टी आढळून आली नाही. त्यामुळे पोलिसांनी ४ ब्रास रेती (किंमत ३०,०००) व सदर टिप्पर (किंमत २० लाख) असा एकूण २०.३० लाखांचा माल पंचनामासह जप्त केला. या प्रकरणात वाहनचालक चंद्रशेखर मुन्नाजी नेवारे (वय ३१, रा. फळली मार्केट, काटोल) व वाहनमालक प्रणय मानकर (रा. धंतोली, काटोल) यांच्याविरुद्ध कलम ३०३(२), ४९ भा.दं.वि. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, सहकलम ४, २१ खान खनिज अधिनियम, तसेच कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये नरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे परिसरातील अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. नरखेडसह सावनेर आणि अन्य तालुक्यात रेतीचे अवैध उत्खनन तसेच विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असून, जिल्हाभरातील रेती माफिया सक्रिय झाले आहेत. अनेक रेती माफियांना राजकीय आश्रय असून, राजकीय पक्षांच्या नावाचा वापर करीत हा गोरखधंदा सुरू आहे. खनीकर्म, पोलीस आणि महसुल विभागाने कारवाई केल्यास राजकीय दबाव आणला जात असल्याची माहिती आहे

# पोलीस चौकीमुळे सुरक्षिततेला मिळणार बळ

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

नागपुरच्या वाढत्या विस्ताराला लक्षात घेऊन सुरक्षितता व सुरक्षा नियोजनाच्या दृष्टीने काही भागांसाठी पोलीस चौक्यांची आवश्यकता होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दिलेले निर्देश लक्षात घेऊन शहरातील पाच ठिकाणी पोलीस चौकींची उपलब्धता करण्यात आली आहे.

यामुळे निश्चितच शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासह अपघाताचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी



व्यक्त केला.

पोलीस आयुक्त कार्यालयात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते पाच पोलीस चौकीचे दूरदृष्य प्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पोलीस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, सहपोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त राजेद्र दाभाडे, शिवाजी राठोड, पोलीस उपायुक्त लोहित मतानी, दिपक अग्रवाल व वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. गणेश नगर कोराडी, कापसी, जामठा, गोंडखैरी, उमरगाव या ठिकाणी पोलीस चौकी साकारण्यात आल्या आहेत.

पोलीस विभागाच्या यु-टर्न ऑपरेशनमुळे वाहतुक सुरक्षित होणार असून अपघाताचे प्रमाण कमी होणार आहे. शहर आता आंतराष्ट्रीय शहर म्हणून नावारुपास आले आहे.

सुरक्षीत नागपूरसाठी युवकांचा सहभाग आवश्यक असून त्यासाठी पोलीस विभागाने युवकांना सोबत घेऊन सुरक्षीत नागपूर उपक्रमाला लोकसहभागाची जोड द्यावी, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

यु- टर्न ऑपरेशनमुळे कायदा व सुव्यवस्था सुरळीत होण्यास मोठा हातभार लागणार असून नागरिकांसाठी वाहतूक सोईची होईल, त्यांनी सांगितले.

## अनैतिक संबंधातून पत्नीची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा, दि. २७ :**

अनैतिक संबंधातून पतीने पत्नीच्या डोक्यावर फावड्याने मारून तिची हत्या केली. ही थरारक घटना एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत पंचशीलनगर परिसरात घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. रिंकी किशोर प्रधान (२३) असे मृत महिलेचे नाव आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी पती किशोर शंकर प्रधान (३१) याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किशोर गॅरेजमध्ये काम करतो. सोबतच तो मोलमजुरीही करीत होता. जवळपास ५ वर्षांपूर्वी त्याचे रिंकीशी लग्न झाले होते, मात्र त्यांना मुळबाळ नव्हते. या दरम्यान रिंकीची करण नावाच्या तरुणाशी मैत्री झाली. मैत्रीचे रुपांतर लवकरच प्रेमसंबंधात झाले. किशोरच्या अनुपस्थितीत करण तिच्या घरी येऊ लागला. याबाबत आसपासच्या लोकांनी करणला माहिती दिली. तेव्हापासून तो रिंकीवर चिडलेला होता. त्याने रिंकीला करणपासून दूर राहण्यास सांगितले. त्यामुळे रिंकीने करणशी व्हॉट्सॲपवर व्हीडिओ कॉल आणि चॅटिंग सुरू केली. किशोरने पुन्हा तिला समजवण्याचा प्रयत्न केला. यावरून दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले. २५ दिवसांपूर्वी रिंकी करणसोबत पळून अहमदाबादला गेली होती. किशोरने नातेवाईकांची मदत घेतली आणि ९ दिवसानंतर रिंकी घरी परतली. यावेळी करण यालाही समजवण्यात आले होते. रिंकीनेही माफी मागितली होती आणि सर्व सुरळीत सुरू झाले. काही दिवस जाताच रिंकीने पुन्हा करणशी बोलचाल सुरू केली. रविवारी दुपारी किशोर कामावरून घरी परतला असता रिंकी व्हीडिओ कॉलवर करणशी बोलताना दिसली. किशोरला पाहताच तिने फोन लपवण्याचा प्रयत्न केला.

### घटनास्थळाच्या पाहणीत खुलासा

किशोरने तिचा मोबाईल तपासला असता व्हीडिओ कॉल आणि चॅटिंग दिसली. किशोरचा पारा चडला. त्याने रागात घरात ठेवलेला फावडा रिंकीच्या डोक्यावर मारला. रिंकी रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळली. त्यानंतर किशोर बाहेर आला. आसपास लोकांना भिंतीवर डोके आदळल्यामुळे रिंकी जखमी झाल्याची माहिती दिली. त्यांच्या मदतीने तो रिंकीला जवळच्या रुग्णालयात घेऊन गेला. डॉक्टरांनी तपासून रिंकीला मृत घोषित केले आणि एमएलसी एमआयडीसी पोलिसांकडे पाठवली. तात्काळ एमआयडीसीचे सपोनि संजय बनसोड पथकासह किशोरच्या घरी पोहोचले. घटनास्थळाची पाहणी केली असता खुनाचा खुलासा झाला, तरीही किशोर आपली खोटी कहानीच पोलिसांना ऐकवत होता. मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने खुनाची कुबली दिली आणि पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या.

## बार्टीच्या कौशल्य विकास प्रशिक्षणाचा अनुसूचित जातीच्या युवकांना लाभ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

बार्टी राज्यातील अनुसूचित जातींच्या युवक-युवतींना प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून सक्षम करण्याचा उपक्रम राबवत आहे. महाराष्ट्रातील सर्व 36 जिल्ह्यांमध्ये चालू असलेल्या या कार्यक्रमामुळे अनेक युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. उद्योग, सेवा, माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, शेती व खाद्य प्रक्रिया क्षेत्रात प्रशिक्षण उपक्रम सुरू आहेत.

या उपक्रमाचा उद्देश युवकांना व्यावसायिक, तांत्रिक आणि उद्योजकतेच्या कौशल्यांनी सक्षम करणे हा आहे. त्यामुळे ते रोजगाराच्या संधी मिळवू शकतील किंवा स्वतःचा व्यवसाय उभा करू शकतील. या प्रशिक्षणांतर्गत युवकांना उद्योग, सेवा, माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, हातमाग, शेती, खाद्य प्रक्रिया यांसारख्या विविध क्षेत्रांत प्रशिक्षण दिले जात आहे.

बार्टीच्या कौशल्य विकास प्रशिक्षणाला राज्यातील अनेक नामांकित प्रशिक्षण भागीदारांचा पाठिंबा मिळत आहे. त्यामध्ये सह्याद्री रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशन, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, ब्राईट फ्युचर इंडिया, स्किल टेक साई सर्व्हिस फाउंडेशन, सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, इंडो-जर्मन टुल रूम, टेक महिंद्रा स्मार्ट अकॅडमी फॉर हेल्थकेअर, खादीग्राम उद्योग महामंडळ, टाटा स्ट्राईव्ह आदी संस्थांचा समावेश आहे. या उपक्रमात सामाजिक न्याय विभागाचे मार्गदर्शन, तसेच प्रशिक्षण भागीदार व प्रशिक्षकांचे सहकार्य लाभत आहे.

## रिसॉर्टमधील जुगार अड्डयावर धाड

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

जुनी कामठी पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर ठाण्यांतर्गत एका रिसॉर्टमध्ये सुरू असलेल्या जुगारावर धाड टाकली. यावेळी १५ जुगाऱ्यांना पैशांची बाजी लावून हार-जीतचा खेळ खेळताना रंगेहात अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून रोकड आणि इतर साहित्यासह एकुण १ लाख ३७ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमालही जप्त केला. पिंटू वासनिक (३०) रा. भरतवाडा, प्रविण पाठराबे (४०), राजेश कांबळे (३८), राजकुमार बोकडे (३६), रोशन कुटे (३४) चौघेही रा. पिवळी मारबत चौक, रवींद्र डोनेकर (४१) रा. आमगाव-गोंदिया, सूरज बोहरे (३२) रा. मस्कासाथ, प्रकाश वर्मा (४०), युवराज गोनाडे (४०), रवी वाघमारे (४०) तिन्ही रा. कळमना, नीतेश कोहाळ (३६) रा. कांजी हाऊस चौक, त्रिलोक खोत (२७) रा. जागनाथ बुधवारी, सुरेश खवसे (४१) रा. बिनाकी मंगळवारी, श्रीकांत मोहाडीकर (३४) रा. पाचपावली आणि राहुल पराते (३०) रा. नवीन मंगळवारी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. खैरी परिसरातील तारा फार्म्स ॲन्ड रिसॉर्टमध्ये सुरू असलेल्या पार्टीत मोठ्या प्रमाणात जुगार खेळला जात असल्याची माहिती कामठी पोलिसांना रविवारी सायंकाळी मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी तेथे धाड टाकली. यावेळी वरील आरोपींना ताशपत्त्यांवर पैशांची बाजी लावून हार-जीतचा खेळ खेळताना रंगेहात पकडण्यात आले. पोलिसांनी त्यांच्याकडून रोख १८,५९० रुपये, ५ मोबाईल फोन, १ दुचाकी वाहन, ताशपत्ते आणि इतर साहित्य असा एकूण १.३७ लाख रुपयांचा माल जप्त केला.

## गोपाल डेअरीचे आगीत नुकसान



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

गोपाल डेयरी सेमिनरी हिल्स नागपुर येथे पहाटे सकाळी चार वाजता दरम्यान भीषण आग लागली यात सुदैवाने कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

परंतु आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दल सज्ज झाले परंतु सर्व सामान जळून खाक झाल्याने गोपाल डेअरी मधील मालक यांच्या मते २५ लाख रुपयांची हानी झाली आहे. नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवले आहे.



*नागपूर : छटपुजेचा उत्सव आज शहरात साजरा करण्यात आला. येथील अंबाझरी आणि अन्य तलावावर महिलांनी मोठ्या भक्तीभावाने हिंदी भाषिक महिलांनी पुजाअर्चा केली.*

## रेल प्रकल्पाच्या फेज-२ अंतर्गत उर्वरित कामांना वेग

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २७ :**

मेट्रो रेल प्रकल्पाच्या फेज-२ अंतर्गत प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्ट नगरच्या ५.३१ किमीच्या कामांची सुरुवात झाल्यानंतर उर्वरित कामांना वेग आला आहे. यामुळे भंडारा रोडवरील औद्योगिक परिसर, ट्रान्सपोर्ट नगर, कळमना मार्केट, विद्यापीठ तसेच हिंगणा, बुटीबोरी, कान्हन आणि नागपूर शहरातील इतर भाग यांमधील कनेटिव्हिटी सुधारण्यास मदत होणार आहे. पारडी फ्लायओव्हर सुरु झाल्यानंतर आता महा-मेट्रोच्या दोन फ्लायओव्हर डेक्समधील ३ मीटर अंतरातून मेट्रो पियर आणि मेट्रो पियर कॅप बांधण्याचे केल्या जात आहे. महा-मेट्रोने ७१ पियर आणि पियर कॅप्सपैकी ३३ पियर्स आणि १० पियर पूर्ण केल्या आहेत. डबल डेकरसाठी सेगमेंट लॉन्चिंगचे काम नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात



सुरू होण्याची अपेक्षा मेट्रो रेलच्या वतीने व्यक्त केली आहे.

महा-मेट्रोने रीच-४अ मध्ये सेगमेंट लॉन्चिंगचे काम सुरू केले असून प्रक्रियेत प्रीकास्ट कॉंक्रीट सेगमेंट्स उचलून आणि अचूकपणे बसवून व्हायडक्टची रचना केल्या जात आहे. ३१ मीटर लांबीचा स्पॅन शिवालिक लॉन्चिंग गर्डर वापरून यशस्वीपणे बसविण्यात आला आहे. हा टप्पा प्रकल्पाच्या प्रगतीतील एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड ठरला आहे.

लॉन्चिंग गर्डरमधील विंच असेंब्लीद्वारे सेगमेंट्स एकामागून एक उचलले जातात. ही प्रक्रिया सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून केली जाते.

ज्यामध्ये लिफ्टिंग प्लॅन, रिस्क ॲहसेसमेंट, लिफ्ट परमिट तसेच उपकरणे आणि प्रशिक्षित कर्मचारी यांचा वापर केला जातो. सुरक्षा ही संपूर्ण प्रक्रियेत सर्वोच्च प्राधान्याने पाळली जाते. एलजीचे कार्यक्षेत्र ४ पी ४० ते ४ पी ९९ पर्यंत असून एकूण ५९ स्पॅन (१.७४ किमी लांबीचा उंच व्हायडक्ट) यात समाविष्ट आहेत. एका स्पॅनचे सेगमेंट लॉन्चिंग ज्ञ ज्यात सर्व सेगमेंट्सचे लिफ्टिंग, ड्राय मॅचिंग, ग्लूसइंग, पोस्ट-टेंशनिंग आणि स्पॅन लोअरिंग यांचा समावेश असतो. ही प्रक्रिया साधारणपणे ५ ते ७ दिवसांत पूर्ण केली जाते. मध्ये सुरू करण्यात आलेला शिवालिक एलजी हा पहिला लॉन्चिंग गर्डर आहे.

रीच-४अ मध्ये व्हायडक्टचा किमी लांबीचा भाग हा डबल डेकर रचनेचा असून, याला सर्वसाधारणपणे पारडी डेकर म्हणून ओळखले जाते. एनएचएआय आणि महा-मेट्रो यांच्यातील सामंजस्य करारानुसार, एनएचएआय ने कॉमन फाउंडेशन्स आणि कॉमन पियर्स फ्लायओव्हर लेव्हलपर्यंत बांधून एच बी टाऊन व भंडारा फ्लायओव्हर डेक्स बसविले आहेत.

# डॉ. संपदा मुंडे यांना न्याय देण्यासाठी मॅग्मो संघटनेचा शासनाविरुद्ध एल्गार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

सातारा जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय, फलटण येथील कार्यरत असलेल्या महिला वैद्यकीय अधिकारी दिवंगत डॉ. संपदा मुंडे यांनी दैनंदिन कामकाजाच्या प्रचंड तणावामुळे व त्यांच्यावर झालेल्या शारीरिक अत्याचारामुळे आपले जीवन संपवले. पीडितेने घटनेपूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार अर्ज केला होता. या अर्जात नमूद केलेल्या बाबींकडे प्रशासनाने गांभीर्याने विचार न केल्याने एका वैद्यकीय अधिकाऱ्याला जीवनास मुकावे लागले. मरण्यापूर्वी आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या अत्याचाराविरुद्ध व दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर योग्य कायदेशीर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी गट अ संघटनेच्या वतीने करण्यात आलेली आहे.

संघटनेच्या वतीने जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी, प्रशासकीय व शिस्तभंगाची कारवाई, प्रकरणाचा निष्पक्ष व सखोल तपास महिला आयपीएस अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकामार्फत करण्यात यावा, चे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात दाखल करून जलद न्याय प्रक्रियासाठी विशेष सरकारी वकीलाची नेमणूक करण्यात यावी, वैद्यकीय अधिकाऱ्यांवरील हल्ले व छळ थांबवण्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद करण्यात यावी शिवाय पीडित कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात यावी.




या मागण्या येत्या दहा दिवसात मान्य न झाल्यास राज्यातील सर्व राजपत्रित,अराजपत्रित आणि आरोग्य कर्मचारी तातडीच्या सेवा वगळता सर्व ओपीडी व आयपीडी सेवा बंद ठेवण्यास बाध्य राहतील. सकारात्मक निर्णय न झाल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा मॅग्मो संघटनेने पत्र परिषदेत दिला. आंदोलन चार टप्प्यात करण्यात येईल. 27 ऑक्टोबर ते 31 ऑक्टोबर पर्यंत सर्व वैद्यकीय अधिकारी काळी फित लावून काम करतील. एक नोव्हेंबर ते सहा नोव्हेंबर प्रशासकीय कामकाज, प्रत्यक्ष बैठका, अहवाल इत्यादीवर बहिष्कार टाकण्यात येईल. सात नोव्हेंबर ते 13 नोव्हेंबर सर्व आरोग्य संस्थांमधील ओपीडी सेवा बंद राहतील. 14 नोव्हेंबर पासून शासनाचा सकारात्मक निर्णय लागेपर्यंत आंदोलन सुरू राहील. अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. पत्रपरिषदेला डॉक्टर राहुल कन्नमवार, अध्यक्ष राजपत्रित अधिकारी संघटना गट अ महाराष्ट्र राज्य, डॉ. निलेश ठवरे, राज्य प्रमुख समन्वयक महाराष्ट्र राज्य, डॉ. विजय आकोलकर , डॉ. संदीप गेडाम, वरिष्ठ उपाध्यक्ष, डॉ. प्रमोद रेवाळे, उपाध्यक्ष, डॉ. नरेंद्र डोमके, अध्यक्ष प्रसिद्धी सेल, डॉ.प्रवीण पडवे, अध्यक्ष मॅग्मो नागपूर, डॉ. प्रवीण उमरगीकर, सचिव नागपूर, संघर्ष राठोड, डॉ.संदीप धरमठोक उपस्थित होते.

## ७.१६ लाखांच्या मालावर डल्ला

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २७ :**

दिवसाढवळ्या फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात आरोपींनी रोकड आणि दागिन्यांसह एकूण ७ लाख १६ हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी श्रीगोपाल मदनलाल सोनी (८५) रा. जयस्वाल अपार्टमेंट, उमिया कॉलनी, नंदनवनच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. या घटनेने संपूर्ण अपार्टमेंटमध्ये एकच खळबळ उडाली आहे. सोनी कुटुंबाचा संगणक विक्रीचा व्यवसाय आहे. ते शाळा, कार्यालय व इतर ठिकाणी मागणीनुसार संगणकांचा पुरवठा करतात. गुरूवारी सकाळी ९.१५ वाजताच्या सुमारास सोनी कुटुंब भाऊबीज साजरी करण्यासाठी घराला कुलूप लावून प्रजापतीनगरात राहणाऱ्या नातेवाईकाच्या घरी गेले होते.

या दरम्यान अज्ञात आरोपींनी फ्लॅटच्या मुख्य दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटात ठेवलेली दीड लाखांची रोकड, सोन्याचे दागिने आणि हिऱ्यांचा हार असा एकूण ७.१६ लाख रुपये किंमतीचा माल चोरी करून पसार झाला. अपार्टमेंटच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता हेलमेट घातलेले दोन आरोपी अपार्टमेंटमध्ये शिरताना दिसत आहेत.

### डॉ. संपदा मुंडे प्रकरणी सरकारकडून निष्पक्ष चौकशीची मागणी

## नागपूर कॉंग्रेस कमिटीतर्फे मेणबत्ती मार्च

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २७ :**

सातारा जिल्ह्यातील फलटण येथील तरुणी डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्येचे प्रकरण अधिकच गडद होत चालले आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असताना, माजी खासदार आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या कथित भूमिकेबद्दल सरकारला अधिकाधिक लक्ष्य केले जात आहे आणि आक्रमकपणे टीका केली जात आहे. मध्यवर्ती नागपूर कॉंग्रेस कमिटीच्या कार्यकर्त्यांनी आमदार विकास ठाकरे आणि माजी मंत्री अनीस अहमद यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस अतुल कोटेचा यांच्या उपस्थितीत इतवारी येथील चितार ओली महात्मा गांधी पुतळ्यासमोर मेणबत्ती मोर्चा काढला.




सरचिटणीस अतुल कोटेचा यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले की, "इतरांची सेवा हा आपला धर्म मानणारा एक आशादायक डॉक्टर भ्रष्ट व्यवस्थेला आणि सत्तेच्या रचनेत रुजलेल्या गुन्हेगारांच्या दडपशाहीला बळी पडला. गुन्हेगारांपासून जनतेचे रक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे."

श्री. कोटेचा पुढे म्हणाले की, भाजपशी संबंधित काही प्रभावशाली लोकांनीही डॉक्टरवर भ्रष्टाचारात सहकार्य करण्यासाठी दबाव आणला होता. या मेणबत्ती मार्च आंदोलनात प्रमुख म्हणून श्री. दिनेश बानाबाकोडे, रिंकू जैन, श्रीकांत ढोलके, डॉ. मेहुल अडवाणी, हलबा नेते रवी श्याम पराते, प्रकाश बन्नाटे, कार्यक्रम समन्वयक अभिजीत ठाकरे, ब्लॉक प्रमुख गोपाल पट्टम यांनीही आपले विचार व्यक्त केले आणि मृत संपदा मुंडे यांना श्रद्धांजली वाहिली आणि त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्याचे आवाहन राज्य सरकारला केले.

यावेळी सर्वश्री मनीष चालानी, आलोक कोंडापूरकर, अशोक निखारे, आयुष राऊत, प्रमोद मोहाडीकर, सुभाष वानखेडे, तौसिफ अहमद, नियाज नाजू, निजाम अन्सारी, रिजवान अन्सारी, संतोष सिंग, दुर्गेश प्रधान, मयूर भोस्कर, शिवशंकर रणदिवे, ओमराव शाहूकर, ओमराव पाटील, आर. चांदपूरकर, केतन निमजे, प्रशांत निमजे, रोशन लारोरकर, जय निनावे, क्षितीज वाडेकर, आकाश ठाकरे, भास्कर कोहाड, उज्वला शेंडे, धैर्यशील ढेंगरे, शेखर बेंडेकर, आशिष राखंडे, गौरव कुर्हाडकर, आशिष राखंडे, गौरव कुर्हाडकर,

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नागपूर शहरतर्फे 'दिवाळी मिलन'

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

दीपावलीच्या मंगल पर्वाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नागपूर शहर व ग्रामीण तर्फे भव्य 'दिवाळी मिलन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या स्नेहमेळाव्यात शहर आणि परिसरातील विविध धर्म, पंथ आणि सामाजिक स्तरावर समाजासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या 'सामाजिक योद्ध्यांचा' विशेष सन्मान करण्यात आला.

एकतेचा आणि कृतज्ञतेचा संदेशः पक्षाच्या वतीने हा कार्यक्रम केवळ दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी नव्हे, तर समाजात सकारात्मक बदल घडवणाऱ्या, निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. विविध धर्माचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित




करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जातीय सलोखा आणि 'सर्वधर्म समभाव' या मूल्यांचा दृढ संदेश दिला.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या सुमारे १० सन्माननीय व्यक्तिमत्त्वांचा यावेळी शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यामध्ये ख्रिस्ती धर्माचे पास्टर, त्यांच्या क्षेत्रात गरजू रुग्णांना मदत करणारे विठ्ठलराव गायकवाड तसेच बौद्ध धर्मातील लेखक, महिलांसाठी आणि बचत गट यासाठी बेबी ताई रामटेके, मिनिंद मानकर, सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या मराठी लावणी सादर करते सौ.शिल्पा शाही यांचा विशेष गौरव करण्यात आला.

सन्मानित झालेल्या व्यक्तींमध्ये हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिस्ती, बौद्ध अशा सर्वधर्मीय सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश होता. यावेळी मान्यवरांनी बोलताना सांगितले की समाजातील अंधकार दूर करून, मानवतेची ज्योत पेटवणाऱ्या या सर्व सामाजिक योद्ध्यांचा सन्मान करणे, हे आमच्या पक्षाचे कर्तव्य आहे. नागपूर शहरात सामाजिक एकोपा अधिक मजबूत व्हावा, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नेहमीच प्रयत्नशील राहील. असे मत व्यक्त केले.

यावेळी शहराध्यक्ष अनिल अहिरकर, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ टाकसाळे , कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर महिला शहराध्यक्षा सौ सुनीता येरणे युवक अध्यक्ष विशाल खांडेकर तानाजी वनवे, बजरंग सिंग परिहार, जानबा मस्के, राजपाल सिंग चव्हाण, मुकेश रेवतकर, संदीप सावरकर, ब्रह्म मस्के, किरण नंदनवार, राजू राऊत, नूतन रेवतकर राकेश घोसेकर, विवेक वानखेडे, संतोष भुजाडे सुरेंद्र मोरेआणि अभीदत्त फाले,कनीजा बेगम, मालुताई वनवे, एकनाथ फलके, मेहबूब पठाण, मोंटी गंडेचा, शहाज बाजी, रेखा चरडे, संगीता अंबारी, शोभा येवले, लक्ष्मणराव बाळबूदे, राजू मिश्रा, लक्ष्मीकांत पांडे,अंजुम शेख, संजय तिवारी, राजेश शुक्ला अनिल पवनीपगार, नागेश दीड मोठे किशोर तरटे ताजी मंडळे मंडले कपिल मेश्राम, वसीम पटेल,सलाम भाई, उत्कर्ष गाडबैल, नानाजी जांभुळकर, प्रकाश वाघमारे, राजेश आंबुलकर, राजेंद्र भोयर, प्रभुदास तायवडे, संजय जोशी, निशा मुंडे, कृष्णकांत मोहोळ उमाजी कोहळे, पक्षाचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रामाणिकपणा प्रतिज्ञा समारोहाचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

सतर्कता जनजागृती सप्ताह 2025 निमित्त सतर्कता : आपली सामायिक जबाबदारी या विषयावर आज मध्य रेल्वे, नागपूर विभागातील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात एक प्रामाणिकपणा प्रतिज्ञा समारोह उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सहाय्यक कार्मिक अधिकारी एस. एम. बोरकर यांच्या स्वागत भाषणाने झाली. त्यांनी सार्वजनिक सेवेत नैतिक मूल्ये, पारदर्शकता आणि जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच सर्व कर्मचारी यांनी आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक वर्तनात प्रामाणिकपणा व सत्यनिष्ठा राखून भ्रष्टाचारमुक्त कार्यसंस्कृती घडविण्याचे आवाहन केले. यानंतर अमोल कुमार पिंगळे, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (प्रशासन) यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रामाणिकपणा प्रतिज्ञा दिली. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी नमूद केले की प्रामाणिकता आणि नैतिक वर्तन राखणे ही प्रत्येक रेल्वे कर्मचाऱ्याची सामूहिक जबाबदारी आहे आणि सतर्कता ही सुशासनासाठी आवश्यक असलेली अखंड प्रक्रिया आहे. या कार्यक्रमाला वरिष्ठ अधिकारी, शाखा अधिकारी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी पारदर्शक आणि जबाबदार कार्यसंस्कृती टिकविण्याचा निश्चय व्यक्त केला. समारोपाच्या वेळी कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य, जबाबदारीची जाणीव आणि संस्थेमध्ये प्रामाणिकपणा तसेच नैतिक वर्तनाला जीवनशैली म्हणून आत्मसात करण्याचा संकल्प दृढ करण्यात आला.

# भगवान बिरसा कलासंगमची विभागीय फेरी २८ रोजी अमरावतीमध्ये

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

आदिवासी एकता मित्र मंडळ, स्व. लक्ष्मणराव मानकर ट्रस्ट आणि प्रगती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या भगवान बिरसा कलासंगम ही राज्यस्तरीय आदिवासी कलास्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेची पश्चिम विदर्भाची विभागीय फेरी अमरावती येथे मंगळवार, 28 ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. सकाळी 10 वाजता क्षीतिज पॅलेस, राजपूत धाब्याजवळ, नवसारी चौक, अमरावती येथे होणा-या या फेरीत पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम व यवतमाळ जिल्ह्यांतील 400 स्पर्धक सहभागी होणार आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी कलाकारांना संधी, सन्मान आणि राज्यस्तरीय ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या या स्पर्धेमध्ये नृत्य, गायन, वाद्य वादन, चित्रकला, हस्तकला, रील्स, व्लॉग्स, फोटोग्राफी तसेच डॉक्युमेंटरी आणि शॉर्ट फिल्म या प्रकारांत ही स्पर्धा घेण्यात येत आहे.

पूर्व विदर्भाकरिता ही स्पर्धा गडचिरोली येथे होणार असून महाराष्ट्र राज्यस्तरावरील स्पर्धेचे आयोजन नागपूर येथे पुढील महिन्यात केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्यावतीने घेण्यात येणा-या या अंतिम फेरीतील विजेत्यांना भरघोस पारितोषिके दिली जाणार आहेत, असे लक्ष्मणराव मानकर ट्रस्टचे सचिव प्रशांत बोपर्डीकर यांनी कळवले आहे.

## एआयआयएमएस नागपूरच्या बालरोग विभागातील लहान देवदूतांसोबत दीपावली साजरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

माझ्या मनात अपार आनंद आणि अभिमानाची भावना आहे की एआयआयएमएस नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संचालक डॉ. प्रशांत जोशी आणि बालरोग विभाग प्रमुख प्रा. मीनाक्षी गिरीश यांनी दिलेल्या वैयक्तिक आमंत्रणामुळे मला या आगळ्या-वेगळ्या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली. या प्रसंगी बालरोग विभागातील लहान देवदूतांबरोबर दीपावली साजरी करताना त्यांच्या आणि त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर झळकणारा आनंद आणि उत्साह पाहून मन हेलावून गेले. या तेजस्वी सणात आशेचा आणि आनंदाचा प्रकाश खऱ्या अर्थाने पसरलेला दिसला. या उपक्रमांतर्गत सुमारे ५० बालरुग्णांना पौष्टिक राजगिऱ्याची चिक्की, गव्हाचे बिस्किटे आणि वयोगटानुसार योग्य खेळणी वाटण्यात आली. या छोट्याशा भेटवस्तूंनी मुलांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

विशेष आभार डॉ.निलेश नागदेवे, वैद्यकीय अधीक्षक आणि डॉ. नीता जोशी, वरिष्ठ बालरोगतज्ज्ञ व संचालकांच्या सहचारिणी यांचे, ज्यांनी या संस्मरणीय कार्यक्रमाला आपली उपस्थिती लावून तो अधिक खास बनविला. एआयआयएमएस नागपूरमधील सर्व डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचारीवर्ग यांना समर्पित, निःस्वार्थ आणि निष्ठावान सेवाभावाबद्दल आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

# सीबीएसई शाळा होणार ३ नोव्हेंबरला सुरु

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

सीबीएसई शाळांनी १ नोव्हेंबरपर्यंत दिवाळीच्या सुट्या द्याव्यात अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा विभागीय शिक्षण विभागाच्या उपसंचालक माधुरी सावरकर यांनी दिला आहे. त्यानुसार शाळांनीही आता ३ नोव्हेंबरपासून शाळा सुरू करणार असल्याचे संदेश पालकांना पाठविणे सुरू केले आहे. सीबीएसई शाळांना दिवाळी, ख्रिसमस तसेच उन्हाळी सुट्या देणे आहे. दिवाळी सुट्यांचा कालावधी १८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर, ख्रिसमस २२ ते २५ डिसेंबर, तसेच उन्हाळी सुट्या नियमानुसार देणे अनिवार्य आहे. यासंदर्भात शिक्षण विभागाने १५ सप्टेंबरला परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. यानंतरही अनेक शाळांनी धनत्रयोदशी व नंतरही नियमित शाळा सुरु केवळ २८ ऑक्टोबरपर्यंतच दिवाळी सुट्या जाहीर केल्या होत्या. या गंभीर दखल घेत शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर यांनी १५ सप्टेंबरच्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे, अन्यथा संबंधित शाळांविरुद्ध कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे.

## कुख्यात गुंडाला केले तडीपार

नागपूर: परिमंडळ ३ च्या पोलिस उपायुक्तांनी पाचपावली हद्दीतील कुख्यात गुंडाला नागपूर जिल्ह्यातून २ वर्षांकरिता तडीपार केले आहे. रितिक उर्फ सोमेश विलास पराते (२४) रा. लाडपुरा, नंदगिरी रोड, पाचपावली असे तडीपार केलेल्या गुंडाचे नाव आहे. रितिक हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याच्याविरुद्ध पाचपावली ठाण्यात अनेक गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद आहे. वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याच्या वर्तणुकीत कोणतीही सुधारणा होत नव्हती. तो सतत गुन्हेगारीत सक्रीय होता. त्यामुळे त्याची लगाम कसण्यासाठी पाचपावली पोलिसांनी हद्दपारीचा प्रस्ताव तयार करून पोलिस उपायुक्तांकडे पाठवला. त्याचा अभिलेख तपासल्यानंतर पोलिस उपायुक्तांनी त्याला नागपूर शहर आणि ग्रामीणमधून २ वर्षांकरिता हद्दपार करण्याचे आदेश दिले. रितिकला अटक करून यवतमाळ येथील त्याच्या नातेवाईकांकडे सोडण्यात आले आहे. तो परिसरात परतला तर पोलिसांना त्याची सूचना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विश्व आदिवासी दिनानिमित्त लाव्हा येथे रॅलीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २७ :

लाव्हा येथील जय बिरसा आदिवासी विकास सोसायटी यांच्या वतीने विश्व आदिवासी दिवसानिमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात आंबेडकर नगर येथे बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाली. त्यानंतर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व ध्वजवंदन पार पडले.सोनबा नगर येथे कुवारा भिवसन पेन पूजन करून बिरसा मुंडा प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले.

तसेच टेकडी वाडी येथे बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाला सुखलाल भलावी, दिनेश उईके, सचिन सलामे, विनोद करनाके, महेश धुर्वे, श्रावण कुळमते, बुधाराम कोवाचे, वाढवे, भोजराज पुसाम, रमेश सलामे, कपील पुसाम, सौरभ वरठी, राजकुमार बोरकर, बोरकर,धनपाल,मरसकोल्हे, महेश कुरसंगे, रेखलाल खंडाते, प्रमोद वरठी, जगदीश मरकाम, मनीष उईके, कठोतेजी, यशोदा मडावी, शारदा मरसकोल्हे, इंदिरा कुरसंगे, राजेश कोडापे, पेंदाम, दुर्गा कुरसंगे, ललीता कोकोडे, शिला पुसाम, शोभा सलामे यांसह आदिवासी बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुर्गप्रेमींनी साकारलेल्या किल्ल्यांच्या प्रतिकृतींचा अमृततर्फे केला जाणार गौरव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

दिवाळी सणाचे औचित्य साधून घरोघरी विविध किल्ल्यांच्या प्रतिकृती महाराष्ट्रातील असंख्य दुर्गप्रेमी साकारतात. यात युनेस्कोने आपल्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 दुर्गांना मानवंदना देण्यासाठी अमृतच्या माध्यमातून दुर्गोत्सव हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. हा उपक्रम लोकोत्सव म्हणून साजरा केला जात असून ज्या दुर्गप्रेमींनी या 12 दुर्गांच्या प्रतिकृती साकारल्या असतील अशा दुर्गप्रेमींना अमृतमार्फत गौरविण्यात येणार आहे. "अमृत महाराष्ट्र" आयोजित या उपक्रमात महाराष्ट्रातील 12 ऐतिहासिक दुर्गांची प्रतिकृती साकारणाऱ्या दुर्गप्रेमींनी आपण केलेली दुर्ग अथवा गडाची प्रतिकृती आपल्या सेल्फीसह ६६६.४ि६ॠक्ष३२५.ड्ढ्र या संकेतस्थळावर अपलोड करायची आहे.

रजिस्ट्रेशन व फोटो अपलोड करण्याची अंतीम तारीख 10 नोव्हेंबर असून सदर प्रक्रिया अत्यंत सोपी आहे. या दुर्गांमध्ये रायगड, सिंधुदुर्ग, प्रतापगड, साल्हेर, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, लोहगड, राजगड, जिंजी आणि विजयदुर्ग, शिवनेरी, खादिरी या दुर्गांचा समावेश आहे.

# परतीच्या प्रवासात मोजावे लागते दुप्पट-तिप्पट भाडे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

दिवाळीच्या सुट्या संपल्यानंतर आता परतीच्या प्रवासाकरिता रेल्वेस्थानकासह गणेशपेठ येथील बसस्थानक, बैद्यनाथ चौकातील खाजगी ट्रॅव्हल्स समोर प्रचंड गर्दी आली. याशिवाय वेळेवर आरक्षण उपलब्ध नसल्याने अनेकांनी खाजगी कारचा मार्ग निवडला. दरम्यानच्या काळात विमानाचे भाडे आकाशाला भिडल्याने प्रवाशांना अतिरिक्त पैसे मोजावे लागत आहे.



मुख्यतः दिवाळी सुट्टीच्या काळात सर्वाधिक रेल्वे गाड्यांची ये-जा होते. यात प्रामुख्याने नागपूर ते पुणे आणि मुंबई, संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड आदी मार्गावर वर्दळ वाढली आहे. दिवाळीनंतर भाऊबीज आणि रविवारी पंचमी आटोपताच अनेकांनी दिवाळी सुट्यांचा आनंद लुटण्यासाठी कुटुंबासह देवदर्शन, पर्यटन सुरु केले आहे. परिणामी शहरातील गणेशपेठ बसस्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली आहे.अशीच स्थिती बैद्यनाथ चौक, मोरभवन, मुख्य रेल्वेस्थानक, अजनी रेल्वेस्थानक, छत्रपती चौक, रवीनगर चौक, भोले पेट्रोल पंप, नागपूर विमानतळावर दिवसभर गजबजले होते.

दिवाळीच्या सुट्या संपल्यानंतर आता परतीच्या प्रवासात नागरिकांना दुप्पट-तिप्पट प्रवास भाडे द्यावे लागत आहे. प्रवाशांच्या मजबुरीचा गैरफायदा घेत सर्वच खासगी ट्रॅव्हल्स मालकांनी तिकीटदरात दुप्पट-तिप्पट वाढ केली आहे. प्रवासी संख्या अधिक असल्याने काही खासगी ट्रॅव्हल्स मालकांनी अतिरिक्त बसेस लावल्या आहेत. एसटी महामंडळाच्या सर्वच मार्गावर सामान्य प्रवाशांची गर्दी कायम आहे. काळात मनमानी प्रवास भाडे होत असल्याने नागरिकांची अक्षरशः लुट होत असते.

दिवाळीच्या दहा वीस दिवसात प्रवाशांच्या संख्येनुसार अतिरिक्त गाड्यांचे नियोजन एसटी महामंडळाच्या नागपूर विभागाकडून केल्या जाते. यात प्रामुख्याने महिलांसाठी दिल्या जाणाऱ्या ५० टक्के सवलतीमुळे मोठ्या संख्येने महिला प्रवासी वाढल्या आहेत. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या सवलतीमुळे एसटीच्या सर्व मार्गावर प्रवासी संख्या वाढली आहे.

दिवाळी आणि छठपूजेच्या निमित्ताने प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली असून गर्दी नियंत्रित करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जात आहे. यात प्रामुख्याने डझनावर गाड्या विलंबाने धावत असल्याने प्रवाशांच्या उत्साहावर पाणी फेरले जात आहे.

## ८ फेब्रुवारीला देशभरात सीटीईटी परीक्षा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळासह इतर मंडळांच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्तीसाठी सीटीईटी परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरातील १३२ शहरांमध्ये घेण्यात आहे.

शिक्षकांच्या नियुक्तीसाठी पात्रता परीक्षा घेतली जाणारी सेंट्रल टीचर्स एलिजिबिलिटी टेस्ट दरवर्षी घेतल्या जाते. डिसेंबर २०२४ आणि जुलै २०२४ मध्ये या परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. एकुण २० भाषांमध्ये ही परीक्षा घेतली जाईल. या परीक्षेची नोंदणी सुरू केली जाणार आहे. तेथून विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यासाठी अर्ज करावे लागतील. या परीक्षेअंतर्गत पेपर घेतले जातात. पेपर-१ हा पहिली ते चौथीच्या वर्गांना शिकवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी, तर पेपर-२ हा इयत्ता सहावी ते वर्गांना शिकवू इच्छिणाऱ्यांसाठी आहे.

# विमाशि संघाचे अधिकृत उमेदवार म्हणून दिलीप कडू यांचे नाव घोषित

## अमरावती विभाग शिक्षक मतदार संघासाठी उमेदवार जाहीर



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २७ :

महाराष्ट्रातील बलाढ्य शिक्षक संघटना म्हणून ओळख असलेल्या विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने २०२६ मध्ये होऊ घातलेल्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीसाठी आपल्या अधिकृत उमेदवाराची घोषणा रविवार २६ ऑक्टोबर रोजी केली आहे. माजी आमदार व्हि. यू. डायगव्हाणे व नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वाखाली विमाशि संघाच्या अकोला विश्रामगृह येथे संघटनेच्या उपविधीनुसार पार पडलेल्या निवडणुकीत दिलीप कडू यांना अधिकृत उमेदवार म्हणून एकमताने घोषित करण्यात आले.

शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करून आगामी निवडणुकीची रणनीती आखण्यात आली. उमेदवाराचे नाव जाहीर होताच शिक्षक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे. दिलीप कडू हे शिक्षण क्षेत्रातील अनुभवी, प्रामाणिक व कार्यक्षम व्यक्तिमत्त्व असून त्यांनी शिक्षकांच्या हक्कांसाठी नेहमीच लढा दिला आहे. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या माध्यमातून त्यांनी यापूर्वीही अनेक प्रश्न यशस्वीपणे मांडले आहे.

अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये आता संघटनात्मक पातळीवर मतदार नोंदणी व प्रचार मोहीम राबविण्यात येणार आहे. दिलीप कडू हे शिक्षक बांधवांच्या हितासाठी समर्पितपणे कार्य करतील, असा विश्वास विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी व्यक्त केला.बैठकीत अमरावती विभाग शिक्षक मतदार संघात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू यांना महाराष्ट्र राज्य आय. टी. आय. निदेशक संघटना यांनी जाहीर पाठिंब्याचे पत्र देत निवडणुकीत सक्रिय सहभागी होणार असल्याचे संघटनेने जाहीर केले. निवडणूक अधिकारी म्हणून रवींद्र वाघमारे तर सहा. नि. अधिकारी म्हणून पांडुरंग भालशंकर यांनी काम पाहिले.

या बैठकीला विमाशि संघाचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे,विजय ठोकळ, जयदीप सोनखासकर, जयप्रकाश थोटे, विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, चंद्रशेखर रहांगडाले, कोषाध्यक्ष भूषण तल्हार, सर्व जिल्हा कार्यवाह सुरेंद्र अडबाले,अविनाश बडे, संजय वारकर, रामकृष्ण जीवतोडे, अरविंद चौधरी, आशिष इंगळे, कुलदीप बदर, नितीन गायकवाड, वसंता माळी, सतीश शेळके, राजेश धुर्वे, संदीप मांढरे,दीपक धोपटे, अजय लोंढे, जिल्हाध्यक्ष पवन बन, दशरथ रस्से, म. रा. आय.टी.आय. निदेशक संघटनेचे मार्गदर्शक भोजराज काळे, अध्यक्ष अनिल उबरहंडे, सचिव गजानन भांबुरकर व शिक्षक उपस्थित होते.

# आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागात दक्षता जागरूकता सप्ताह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

२७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभाग "आमची सामायिक जबाबदारी" या थीम अंतर्गत "दक्षता जागरूकता सप्ताह-२०२५" आयोजित केला जात आहे. याप्रसंगी, विभागातील सर्व विभागांमध्ये विविध कार्यक्रमांद्वारे प्रामाणिकपणा, सचोटी आणि पारदर्शकतेला प्रोत्साहन देण्यात आले. च्या भावनेला प्रोत्साहन दिले जात आहे.

आज २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ७:३० वाजता एक भव्य प्रभातफेरी आयोजित करण्यात आली होती. संघ स्टेडियम, मोतीबाग येथून सुरू होऊन, ते रेल्वे कॉलनी, मोतीबाग येथून गेले आणि पुन्हा स्टेडियमवर संपले.

या मॉर्निंग वॉकमध्ये मोठ्या संख्येने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग



घेतला. मॉर्निंग वॉकचा उद्देश कर्मचारी आणि नागरिकांमध्ये दक्षता आणि सचोटीची जाणीव पसरवणे हा या रॅलीचा उद्देश होता. रॅली दरम्यान सहभागींनी "प्रामाणिकपणा - राष्ट्राची ताकद" आणि "सतर्क रहा, भ्रष्टाचारमुक्त रहा" यासारख्या घोषणांद्वारे जनजागृती निर्माण करणे. संदेश पोहोचवला.

वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी उदय कुमार भारती यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी केले. विभागातील सर्व वरिष्ठ अधिकारी यावेळी अधिकारी, शाखा अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

प्रभातफेरीनंतर, सकाळी ११:०० वाजता विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाच्या व्हरांड्यात सत्य निष्ठा प्रतिज्ञा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री दीपक कुमार गुप्ता यांनी उपस्थित सर्वांना संबोधित केले.

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांचे कर्तव्य प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि समर्पणाने पार पाडणे आवश्यक आहे. शपथ देण्यात आली. वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी श्री उदय कुमार भारती यांनी दक्षता जागरूकता सप्ताहाची उद्दिष्टे स्पष्ट केली. दक्षता ही फक्त एका विभागाची जबाबदारी नाही, तर ती आपल्या सर्वांची जबाबदारी आहे हे अधोरेखित करणे. ही एक सामायिक जबाबदारी आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने त्यांच्या कामात पारदर्शकता, सचोटी आणि निष्पक्षता पाळली पाहिजे. गरज आहे या प्रसंगी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी आपल्या भाषणात सांगितले की, दक्षता ही एक ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे जी आपल्या कार्य संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. आपण आपल्या कामाशी प्रामाणिक आणि वचनबद्ध राहिले पाहिजे. केवळ स्वतःलाच नव्हे तर स्वतःच्या संस्थेलाही भ्रष्टाचारमुक्त ठेवण्यासाठी योगदान दिले पाहिजे. संस्थेच्या विश्वासार्हतेसाठी आणि वाढीसाठी प्रत्येक कर्मचाऱ्याचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे असेही त्यात म्हटले आहे. म्हणून, प्रत्येकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने पार पाडले पाहिजे. याशिवाय, दक्षता जागरूकता मोहिमेदरम्यान नागपूर विभागात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दक्षता जागरूकता चर्चासत्र, निबंध आणि घोषवाक्य लेखन स्पर्धा, दक्षता जागरूकता रॅली, पोस्टर/बॅनर प्रदर्शन, कार्यालयांमधील पारदर्शकता आणि ई-फायलिंगवरील कार्यशाळा इत्यादी प्रमुख आहेत. या कार्यक्रमांचा उद्देश कर्मचाऱ्यांना दक्षतेचे महत्त्व समजावून देणे आणि प्रामाणिकपणाची संस्कृती रुजवणे हा आहे.

# पुस्तक वाचनाने मस्तक व सायकलने मनगट मजबूत

## विनोद शेंडगे यांचा प्रेरणादायी संदेश : परभणी ते गोंदिया वाचन संस्कृती सायकल यात्रा



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २७ :

माणसाने पुस्तक वाचले तर मस्तक मजबूत होते, आणि सायकल चालवली तर मनगट मजबूत होते. त्यामुळे मानसिक आरोग्यासाठी पुस्तक वाचा आणि शारीरिक आरोग्यासाठी सायकल चालवा, असा प्रेरणादायी संदेश वाचनप्रेमी विनोद शेंडगे यांनी दिला. शेंडगे सध्या परभणी ते गोंदिया असा तब्बल सातशे किलोमीटरचा प्रवास सायकलने करीत आहेत. वाचन संस्कृतीचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी ते ही यात्रा करत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय उपक्रमानिमित्त शिक्षक मित्रपरिवार तर्फे श्री. गुरुदेव सेवा मंडळ, काटोल येथे त्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख राजू धवड तर प्रमुख अतिथी म्हणून ज्ञानेश्वर पाटमासे, विठ्ठल बोंडे, गजानन लाडूकर, कृष्णा मुंगभाते, कल्पनाताई देवतळे, रमेश ठाकरे, संतोष ठाकरे, दिलीप शिंगाणे, रामराव धांडे आणि शंकर शेंदरे हे उपस्थित होते.

याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारीपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल नंदाताई ज्ञानेश्वर पाटमासे यांचा देखील सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना शेंडगे म्हणाले, गेल्या दहा वर्षांपासून मी अक्षर वाचन चळवळीसाठी प्रयत्नशील आहे. प्रत्येक उन्हाळा आणि दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये मी ७०० ते ८०० किलोमीटरचा सायकल प्रवास करून वाचन संस्कृती समृद्ध करण्याचा प्रयत्न करतो. सायकल चालवणे ही माझी आवड असून, त्यातून मला आत्मिक आनंद मिळतो. प्रवासादरम्यान पाऊस, वारा, वादळ यांचा सामना करावा लागतो, तरी वाचन संस्कृती रुजवण्याच्या ध्येयापुढे ही संकटे क्षुल्लक वाटतात. त्यांनी पुढे सांगितले की, माणसाचं अंतिम उद्दिष्ट आनंद असतो. वाचन माणसाला चिंतनशील बनवतं, चिंतन लेखनात परिवर्तित होतं आणि याच प्रक्रियेतून व्यक्ती परिपूर्णतेकडे जाते. श्रमजीवी आणि बुद्धिजीवी समाज घडवायचा असेल, तर वाचन करणे ही काळाची गरज आहे, असे प्रेरणादायी शब्द त्यांनी उपस्थितांना उद्देशून म्हटले.

अध्यक्षीय भाषणात राजू धवड म्हणाले, ध्येयाने पछाडलेला माणूसच यशस्वी होतो. विनोद शेंडगे हे वाचन संस्कृती रुजवण्याच्या ध्येयाने पछाडलेले व्यक्तिमत्त्व आहे. ते सायकलने शेकडो किलोमीटर प्रवास करून विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये वाचनाची ज्योत पेटवत आहेत. मोबाईलपासून दूर राहा आणि पुस्तकांच्या जवळ जा, हा त्यांचा संदेश समाजाला जागृत करतो. वाचन संस्कृती लोकचळवळ व्हावी, यासाठी आम्हीही प्रयत्नशील राहू, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र टेकाडे यांनी केले.संचालन मारोती मुरके यांनी तर आभार प्रदर्शन धनंजय पकडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कमलेश सोनकुसळे, एकनाथ खजुरिया, योगेश चरडे, मनोहर पठाडे, ज्ञानेश्वर मोहोड, तुषार चरडे, माणिक नाईक, लोकपाल टुले, मनीष डफ्फर, स्वप्निल राऊत आणि प्रवीण वालुरकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

# नयन बहुउद्देशीय संस्थेच्या विद्यमाने सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

नयन बहुउद्देशीय संस्था व क्रीडा युवक योजना, जिल्हा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ग्वालबंसी सभागृह, जगदीश नगर, नागपूर येथील सभागृहात उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नरेश बरडे यांनी भूषविले. तर प्रमुख अतिथींच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेतील सदस्यांनी विविध गीत, नृत्य आणि नाट्यप्रयोग सादर करून उपस्थितांचे मनोरंजन केले.

या कार्यक्रमास मान्यवरांनी उपस्थित राहून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. समाजातील युवक आणि युवतींनी सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग घ्यावा त्यामुळे रोजगार संधी कश्या उपलब्ध होतील बाबत मार्गदर्शन या वेळी करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे सभासद विजय हटवार, डॉ. शारदा रोशनखेडे, अल्का पोपटकर , नमिता नरेश चोपकर,(सचिव) शारदा श्रीवास्तव, सुरेश कोगे, अश्विनी विशाल वानखेडे तसेच गुणवंत खोडे ( अध्यक्ष ) नरेश चोपकर आणि इतर मान्यवर, युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्मृतिशेष पँथर वसंतराव धामणकर अभिवादन सभेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर 1972 साली दलित पँथर चळवळ सुरू झाली. या चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते व लढवय्ये नेते स्मृतिशेष पँथर वसंतराव धामणकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही सभा दिनांक 28 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 3 ते सायं. 7 वाजेपर्यंत तिरुपुडे हॉस्पिटल जवळ, कामठी रोड, नागपूर येथे होणार आहे. दलित पँथरच्या चळवळीतील अग्रणी नेते वसंतराव धामणकर यांनी 1974 साली मुंबईहून नागपुरात दलित पँथर अधिवेशनाचे आयोजन केले होते. अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनानंतर त्यांनी बिचारी जनता आणि दलित पँथर हे प्रसिद्ध पुस्तक लिहून सामाजिक चळवळीला वैचारिक दिशा दिली. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृतीत 1975 साली शहीद वसंत धामणकर वाचनालय या नावाने कार्य सुरू करण्यात आले. चळवळीच्या 50 वर्षांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या अमूल्य योगदानाच्या गौरवार्थ ही अभिवादन सभा आयोजित करण्यात येत आहे. कार्यक्रमात विविध सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत व पँथर चळवळीतील सहकारी सहभागी होणार आहेत. या आयोजनात भारतीय दलित पँथर तर्फे पँथर प्रकाश बनसोड, तुकाराम कोचे, ॲड. सुरेश घाटे, बबन मेश्राम, हरिश वंजारी, मनोहर राऊत, सरोज मेश्राम, रवि शेंडे, प्रसेनजित ताकसांडे, ॲड. रमेश शंभरकर, अशोक शंभरकर, राजेश मेश्राम, रविंद्र पाटील, श्याम मेश्राम, सुरेश वाघमारे आदिंचा सहभाग आहे.

# वाडी-खडगाव मार्गावरील रस्त्यावर कचऱ्याचे साम्राज्य

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २७ :

येथील वाडी - खडगाव मार्गावरील रस्त्यावर सातत्याने कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे हा परिसर कचऱ्याचे आगार बनत असल्याचे चित्र दिसून येत आहे. तर काही नागरिक शाळेच्या समोरही कचरा आणून टाकत असल्याने शाळकरी विद्यार्थ्यांसह नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नगरपरिषद प्रशासनाने येथे कचरा टाकू नये असा फलक लावलेला असतांना नागरिक आरोग्याशी खेळ करीत आहे.





सकाळच्या वेळेत काही जनावरमालक आपली जनावरे मोकाट सोडून देतात. ही जनावरे कचऱ्यातील शिळे अन्न शोधण्यासाठी या ठिकाणी येतात आणि प्लास्टिकसह अन्नपदार्थ खातात. यामुळे त्या जनावरांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहेत. कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळून वाहने जाताना वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे.

द्वारकाधीश मंदिर परिसरात असलेल्या विमलताई तिडके विद्यालयाच्या समोर काही दुकानदार नियमितपणे कचरा टाकतात. यामुळे शाळकरी मुलांना दुर्गंधी, माशा मच्छर आणि प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे.

या ठिकाणी नगरपरिषदेकडून 'कचरा टाकल्यास दंड होईल' असे फलक लावले असले तरी परिस्थिती जैसे थे आहे. शेजारी असलेल्या गजानन महाराज मंदिरामुळे येथे दररोज पहाटे काकड आरतीसाठी वारकरी येतात. परंतु दुर्गंधीमुळे भक्तांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सध्याच्या परिस्थितीत वाडी खडगाव मार्ग हा कचऱ्याचा डेपो झाल्याचे चित्र आहे. प्रशासनाने तात्काळ कचरा टाकणाऱ्या नागरीकावर तसेच जनावर मालकांवर कारवाई, तसेच जनजागृती मोहीम सुरू करणे अत्यावश्यक झाले आहे.

# मध्य रेल्वे नागपूर विभागात अनधिकृत विक्रेत्यांविरुद्ध कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

प्रवाशांची सुरक्षा, स्वच्छता आणि शिस्त राखण्यासाठी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात सप्टेंबर आणि ऑक्टोबर 2025 दरम्यान अनधिकृत विक्रेत्यांविरुद्ध विशेष मोहिमा राबविण्यात आल्या.

सप्टेंबर महिन्यात विभागात एकूण 699 प्रकरणे नोंदविण्यात आली, ज्यामध्ये नागपूर (217 प्रकरणे), आमला (48 प्रकरणे) आणि बैतूल (130 प्रकरणे) अशी प्रमुख स्थानके समाविष्ट असून या ठिकाणी एकूण 395 प्रकरणे नोंदविण्यात आली. ही कारवाई पुढे चालू ठेवत ऑक्टोबर 2025 मध्ये एकूण 610 प्रकरणे नोंदविण्यात आली, ज्यामध्ये नागपूर (252 प्रकरणे), आमला (34 प्रकरणे), बैतूल (112 प्रकरणे) आणि नरखेड (2 प्रकरणे) यांचा समावेश असून एकूण 400 प्रकरणे नोंदविण्यात आली.

सप्टेंबर महिन्यात 2,84,085 आणि ऑक्टोबर महिन्यात 2,37,400 इतके दंड वसूल करण्यात आले, ज्यावरून या उल्लंघनांची गांभीर्य स्पष्ट होते. सध्या नागपूर आणि बैतूल विभागात मध्य रेल्वे, पश्चिम मध्य रेल्वे आणि विभागीय रेल्वे सुरक्षा बल यांच्या संयुक्त पथकाद्वारे अनधिकृत फेरीवाल्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी समन्वित मोहिमा राबविण्यात येत आहेत. नागपूर विभाग अनधिकृत विक्रीविरुद्ध आपल्या शून्य सहनशीलता धोरणाची पुनरुज्जीवित घोषणा करीत असून प्रवाशांना आवाहन करतो की त्यांनी खाद्यपदार्थ आणि पेय केवळ अधिकृत रेल्वे विक्रेत्यांकडूनच खरेदी करावेत.

# पांडव पंचमीच्या निमित्ताने मौदा शहरात 'हॅप्पी स्ट्रीट'चा जल्लोष

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २७ :

पांडव पंचमीच्या शुभमुहूर्तावर प्रसन्ना राजाभाऊ लोकसेवा प्रतिष्ठानच्या विद्यमाने सकाळी ७ ते ११ या वेळेत मौदा शहरात 'हॅप्पी स्ट्रीट' हा अनोखा आणि उत्साहपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रसन्ना उर्फ राजाभाऊ तिडके आणि स्नेहल कुचनकर-इटकेलवार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांचे मन जिंकले.
या तीन तासांच्या कार्यक्रमात जुम्मा डान्स, वेटलिफ्टिंग, रस्सीखेच, साप-सीडी, टिकर-बिल्ला, मेहंदी, स्टॅच्यू आणि कराओके यांसारख्या विविध स्पर्धांनी रंगत आणली.

लहान मुलांपासून ते युवक-युवती आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेत मनसोक्त आनंद लुटला. विशेषतः जुम्मा डान्स आणि कराओकेने तरुणाईला भुरळ घातली, तर रस्सीखेच, वेटलिफ्टिंग आणि मेहंदी स्पर्धांमध्ये सर्व वयोगटांनी जोश दाखवला.

मौदा शहरातील व्यायाम शाळेतील पहलवानांनी दांडपट्टा आणि कुस्तीचे शानदार प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाला खासदार श्यामकुमार बर्वे, माजी विधान परिषद सदस्य अभिजीत वंजारी, प्रसन्ना उर्फ राजाभाऊ तिडके, देवेंद्र गोडबोले, राजेंद्र लांडे, दादाराव सारवे, राजेंद्र जयस्वाल, शुभम तिघरे, मौदा नगरपंचायतीचे माजी उपाध्यक्ष राजेश निनावे, रेखा कोहाड, सावित्री काटकर, नाना इंगळे, पृथ्वीराज गुजर, कल्पना मानकर, पराग निमजे, साकार अंभोरे, हर्षद ठक्कर, राजकन्या रामटेके, विलास निमजे, आशा काटकर, विलास बावणे, शारदा नानवटकर, भारती गायकवाड, सीमा सावरबांधे, आशा वडवाले, राजू खवसकर, वंदना मेश्राम, विना वानखेडे, किशोर सांडेल, बाळा तिजारे, अमोल माणूसमारे, राकेश वाघमारे, रुपाली हिवसे, विकी साठवणे, जितेंद्र यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.





# कागद गोदामाला भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २७ :

पावनगाव परिसरातील एका कागद गोदामाला शनिवारी रात्री अचानक आग लागली. काही मिनिटातच रौद्ररूप धारण केले. घटनेची माहिती मिळताच मनपा अग्निशमन विभागाचे पथक ४ बंबासह घटनास्थळी पोहोचले.

बऱ्याच प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात मनपाच्या पथकाला यश मिळाले. पूर्व नागपूरातील कळमनाच्या पावनगाव परिसरात नाका क्र. ४ जवळ मदन धुलिया रा. शांतीनगर यांचे कागदाचे गोदाम आहे. यात गोदाम आगीच्या विळख्यात सापडले. त्याच वेळी रस्त्याने जात असलेल्या प्रियांशू कनोजिया नावाच्या व्यक्तीने मनपा अग्निशमन विभागाला घटनेची माहिती दिली. तात्काळ कळमना, वाठोडा आणि सुगतनगर अग्निशमन केंद्रातून चार बंब घटनास्थळी पोहोचले.

# बालगोपालांनी साकारला प्रतापगड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

शांतीनगर, हावरापेठ येथील पवन लुटे यांच्या निवासस्थानी दिवाळी निमित्त किल्ले सिंधुदुर्ग साकारला आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्यांची माहिती नवीन पिढीला व्हावी. या दुष्टीने हावरापेठेतील पवन लुटे व कार्तिका लुटे यांनी परिसरातील अयागां, वंश,यश, जितेंद्र, विवान व हृदय या बालगोपाल मंडळींना किल्ला साकारण्याची प्रेरणा दिली. त्यातूनच हा किल्ला साकारला असून खासदार सांस्कृतिक महोत्सव शिव वैभव किल्ले स्पर्धेत सुध्दा सहभाग नोंदविला. हा किल्ला बवण्याकरीता परिसरातील बालगोपालांची रेलचेल दिसत आहे.



# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या १२४ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. रविवार व सोमवार(ता.26 व 27) शोध पथकाने 124 प्रकरणांची नोंद करून 58,700 रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाड्या, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400 दंड) या अंतर्गत 36 प्रकरणांची नोंद करून 14,400 रुपयांची वसुली करण्यात आली.

व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/- दंड) या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 100 रुपयांची वसुली करण्यात आली.दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.400 दंड) या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 1,600 रूपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 2,000/-रुपयांची वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 28 प्रकरणांची नोंद करून 21,000 रुपयांची वसुली करण्यात आली.चिकन सेंटर,मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता,फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणाची नोंद करून रू.1,000रूपयाची वसुली करण्यात आली.वर्कशॉप,गॅरेजेस व इतर दुरूस्तीचे व्यवसायीकांने रस्ता,फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणाची नोंद करून रू.1,000 रूपयाची वसुली करण्यात आली.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 43 प्रकरणांची नोंद करून 8,600 दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 9 प्रकरणांची नोंद करून रु.9,000 चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.



# गरजू बालिका व अनाथ मुलांसोबत साजरी झाली प्रकाशाची दीपावली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे कॉलनी, कामठी रोडवरील प्राचीन श्री शिव मंदिराच्या प्रांगणात यंदा दीपावलीचा सण एका वेगळ्याच रूपात साजरा करण्यात आला. येथे गरजू गरीब बालिका आणि अनाथ मुलांसोबत दीपावली मिलनाचा प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा उपक्रम शिव मंदिर दीपावली मिलन आयोजन समिती व कॉम्हेड (यू.के.) यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

या प्रसंगी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे मंडळ रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता, डॉ. निर्मला गुप्ता, उत्तर नागपूरचे आमदार व माजी कॅबिनेट मंत्री डॉ. नितीन राऊत व सुमेधा राऊत, ईंडियन मेडिकल कौन्सिल महाराष्ट्राच्या नवनियुक्त अध्यक्षा डॉ. मंजुषा गिरी, कॉम्हेडचे डॉ. कमलाकर देवघरे, गुरुनानक इंस्टिट्यूटचे सीएमडी सरदार नवनीत सिंह तुली, नागेश सहारे, अडवाणी, विश्वजीत डे दादा, नियोग थेरपिस्ट विजय गुप्ते, बंडू टेंभुरने, नैसर्गिक चिकित्सा व योग थेरपिस्ट डॉ. प्रवीण डबली, सी. प्रकाशराव, पी. सत्याराव व रिंकू शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अतिथींचे स्वागत पं. कृष्ण मुरली पांडे यांनी शाल व श्रीफळ देऊन केले.







कार्यक्रमात आयोजन समितीने प्रगतीक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, विद्युत विहार कोराडी येथील ४० गरजू बालिकांना फुटबॉल किट (टी-शर्ट, शॉर्ट्स, मोजे, बॅग व मिठाई) भेट दिली. तसेच समता अनाथ आश्रम, उप्पलवाडी, नागपूर येथील २५ मुलांना जीन्स, शर्ट, अंतर्वस्त्र, टॉवेल, साबण, टूथब्रश, पेस्ट, चादर आणि स्कूल बॅग देण्यात आल्या. कॉम्हेड तर्फे सर्व मुलांना मिठाईचे डबे देखील वाटण्यात आले. या भेटवस्तू मिळाल्यावर मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेली आनंदाची लकेर पाहून उपस्थित सर्वांच्या मनात सणाचा खरा आनंद भरून आला.


आमदार डॉ. नितीन राऊत यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, शिक्षणासोबतच खेळातही मुलींनी पुढे यावे आणि समाजाचे नाव उज्ज्वल करावे. त्यांनी या उपक्रमाला सामाजिक जबाबदारीचे उत्कृष्ट उदाहरण म्हटले. मंडळ रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी सांगितले की, मुलांसोबत दीपावली साजरी करणे म्हणजे उत्सवाचा खरा अर्थ अनुभवणे होय.
डॉ. निर्मला गुप्ता यांनी मुलांना मन लावून अभ्यास करण्याचे व जीवनात यश मिळविण्याचे प्रोत्साहन दिले. डॉ. मंजुषा गिरी यांनी सांगितले की, प्रत्येक मुलाने जीवनात एक ध्येय निश्चित करून त्याकडे सातत्याने प्रयत्न करावा; कारण ध्येयाशिवाय जीवन दिशाहीन होते. योग व नैसर्गिक चिकित्सा तज्ज्ञ डॉ. प्रवीण डबली यांनी योग, प्राणायाम व ध्यानाचे महत्त्व सांगत मुलांना निरोगी शरीर व प्रसन्न मन राखण्याचे मार्गदर्शन केले आणि समाजसेवेची प्रेरणा दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकमेकांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सी. प्रकाशराव, पी. सत्याराव, प्रेमलाल यादव, गणेश कोटूलवार, मनीष नायडू, रमेश पटनायक, दीपांकर पॉल, बिलास खोडे, सी. राजगोपाल आणि महिला समिती सदस्यांचे विशेष योगदान लाभले.

## निधन वार्ता

### डोमा काकडे

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २७ :



हिंगणा तालुक्यातील मोंढा येथील रहिवासी ह.भ.प.डोमाजी तुकाराम काकडे यांचे रविवारी निधन झाले.

ते १०३ वर्षाचे होते. ते पंढरपूरचे नियमित वारकरी होते. त्यांच्या पश्चात सुधाकर, मधुकर, राजू अशी तीन मुले एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मोंढा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# छठ पूजा उत्सवासाठी मनपा सज्ज





■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

उत्तर भारतीयांचा धार्मिक उत्सव असणाऱ्या छठ पूजाला विशेष महत्त्व असून, यानिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे अंबाझरी तलाव आणि फुटाळा तलाव, पोलिस लाईन टाकळी, गोरेवाडा येथे सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत यांनी सोमवारी (ता.27) मनपाद्वारे फुटाळा तलाव येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सुविधांची पाहणी केली. यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत यांच्या देखरेखीखाली छठ पूजा करीता मनपातर्फे भाविकांना सुविधा उपलब्ध करून दिली गेली आहे. उत्तर भारतीयांचा धार्मिक उत्सव छठ पूजा नागपुरात हर्षोल्हासात साजरा केला जातो. येथे येणाऱ्या भाविकांसाठी मनपातर्फे अंबाझरी तलाव आणि फुटाळा तलाव, पोलिस लाईन टाकळी, गोरेवाडा येथे सुविधा उपलब्ध करून दिली गेली आहे. यात प्रामुख्याने अंबाझरी तलाव येथे होणाऱ्या छठ पूजानिमित्त परिसराची साफसफाई वर विशेष लक्ष दिले जात आहे. भाविकांना तलावापर्यंत येण्यासाठी मार्ग सुशोभित करून सुरक्षेसाठी कठडे लावण्यात आले आहेत. याशिवाय विद्युत व्यवस्था, बरीकेंडींग, साऊंड व्यवस्था, पेयजल लावण्यात आली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने पूजा स्थळी उभे राहण्यासाठी स्टॅंड उभारण्यात आले असून, सुरक्षा व्यवस्था तसेच तलावाच्या काठावर कपडे बदलण्याची तात्पुरत्यास्वरुपात खोल्या तयार करण्यात आल्या आहेत. याशिवाय परिसराची स्वच्छता करण्यासाठी मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पर्यावरण संरक्षणाच्यादृष्टीने निर्माल्य तलावात टाकू नये, यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

## टॅक्सी चालकाची चाकूने भोसकून हत्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

ई-रिक्षाला धडक लागल्यानंतर उद्भवलेल्या वादात टॅक्सी चालक आणि त्याच्या मित्रावर गुंडांच्या टोळीने हल्ला केला. चाकूने भोसकून टॅक्सी चालकाची हत्या केली, तर त्याच्या साथीदाराला गंभीर जखमी केले. ही थरारक घटना शनिवारी रात्री कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत म्हाडा कॉलनी परिसरात घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी एका गुंडासह तिघांना ताब्यात घेतले असून त्यांचे इतर साथीदार फरार आहेत. राजेश ईश्वास ओरेकर (४८) रा. नारी वस्ती असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी त्याचा जखमी मित्र पिंटू राजपूतच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. ताब्यातील आरोपींमध्ये हर्षल कुथे, त्याचा भाऊ गौरव कुथे आणि एका अल्पवयीनचा समावेश आहे. लक्की, तब्बा, रांभा आणि इतरांचा शोध सुरू आहे.

राजेश हा एका ट्रॅव्हल्स कंपनीत टॅक्सी चालवत होता. शनिवारी राजेश, पिंटू, संजू आणि अण्णा या चारही मित्रांनी सहलीला जाण्याची योजना बनवली. सर्व मंसर परिसरातील एका रम्य ठिकाणी गेले. तेथे सर्वांनी पार्टी केली आणि रात्रीला कारने नागपूरला परतले. पिंटूने संजू आणि अण्णाला तक्षशीला घाटाजवळ सोडले. रात्री १० वाजताच्या सुमारास तो आणि राजेश घरी जात होते. या दरम्यान म्हाडा कॉलनीत पाण्याच्या टाकीजवळ उभ्या एका ई-रिक्षाला कारची धडक लागली. ई-रिक्षाचे नुकसान झाले. त्याच दरम्यान आवाज ऐकून रिक्षा मालक आणि त्याची पत्नी घरातून बाहेर आले. पिंटूशी त्यांचा वाद झाला. राजेशने रविवारी नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन दिले.

## नाल्यांअभावी बर्वे लेआऊटमधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २७ :

रामटेक शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची असते. मात्र रामटेक शहरातील बर्वे लेआऊट भागातील नागरिक आजही नाल्यांच्या सुविधेपासून वंचित आहेत. नगरपरिषद नागरिकांकडून घरकर, पाणीपट्टी आदी कर नियमित वसूल करते, परंतु सांडपाणी वाहून नेण्यासाठी आजवर नाल्यांचे बांधकामच करण्यात आलेले नाही.

या दुर्लक्षामुळे येथील नागरिकांच्या घराजवळ सांडपाणी साचते, त्यामुळे असह्य दुर्गंधी पसरते आणि डासांचा प्रादुर्भाव वाढून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार हा लेआऊट जुना असून, अनेक वर्षांपासून नगरपरिषदेकडून नाल्यांचे काम केवळ आश्वासनांपुरतेच राहिले आहे.

स्थानिक रहिवाशांनी रोष व्यक्त करत म्हटले आहे की, निवडणुकीच्या वेळी मत मागायला येण्यापूर्वी आमच्या समस्यांकडे लक्ष द्या. प्रशासन आणि तत्कालीन नगरसेवकांनी या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल नागरिकांमध्ये संताप आहे.

दरम्यान, या विषयावर विचारणा केली असता नगरपरिषद बांधकाम विभागातील अभियंता सौरभ कावळे यांनी सांगितले की, सदर नाली बांधकामाचा प्रस्ताव पाच-सहा महिन्यांपूर्वी पाठविण्यात आलेला आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यावर बर्वे लेआऊट येथे नाली बांधकाम करण्यात येईल.

## १ लाख ३५ हजार रुपयांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

कुटुंब दर्शनासाठी शिर्डीला गेल्याची संधी साधत अज्ञात आरोपीने घरफोडी करून १ लाख ३५ हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना तहसील पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी वंदना प्रभाकर महाजन (५०) रा. बंगाली पंजा, पिवळी मार्बत चौकच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. वंदना यांच्या घराशेजारीच राहणारा त्यांचा पुतण्या पुरूषोत्तम महाजन गुरूवारी सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास घराला कुलूप लावून कुटुंबासह साई बाबांचे दर्शनासाठी शिर्डीला गेला होता. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडून पुरूषोत्तमच्या घरात प्रवेश केला. घरातील रोख ३५ हजार आणि सोन्याचांदीचे दागिने असा १.३५ लाख रुपयांचा मुदेमाल चोरी करून पसार झाला. शनिवारी सकाळी वंदना यांना पुरूषोत्तमच्या घराचे कुलूप तुटलेले दिसले. तहसील पोलिस घटनास्थळी पोहोचले. प्राथमिक तपासानंतर अज्ञात आरोपीवर गुन्ह्याची नोंद करून तपास सुरू केला आहे.

## कुणबी समाजाचा परिचय मेळावा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

सर्व शाखीय कुणबी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा नुकताच नंदनवन येथे आयोजित करण्यात आलेला होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बहुजन विचार मंचचे संस्थापक व उद्योजक नरेंद्र जिचकार, सुप्रसिद्ध उद्योजक नितीन साळवे, सोनल साळवे, योगेश चव्हाण, प्राध्यापिका मंजुषा चव्हाण, आयुर्वेदाचार्य डॉक्टर अनुराधा सारडे व कौन्सिलर सौ शिल्पा साठे, परमेश्वर राऊत, तिरळे कुणबी समाज संस्थेचे सचिव सुरेश जिचकार, एकनाथ काळमेघ, गणेश नाखले, उमाजी कोहळे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी 330 उपवर वधू व त्यांचे पालक व समाज बंधू उपस्थित होते.



यावेळी अतिथिंनी उपस्थित उपवर व वधूंना मार्गदर्शन केले व सांगितले की जुन्या रीती व परंपरा सोडून सर्वांनी नवीन आवश्यक ते नाविन्यपूर्ण परंपरा अंगी काराव्यात.यावेळी आयुर्वेदाचार्य डॉक्टर अनुराधा सरडे यांनी उपस्थितांना आपले आरोग्य कसे सुदृढ ठेवावे याबद्दल योग्य ती माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजक म्हणून इंजिनियर सुधांशू मोहोड, पौर्णिमा मोहोड, इंजिनियर संजय काळे, प्रा. जयश्री काळे, रामेश्वर राऊत, ललिता राऊत यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक प्रयत्न घेतले.

## खड्डयांमध्ये झेंडूची फुले टाकत आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभागाने महारेल्वेच्या विरोधात रस्तारोको आंदोलन केले . वर्षभराच्या आश्वासनानंतरही कल्व्हर्टचे बांधकाम पूर्ण न केल्याबद्दल महारेल्वेच्या मुख्य अभियंत्यावर फुलांचा वर्षाव करून संताप व्यक्त केला. अध्यक्ष वसीम खान यांच्या नेतृत्वात मोमीनपुरा येथे हे आंदोलन करण्यात आले. महारेलने कडवी चौक ते मोमिनपुरा पर्यंतच्या कल्व्हर्टचे बांधकाम ३६५ दिवसांत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु ३/४ वर्षे उलटून गेली आहेत आणि काम अजूनही पूर्ण झालेले नाही, मोमिनपुराच्या रस्त्यांवर खड्डे नाहीत, खड्डयांमध्ये रस्ते आहेत. वाहतूक कोंडी होत असून, मेयो रुग्णालयात रुग्णवाहिका जाऊ शकत नाहीत. खान यांनी पदाधिकाऱ्यांसह महारेलच्या मुख्य अभियंत्यावर फुलांचा वर्षाव करीत काही दिवसांत कल्व्हर्टचे काम पूर्ण न झाल्यास रस्ता बंद करण्याचा इशारा दिला. या आंदोलनात मध्य नागपूर ब्लॉक अध्यक्ष गोपाल पट्टम, समाजसेवक निजाम अन्सारी, अब्दुल नाजू,




अब्दुल मोईज शेख, डॉ.मेहुल अडवाणी, अस्लम अन्सारी, सलीम शाह, रवी पराते, मोहम्मद सफर, बंटी अब्बुमियाँ, अभिजित ठाकरे, अल्लाउद्दीन अन्सारी, शफी शेख, जुनैद, शादाब, अय्यूश शेख, राउत, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिवाळीनिमित्त सफाई कामगारांचा सत्कार आणि मिठाई वाटप



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २७ :

वाडी परिसरातील क्रियाशील युवा युवतींनी आपले कलागुण विकसित करण्यासाठी स्थापन केलेल्या शिवराजे ढोल ताशा व ध्वज पथकने दिवाळी निमित्त वाडी नगरपरिषदेत स्वच्छतेची जबाबदारी पार पाडणाऱ्या सफाई कामगारांचा भावपूर्ण सत्कार आणि मिठाई वाटप करून आपले सामाजिक दायित्व पार पाडले. अमरावती महामार्ग दत्तवाडी येथील ढोल ताशा व ध्वज पथक प्रशिक्षण केंद्राच्या प्रांगणात आयोजित विशेष समारंभात उपस्थित अतिथी युवासेनेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य हर्षल काकडे, डॉ. राहुल ठवरे यांचे सर्वप्रथम ढोल ताशा पथकाच्या वतीने लोकेश जगताप, तोषित अंबाडकर, सुमित ढोक, पवन बारबैले, विशाल जाधव यांनी पुष्प देऊन स्वागत केले. शिवराजे ढोल ताशा पथकाचे प्रमुख शुभम डवरे यांनी या सामाजिक उपक्रमाच्या उद्देशाच्या संदर्भात प्रास्ताविकात माहिती सादर केली. नंतर उपस्थित अतिथी हर्षल काकडे यांच्या हस्ते वाडी नगरपरिषदेचे स्वच्छता निरीक्षक धनंजय गोतमारे सह २५ महिला-पुरुष सफाई कामगारांना साडी, शर्ट पीस आणि मिठाई प्रदान करून भावपूर्ण सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित अतिथींनी आपल्या मनोगतात शिवराजे ढोल ताशा व ध्वज पथकच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करताना शिवराजे ढोल ताशा पथक नियमितपणे अनेक सामाजिक उपक्रम आणि युवकांच्या कलागुणांना विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्याचे पथकाच्या माध्यमातून समाजसेवा उपयुक्त आणि अनुकरणीय असल्याचे सांगितले. सत्काराच्या उत्तरात सत्कारमूर्तींनी या सत्काराबद्दल आनंद व्यक्त करत आयोजकांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन श्वेता डवरे आणि आभार अचलं गोरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्थ प्रवीण जैस्वाल, कार्तिक बनसोड, वेदांत लांडगे, कार्तिक सुरजुसे, प्राजक्ता सूर्यवंशी, माधुरी बारबैले, प्राची कांबळे, पायल सूर्यवंशी, निशा मंडल, पूजा माहोरे, अंश नारनवरे, यश मानकर, सोनू वाडीचार, अद्वैत हिंगवे, शुभम नाटकर, रुपेश राजूरकर, श्रेयश पडोळे आदींनी पथक प्रयत्न केले.

महासागर
प्रभाग वार्ता

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिसरात कचऱ्याचा ढिगारा

प्रमोद जांभूळकर
नागपूर दि. २७

प्रभाग क्र. ९ (क) इंदोरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिसराच्या मागील भागात मोठ्या प्रमाणात कचऱ्याचा ढिगारा पडून राहिल्याने परिसरात अस्वच्छता पसरली आहे. हा मार्ग इंदोऱ्यातील मुख्य रस्त्यांपैकी एक असून दररोज नागरिक, विद्यार्थी आणि वाहनधारकांची मोठी वर्दळ असते.स्थानिक नागरिक दादा भालेराव यांनी सांगितले की, सफाई कर्मचारी कचरा गोळा करण्याऐवजी ह्याच ठिकाणी आणून टाकतात.

अनेकदा फोनवर तक्रार केल्यानंतरही कोणतीही कारवाई होत नाही.तर अजय सहारे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिसरात वारंवार विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन होते. त्या वेळी बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांना कचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या दुर्गंधीचा सामना करावा लागतो.या कचऱ्यामुळे डास-माशांचा प्रादुर्भाव वाढला असून रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी मनपा प्रशासनाकडे तातडीने स्वच्छतेची मागणी केली आहे.राजेश राऊत, भुवनेश्वर उके, मनोज गजभिये, मनोज पाटील, शैलेंद्र बेहेरे, राजेश वासनिक, भूपेश कांबळे, देवानंद पानतावणे, विलास नितनवरे, जयेश गेडाम, प्रभू गजभिये, हेमराज जांभूळकर, अमोल गजभिये, मंगेश नागदेवे, प्रमोद लोखंडे, राजन शेंडे आणि रविंद्र जनबंधू यांनी मनपा प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

### नागरिक त्रस्त



## बिनाकी मंगळवारी परिसरात रस्ता खराब झाल्याने नागरिक त्रस्त

प्रदीप पौनिकर, नागपूर दि.२७

प्रभाग क्रमांक ५, बिनाकी मंगळवारी या परिसरातील रस्त्यांची दुरवस्था ही एक मोठी समस्या बनली आहे. रस्ते खराब झाल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणी येत आहेत, जसे की दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे नुकसान, अपघात होण्याची शक्यता, पावसाचे पाणी साचल्यामुळे रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना ये्जा करणे कठीण झाले आहे .रस्त्यांची नियमित देखभाल आणि दुरुस्ती केली जात नाही, ज्यामुळे रस्त्यांची अवस्था खूप खराब झाली आहे.

सतरंजीपुरा झोनचे सहाय्यक आयुक्त यांना अनेकदा तक्रार केल्यानंतरही रस्त्याचे काम हे तसेच आहे जर लवकरात लवकर रस्ता दुरुस्त केला नाही तर स्थानिक नागरिक आणि आम आदमी पक्षाच्यावतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा



देण्यात आला .यावेळी प्रदिप पौनिकर,क्षितिज वंजारी,किसन निमजे, विजय नंदनवार,अनिल संभे,नानक धनवानी, स्वाती तारवानी,केतन ठाकूर, मनोज फटींग, नीलकंठ टाकळीकर,संदीप साखरे, बाबुराव निमजे,आरती दलाल, सुनीता पांडे, सुनिल गजभिये, लीना गजभिये,दिलीप रामटेकर,अरुण गुणारकर, जय प्रकाश पौनिकर,सुभाष खांडेकर,संजू पटेल, अमोल उके, साहिल शेख,मोहिन अन्सारी, आम आदमी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.